पाचोरा तहसील आवारातून जप्त ट्रॅक्टरचे साहित्य गायब
वाचा पान ७ वर

जळगाव
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
प्रारंभ:१९९६
आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६
पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६
सोमवार, दि. २० ऑक्टोबर २०२५। युगाब्द ५१२७ । वर्ष : ३१। अंक : ७५। मूल्य ४ रुपये। पृष्ठे ८+४=१२ । जळगाव, धुळे, नंदुरबार येथे उपलब्ध




## विचारपुष्प



मी कोण आहे? मी एक आत्मा आहे, शरीर एक क्षेत्र आहे. सृष्टीमध्ये बदल होत असतो. परंतु हा बदल वरवर आहे. सृष्टीमध्ये एक तत्त्व अपरिवर्तनीय आहे, ते म्हणजे परमात्मा. आत्मा आणि परमात्मा एक आहे. 'यत् पिंडे तत् ब्रह्मांडे' या तत्त्वामुळे व्यक्तीपासून परमात्म्यापर्यंत आपण सर्व एकमेकांशी जोडले गेलो आहोत. या दोहोंमध्ये एकात्म भाव अस्तित्वात आहे.

**- कुप्प्. सी. सुदर्शनजी**
रा. स्व. संघाचे पाचवे सरसंघचालक

# सुरक्षा दलाच्या निशाण्यावर गणपती, देवजी आणि हिडमा

## २७१ माओवाद्यांच्या आत्मसमर्पणाने मोडले कंबरडे

**◆ जगदलपूर, १९ ऑक्टोबर**

माओवादाच्या इतिहासात संपलेला आठवडा अतिशय महत्त्वाचा ठरला. मागील तीन दिवसांत छत्तीसगड आणि महाराष्ट्रात केंद्रीय समितीचा सचिव आणि समितीचा सदस्य रूपेश उर्फ विकल्पसह २७१ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केल्याने माओवादाचे कंबरडे मोडले. आता सुरक्षा दलाच्या निशाण्यावर गणपती, केंद्रीय समितीचा महासचिव देवजी आणि दंडकारण्य क्षेत्रीय समितीचा प्रमुख माडवी हिडमा असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

छत्तीसगडगमधील बस्तर, कोंडागाव आणि दंतेवाडा जिल्हे अगोदरच माओवादाच्या प्रभावातून मुक्त झाले आहेत. नारायणपूर, कांकेर आणि अबुझमाडच्या जंगलांमध्येही माओवादाचा प्रभाव जवळपास संपुष्टात आला आहे. त्याच प्रकारे बस्तरच्या अर्ध्यापेक्षा जास्त भूभागावरून माओवाद्यांनी नियंत्रण गमावले आहे. सध्या केवळ दक्षिण बस्तरमधील बिजापूर आणि सुकमा जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात माओवादी शिल्लक राहिले आहेत.

माओवादी शिल्लक असलेल्या भागांत दबाव निर्माण करण्याची सुरक्षा दलांची रणनीती आहे. पॉलिट ब्युरो सदस्य आणि सेंट्रल मिलिट्री कमिशनचा प्रमुख देवजी, माजी महासचिव गणपती, केंद्रीय समिती सचिव आणि बटालियन प्रभावी हिडमा, तेलंगणा राज्य समितीचा सचिव चंद्रन्ना आणि डीकेएसझेडसी सदस्य बारसे देवा हे आता माओवाद्यांचे नेतृत्व करीत आहेत.

डीकेएसझेडसीच्या अंतर्गत येणाऱ्या सुकमाच्या दक्षिण बस्तर डिव्हिजन (कोंटा, केरलपाल, जमरगुंडा, पामेड) आणि बीजापूरची पश्चिम डिव्हिजन (गंगालूर, मद्देड, नॅशनल पार्क क्षेत्र) या परिसरात ३०० माओवादी शिल्लक आहेत. मार्च २०२६ पूर्वी माओवाद्यांचा सफाया करण्यासाठी दक्षिण आणि पश्चिम बस्तरमध्ये सुरक्षा दलांच्या छावण्या उभारल्या जात असल्याची माहिती पोलिस महानिरीक्षक पी. सुंदरराज यांनी दिली.


गणपती


देवजी


हिडमा

### १०० माओवादी आज येणार शरण

**छत्तीसगडमधील उदंती एरिआ कमिटीत सक्रिय माओवादी सोमवारी शरणागती पत्करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. भूपतीसोबत त्याच्या ६१ साथीदारांनी आणि रूपेशसोबत २१० माओवाद्यांनी शरणागती पत्करल्यानंतर आता उदंतीतील माओवादी शरण येणार आहेत.**

### पिलसाय कश्यपचे आत्मसमर्पण

माओवादी सुनीलने जारी केलेल्या पत्रात माओवादी संघटनेत निराशाजनक वातावरण असल्याचे संकेत मिळतात. अशा परिस्थितीत शिरावर एक लाख रुपयाचे बक्षीस असलेला कोंडागाव जिल्ह्यातील माओवादी पिलासाय कश्यपने आत्मसमर्पण केले. दुसरीकडे कोंटा पोलिस आणि सीआरपीएफने संयुक्त कारावई करीत एक लाख रुपयाचे बक्षीस असलेला माओवादी मुचाकी मंगाला अटक केली.

# खडगेंच्या मतदारसंघात रा. स्व. संघाचे पथसंचलन

## काँग्रेस सरकारला उच्च न्यायालयाचा झटका



**◆ बंगळुरू, १९ ऑक्टोबर**

रा. स्व. संघाच्या कार्यक्रमांना सार्वजनिक ठिकाणांवर कार्यक्रम न करू देण्याचा निर्णय घेणाऱ्या काँग्रेस सरकारला कर्नाटक उच्च न्यायालयाने झटका दिला आहे. या निर्णयामागील काँग्रेसचे नेते आणि काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांचे पुत्र प्रियांक खडगे यांचा मतदारसंघ चित्तपूर येथे पथसंचलनासाठी उच्च न्यायालयाने परवानगी दिली आहे.

कायदा आणि सुव्यवस्थेचे कारण समोर करीत चित्तपूर येथील अधिकाऱ्यांनी रा. स्व. संघाच्या पथसंचलनाला परवानगी नाकारली होती. मात्र, न्यायालयाने ती दिली. हा कर्नाटकातील काँग्रेस सरकारसाठी मोठा झटका मानला जात आहे. रा. स्व. संघ १९ ऑक्टोबर रोजी येथे पथसंचलनाचा कार्यक्रम घेणार होती. मात्र, सरकारी अधिकाऱ्यांनी परवानगी नाकारली होती. त्यानंतर या निर्णयाच्या विरोधात संघाचे स्वयंसेवक अशोक पाटील यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. रविवारी आयोजित केलेल्या पथसंचलनाला परवानगी न देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेला त्यांनी याचिकेतून आव्हान दिले होते.

**कर्नाटक सरकारला फटकारले**

सरकारने प्रत्येकाच्या भावनांचा आदर केला पाहिजे, असे निरीक्षण नोंदवताना न्या. एमजीएस कमल यांनी हे प्रकरण कोणत्या पद्धतीने सामावून घेत त्याचे नियोजन कसे केले, असा प्रश्न उपस्थित करीत राज्य सरकारला फटकारले. त्यानंतर रा. स्व. संघाला २ नोव्हेंबर रोजी चित्तपूर येथे पथसंचलन आयोजित करण्याची परवानगी दिली.

**रॅलींमध्ये संघर्ष होण्याची वर्तवली शक्यता**

चित्तपूर येथे रविवारी रा. स्व. संघाचे पथसंचलन तर, भीम आर्मी आणि भारतीय दलित पँथरने रॅली आयोजित केली. त्यात संघर्ष होऊन सार्वजनिक शांतता धोक्यात येऊ शकते, अशी शक्यता पोलिसांनी अहवालात वर्तवली होती. अलिकडेच मंत्री प्रियांक खडगे यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. त्यामुळे चित्तपूर येथे तणाव वाढल्याचा दावा केला होता.

### भाजपाने केले निर्णयाचे स्वागत

कर्नाटक भाजपाचे अध्यक्ष विजयेंद्र येदीयुरप्पा यांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले आणि या निर्णयाने संविधानाचे समर्थन केल्याचे म्हटले आहे. ज्या लोकांनी चित्तपूर येथे संघाच्या पथसंचलनावर गदा आणण्याचा प्रयत्न केला, त्यांना अपमान झेलावा लागला. लोकशाही व्यवस्थेत सत्तावादी शासनाला कोणतेही स्थान नसल्याचे स्पष्ट संदेश न्यायालयाने निकालातून दिला आहे. रात्रंदिवस संविधानाप्रती प्रतिबद्ध असल्याचा ढोल पिटणाऱ्या काँग्रेसला या माध्यमातून कठोर धडा देण्यात आला, अशी प्रतिक्रिया येदीयुरप्पा यांनी व्यक्त केली.

## महत्त्वाचे

### इंडिगोने दिली ३० नवीन विमानांची ऑर्डर



**नवी दिल्ली :** भारतातील सर्वांत मोठी विमान कंपनी इंडिगोची मूळ कंपनी इंटरग्लोब एव्हिएशनने एअरबसला आणखी ३० ए ३५०-९०० विमानांसाठी ऑर्डर दिली आहे. या नवीन ऑर्डरसह, कंपनीच्या एकूण वाईड-बॉडी विमानांच्या ऑर्डरची संख्या ६० झाली आहे. इंडिगोकडून एअरबसला मिळालेली ही ऑर्डर नवीन नाही. कंपनीने ७० एअरबस ए ३५०-९०० विमानांचे खरेदी अधिकार मिळवले होते. त्यापैकी ३० विमानांचे ऑर्डरमध्ये रूपांतर करण्यात आले आहे. इंडिगोने एप्रिल २०२४ मध्ये पहिल्यांदा ३० एअरबस ए ३५०-९०० विमानांसाठी ऑर्डर दिली. यामुळे कंपनीचा वाईड-बॉडी विभागात पहिला प्रवेश झाला. त्याच वेळी, कंपनीने भविष्यातील लांब पल्ल्याची उड्डाणे लक्षात घेऊन आणखी ७० ए ३५० फॅमिली विमानांचे खरेदी अधिकार मिळवले.

# तेजप्रतापवर आचारसंहिता उल्लंघन प्रकरणी गुन्हा दाखल

**◆ पाटणा, १९ ऑक्टोबर**

निवडणूक आयोगाने २०२५ च्या बिहार विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात आदर्श आचारसंहिता लागू केली आहे. दरम्यान, सोशल मीडियावर एक व्हिडीओ वेगाने व्हायरल होत आहे, ज्यामध्ये जनशक्ती जनता दलाचे नेते तेज प्रताप यादव यांच्या उमेदवारी अर्जादरम्यान पक्षाचे कार्यकर्ते एका खाजगी बोलेरो वाहनाला पोलिस स्टिकर आणि सायरन लाईट लावून प्रचार करताना दिसत आहेत.

व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर, पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. तपासात असे आढळले की वाहन पोलिसांचे नव्हते आणि त्यावर पोलिस स्टिकर आणि सायरन बेकायदेशीरपणे लावल्याने आचारसंहितेचे उल्लंघन झाले आहे.

वैशालीचे पोलिस अधीक्षक ललित मोहन शर्मा यांच्या सूचनेनुसार, महुआ विभागीय अधिकाऱ्याच्या लेखी अर्जावरून तेज प्रताप यादव यांच्याविरुद्ध महुआ पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

# राज्यात १६ लाख खोटे मतदार

## नेस्को मैदानावरील मेळाव्यात राज ठाकरे आक्रमक

**◆ मुंबई, १९ ऑक्टोबर**

आगामी निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मुंबईतील गोरेगाव नेस्को ग्राउंडवर आयोजित केलेल्या भव्य मेळाव्यात सत्ताधारी पक्षांवर आणि निवडणूक आयोगावर अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. राज्यातील सर्व मतदारयादी प्रमुख, गटप्रमुख आणि महत्त्वाचे पदाधिकारी या मेळाव्यासाठी उपस्थित होते.

राज ठाकरे म्हणाले की, या निवडणुकीत १६ लाख खोटे मतदार महाराष्ट्राच्या यादीत भरले आहेत. मुंबईत ८ ते १० लाख, ठाण्यात ८ लाख, असेच प्रत्येक जिल्ह्यात बोगस मतदार आहेत. १ जुलै रोजी त्यांनी यादी बंद करून टाकली आणि त्यात हा गोंधळ झाल्याचा आरोप त्यांनी केला. अशाप्रकारे निवडणुका होत असतील, तर हा राज्यातील जनतेचा आणि मतदारांचा अपमान आहे, असे ते म्हणाले.

**निवडणुकीत 'मॅच फिक्सिंग'**

राज ठाकरे म्हणाले की, मॅच फिक्सिंग झालेले आहे, तुम्ही मतदान द्या किंवा नको. मग सांगतात की, यांचा एक आमदार निवडून आला नाही, एक खासदार निवडून आला नाही. अरे कसा येणार, तुम्ही अगोदरच फिक्स करून ठेवले आहे, अशा शब्दांत त्यांनी सत्ताधाऱ्यांवर हल्ला चढवला.

राज ठाकरे म्हणाले की, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीचे २३२ आमदार निवडून आले. इतके मोठे आमदार निवडून आल्यानंतरही राज्यात सन्नाटा होता. कुठेही विजयी मिरवणुका नव्हत्या, जल्लोष नव्हता. मतदार अवाक् झाले होते.

# सूर्याच्या चंद्रावरील परिणामाचे चांद्रयानाने केले निरीक्षण

### इस्रोचे मोठे यश

**◆ बंगळुरू, १९ ऑक्टोबर**

भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) एक मोठे यश मिळवले आहे. इस्रोने अहवाल दिला आहे की, त्यांच्या चांद्रयान-२ चंद्र ऑर्बिटरने पहिल्यांदाच चंद्रावर सौर कोरोनल मास इजेक्शनचा (सीएमई) परिणाम पाहिला आहे.

हा शोध चंद्राच्या वायुमंडलीय रचना एक्सप्लोरर-२ (चेस-२) वापरून करण्यात आला, जो ऑर्बिटरच्या वैज्ञानिक उपकरणांपैकी एक आहे. निरीक्षणातून असे दिसून आले की, जेव्हा सीएमईचा चंद्राच्या पृष्ठभागावर परिणाम झाला तेव्हा चंद्राच्या दिवसाच्या बाजूला असलेल्या बाह्य क्षेत्रातील एकूण दाब किंवा त्याच्या अतिशय पातळ वातावरणात लक्षणीय वाढ झाली.

इस्रोच्या मते, या घटनेदरम्यान तटस्थ अणू आणि रेणूंची एकूण संख्या (संख्या घनता) एका विशिष्ट क्रमाने वाढली. यामुळे दीर्घकालीन सैद्धांतिक मॉडेल्सची पुष्टी झाली, परंतु यापूर्वी कधीही ते थेट पाहिले गेले नव्हते. अंतराळ संस्थेने एका निवेदनात म्हटले आहे की, ही वाढ अशा परिणामाची भविष्यवाणी करणाऱ्या पूर्वीच्या सैद्धांतिक मॉडेलशी सुसंगत आहे, परंतु चंद्रयान-२ वर चेस-२ ने पहिल्यांदाच ती पाहिली आहे.

**कोरोनल मास इजेक्शन (सीएमई) म्हणजे काय?**

सूर्य हा आपला सर्वात जवळचा तारा आहे. तो आगीचा गोळा आहे, लाखो अंश सेल्सिअस गरम आणि पृथ्वीच्या लाखो पट आकाराचा आहे. सूर्याच्या पृष्ठभागावर नेहमीच हजारो स्फोट होतात. हे स्फोट चार्ज केलेले प्लाझ्मा, तीव्र तापमान आणि तेथे उपस्थित असलेल्या चुंबकीय क्षेत्रांमुळे होतात. यामुळे एक प्रचंड वादळ निर्माण होते आणि मोठ्या प्रमाणात चार्ज केलेले प्लाझ्मा अवकाशात सोडले जाते. याला कोरोनल मास इजेक्शन म्हणतात.

### ही संधी विशेष का आहे?

खरे तर, निरीक्षणाची संधी खूपच दुर्मिळ आहे आणि गेल्या वर्षी १० मे रोजी सूर्यापासून चंद्राकडे कोरोनल मास इजेक्शनची मालिका बाहेर पडली तेव्हा ती सुरू झाली. या शक्तिशाली सौर क्रियाकलापामुळे चंद्राच्या पृष्ठभागावरील अणू तुटून चंद्राच्या बाह्यमंडलात गेले, ज्यामुळे त्याची घनता आणि दाब तात्पुरता वाढला. इस्रोने म्हटले आहे की, या थेट निरीक्षणामुळे चंद्राच्या वातावरणावर सौर क्रियाकलापांचा कसा परिणाम होतो, याबद्दल मौल्यवान माहिती मिळते, जी भविष्यातील मानवी वसाहती आणि चंद्रावरील वैज्ञानिक तळांच्या नियोजनासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकते.

### जेईई मेनच्या तारखा जाहीर

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय परीक्षा संस्था अर्थात एनटीएने जेईई मेन-२०२६ परीक्षेच्या तारखा जाहीर केल्या आहेत. ही परीक्षा जानेवारी आणि एप्रिल अशा दोन सत्रात घेतली जाणार आहे. एनटीएनुसार, पहिल्या सत्रातील परीक्षा २१ ते ३० जानेवारी दरम्यान होणार आहे. यासाठी नोंदणी प्रक्रिया ऑक्टोबरपासूनच अधिकृत संकेतस्थळावर सुरू झाली आहे. दुसऱ्या सत्रातील परीक्षा १ ते १० एप्रिलदरम्यान असून, त्यासाठीची नोंदणी जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यापासून सुरू होईल. यावेळी जास्तीत-जास्त संख्येने विद्यार्थ्यांना परीक्षा देता यावी यासाठी परीक्षा केंद्रांची संख्या वाढवण्यात आली आहे.

**श्री क्षुधाशांती सेवा संस्था**
नवीन बसस्टँड व गांधी बगीच्या जवळ जळगाव. फोन २२२८९९६
शुध्द व सकस आहार अत्यल्प दरात सर्व समाजास पुरविण्यास कटिबध्द संस्था
सकाळी १० ते ९
(जेवण पार्सल उपलब्ध)
सोमवार, दि. २० ऑक्टोबर २०२५
लसुण चटणी, शेंगदाणे चटणी, वेफर्स, उपवास चिवडा उपलब्ध
वरण, भात, बट्टी, गंगाफळाची भाजी ५० रु.
वरण, बट्टी ३० रु.
सँडविच भाकरी २० रू. नग
पोळी भाजी १५ रु. प्लेट
मेथी पराठा व चटणी १० रू.
मसाला पुरी २० रु.
पार्सल मिळेल.
सर्व पार्सलमध्ये उपलब्ध आहे
ऑर्डर- एम.एम.पाटील
मो.क्र. ९३७२३२६४६० वर नोंदवावी.
केशवस्मृती सेवासंस्था समूहाचा उपक्रम
सर्व प्रकारच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील.

# १८६ लक्झरी कारची ठोक खरेदी; 'ग्रुप डील'द्वारे २१ कोटींची बचत!

### जैन समुदायातील सदस्यांची कमाल

**◆ अहमदाबाद, १९ ऑक्टोबर**

जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनच्या (जितो) नेतृत्वाखाली जैन समुदायाच्या सदस्यांनी १८६ लक्झरी कार खरेदी केल्या. जैन समुदायाने १८६ लक्झरी कार खरेदी करून सर्वांना केवळ आश्चर्यचकित केले नाही तर, या ग्रुप डीलद्वारे २१ कोटी रुपयांहून अधिक रुपयांची बचत देखील केली.

जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनच्या या उपक्रमामुळे समुदायाला फायदाच झाला नाही तर, डीलर्सना मोठ्या प्रमाणात विक्रीचा विश्वासही मिळाला. लक्झरी कारवरील महत्त्वपूर्ण सवलतींनंतर, आता इलेक्ट्रॉनिक्स, फार्मास्युटिकल्स आणि दागिन्यांसह इतर क्षेत्रांमध्ये अशाच प्रकारच्या ग्रुप खरेदी डीलचा विचार करीत आहे.

जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशनचे (जितो) भारतभर अंदाजे ६५ हजार सदस्य आहेत. त्यांच्या व्यावसायिक वारशासाठी प्रसिद्ध असलेल्या, जैन समुदायाने बीएमडब्ल्यू, ऑडी आणि मर्सिडीज-बेंझसह १८६ महागड्या लक्झरी कार खरेदी केल्या. यापैकी बहुतेक लक्झरी कार गुजरातमधील रहिवाशांनी खरेदी केल्या.

'जितो'चे उपाध्यक्ष हिमांशू शाह यांनी लक्झरी ब्रॅण्ड्ससोबतचा हा करार अद्वितीय असल्याचे वर्णन केले. त्यांनी सांगितले की, संस्थेने बीएमडब्ल्यू आणि मर्सिडीजसारख्या टॉप ब्रँड्सच्या १५ डीलर्ससोबत जवळून काम केले आहे जेणेकरून त्यांच्या सदस्यांसाठी चांगल्या किमतींवर वाटाघाटी होतील.

शाह यांनी सांगितले की, 'जितो'ने फक्त एक सुविधा देणारे म्हणून काम केले आणि या करारातून त्यांना कोणताही फायदा झाला नाही. खरेदी केलेल्या लक्झरी कारची किंमत ६० लाख ते १.३ कोटी पर्यंत होती. त्यांनी सांगितले की, ही वाहने जानेवारी ते जून दरम्यान खरेदीदारांना देण्यात आली. यामुळे त्यांच्या सदस्यांसाठी सवलतींमध्ये २१ कोटी रुपयांची बचत झाली.

### प्रत्येक सदस्याची ८ ते १७ लाखांपर्यंत बचत



यानंतर इतर सदस्यांनीही कार खरेदी करण्यास सुरुवात केली. एकूण १८६ कार खरेदी करण्यात आल्या. यामुळे २१ कोटी रुपयांची बचत झाली. सरासरी प्रत्येक सदस्याने ८ लाख ते १७ लाख रुपयांची बचत केली. जी कुटुंबातील एका सदस्यासाठी दुसरी कार खरेदी करण्यासाठी पुरेशी होती.

### कोणी सुरू केले?

**समुदायातील नितीन जैन यांनी हा उपक्रम सुरू केला, जेव्हा काही सदस्यांनी त्यांच्या क्रयशक्तीचा वापर करून कार डीलर्सशी सवलतींवर वाटाघाटी करण्याची कल्पना मांडली. जैन यांनी स्पष्ट केले की यामध्ये कोणतेही मार्केटिंग खर्च नसल्यामुळे, कार उत्पादकांनीही याला एक फायदेशीर परिस्थिती मानली. हा उपक्रम समुदायातील काही सदस्यांसह सुरू झाला आणि मोठ्या सवलतींबद्दल ऐकल्यानंतर लवकरच त्यात रस निर्माण झाला.**


# २९ लाख दिव्यांनी उजळली अयोध्या

## सलग नवव्या वर्षी गिनीज बुकमध्ये नोंद; दोन विक्रम घडले

**अयोध्या, १९ ऑक्टोबर**

दिवाळीच्या पर्वावर भगवान श्रीराम अयोध्येत पोहोचले. त्यांच्या आगमनानंतर संपूर्ण अयोध्या उजळून निघाली. प्रकाशोत्सवादरम्यान अयोध्येने दोन जागतिक विक्रम प्रस्थापित केले. पहिल्या दिवशी, राम की पैडीच्या ५६ घाटांवर २६.११ लाख दिवे लावण्यात आले. ड्रोन वापरून दिव्यांची मोजणी केल्यानंतर, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्सच्या वतीने स्वप्नील डांगरेकर आणि सल्लागार निश्चल बारोट यांनी नवीन विक्रमाची घोषणा केली.

हा सलग नववा जागतिक विक्रम आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, प्रभारी मंत्री सूर्य प्रताप शाही आणि इतरांनी या उल्लेखनीय आणि अविस्मरणीय क्षणाचे साक्षीदार झाले. दुसरा विक्रम शरयू आरतीचा होता, ज्यामध्ये २१०० वेदाचार्य एकाच वेळी सहभागी झाले होते. हा अनोखा विक्रम योगी सरकारने दुसऱ्यांदा साध्य केला आहे. प्रकाशोत्सवाच्या या दुर्मिळ दृश्याचे साक्षीदार होण्यासाठी देशभरातून लोकांनी गर्दी केली होती. मोठ्या संख्येने लोक उपस्थित होते. दिव्यांच्या उत्सवानंतर, भव्य आतषबाजीचे प्रदर्शन आणि ड्रोन शो झाला. सुरक्षेसाठी १० हजार जवान दीपोत्सव सुरक्षितपणे पार पडावा यासाठी सुमारे १० हजार जवान तैनात करण्यात आले होते. गुप्तचर संस्था विविध स्वरूपात माहिती शोधत होत्या. प्रत्येक कोपऱ्यावर पोलिस, पीएसी आणि आरएएफचे कर्मचारी सतर्क राहिले. कार्यक्रम सुरक्षितपणे संपल्याने सुरक्षा यंत्रणांनी सुटकेचा निःश्वास सोडला. प्रकाशोत्सवासाठी, अयोध्या धाम येथील सुरक्षा व्यवस्था १८ झोन आणि ४२ सेक्टरमध्ये विभागण्यात आली होती. जिल्ह्याव्यतिरिक्त, लखनौ, गोरखपूर, कानपूर आणि वाराणसी येथील पोलिस कर्मचारी तैनात करण्यात आले होते.



## थोडक्यात महत्त्वाचे...



### पटेल पॉलिटेक्निकमध्ये पालक मेळावा उत्साहात

**शिरपूर** : आर. सी. पटेल कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड पॉलिटेक्निकतर्फे राजगोपाल भंडारी सभागृहात पालक मेळावा उत्साहात झाला. प्राचार्य डॉ. नवीन हासवाणी यांनी विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या नवनवीन उपक्रमांबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांना फक्त इंजिनिअर न बनवता एक उत्तम व्यक्ती बनने गरजेचे आहे, असे सांगत पालकांनी या वयातील विद्यार्थ्यांबरोबर मित्राप्रमाणे वागावे व त्यांच्या भावनिक विकासाकडे लक्ष द्यावे, असे आवाहन केले. या वेळी पालकांनी काही नवीन संकल्पना मांडल्या. जेणेकरून विद्यार्थ्यांचे हित साधले जाईल. या वेळी प्राचार्यांनी त्यांच्या सूचना व संकल्पनांवर अंमलबजावणी केली जाईल, असे आश्वासन दिले. प्राचार्य डॉ. नवीन हासवाणी, प्रा. संदीप दुट्टे यांनी संयोजन केले.



### वाघाडीच्या सीबीएसई स्कूलमध्ये 'जॉय ऑफ गिव्हिंग'

**शिरपूर** : वाघाडी येथील जयश्रीबेन अमरिशभाई पटेल सीबीएसई स्कूलतर्फे 'जॉय ऑफ गिव्हिंग' उपक्रम उत्साह, आनंद आणि आत्मीयतेच्या वातावरणात झाला. उपक्रमांतर्गत पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी खिशातून, पालकांच्या मदतीने आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनात दैनंदिन वापराच्या विविध वस्तू, खाद्यसामग्री, साबण, टूथपेस्ट, ब्रश, शैक्षणिक साहित्य जमा केले.विद्यार्थ्यांनी असली येथील आर. सी. पटेल आश्रमशाळेत भेट देऊन तेथील विद्यार्थ्यांशी संवाद साधला व आवश्यक वस्तू भेट दिल्या. तसेच शिरपूरमधील आर. सी. पटेल आश्रमशाळेत जाऊन भेटवस्तू दिल्या. तेथील मुलांबरोबर वेळ घालवला. गाणी, खेळ आणि संवादाद्वारे 'देण्यातच आनंद आहे' हा संदेश अनुभवला. उपक्रम मुख्याध्यापिका मेघा मुंगसे यांच्या मार्गदर्शनात राबविण्यात आला.




### धुळ्यातील स्कूल ऑफ फार्मसीतर्फे क्लायंथा रिसर्चला भेट

**धुळे** : येथील एसव्हीकेएम- एनएमआयएमएस ग्लोबल युनिव्हर्सिटी, स्कूल ऑफ फार्मसी अँड टेक्नॉलॉजी मॅनेजमेंटतर्फे क्लायंथा क्लायंथा रिसर्चला (बडोदा, गुजरात) औद्योगिक भेट देण्यात आली. त्यात एम. फार्मसी व बी. फार्मसीच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. भेट सत्रात गुड क्लिनिकल प्रॅक्टिसेस (जीसीपी) विषयावरील प्रशिक्षण घेण्यात आले. श्रीमती परदेशी यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी कंपनीतील विविध तज्ज्ञांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांना क्लायंथा रिसर्चच्या अत्याधुनिक संशोधन केंद्राची प्रत्यक्ष भेट देण्यात आली. डॉ. समीर गोयल यांनी अशा शैक्षणिक आणि औद्योगिक सहयोगातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते, असे मत व्यक्त केले. डॉ. किरण आहेर, डॉ. गिरिजा भवर, प्रा. करण शर्मा, प्रा. पूर्वज बरोटे यांनी औद्योगिक भेटीचे नियोजन केले.

### लोककलावंत संतोष ईशी यांचे निधन

**मालपूर (शिंदखेडा)** : गावातील संतोषीमातानगर परिसरातील रहिवासी



व लोककलावंत, महाराष्ट्रभूषण, खान्देशभूषण पुरस्काराने सन्मानित संतोष ईशी- कोडदेकर (वय ८१) यांचे रविवारी (१९ ऑक्टोबर) सकाळी सहाच्या सुमारास अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, जावई, नातवंडे, असा परिवार आहे. विलास ईशी व सुरेश ईशी यांचे ते वडील होत.

खान्देशातील प्रतिभासंपन्न लोककलावंत संतोष ईशी- कोडदेकर यांच्या जाण्याने खान्देशातील कडवा खलनायक हरपला. शासन तसेच सामाजिक संघटनांनी अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी साकारलेल्या असंख्य भूमिका लाखो लोककलाप्रेमींच्या मुखातून पुढच्या पिढ्यांना सहज ऐकायला मिळतील, असे अजरामर कलाकार, कसदार अभिनेते, आपल्या करड्या व जरब बसविणाऱ्या नजरेच्या कटाक्षाने व दमदार पहाडी आवाजातून श्रोत्यांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा नायक, खलनायक आणि आपल्या करुणेच्या अभिनयातून साईबाबांना मूर्त रूप देणारे सर्जनशील कलावंत ते होते. तमाशासोबत शेती, गोपालन अशा व्यवसायात रमल्यानंतर आयुष्याचा उत्तरार्ध एखाद्या संन्यस्त योग्याप्रमाणे अध्यात्म व ईश्वर चिंतनात व्यतित करणाऱ्या अशा मालपूरच्या सांस्कृतिक इतिहासातील ध्रुवताऱ्यास साश्रुनयनांनी मालपूरकरांनी अखेरचा निरोप दिला.

## निधन वार्ता



### शैला लड्ढा

**जळगाव** : शहरातील एम. जे. कॉलेज परिसरातील सुयोग कॉलनीतील सेंट जोसेफ शाळेमागील रहिवासी शैला राधेश्याम लड्ढा (वय ६५) यांचे १९ ऑक्टोबर रोजी पहाटे निधन झाले. दुपारी एक वाजता नेरीनाका वैकुंठधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्या सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि.चे कार्यकारी संचालक रवींद्र लड्ढा यांच्या वहिणी, तर सचिन, ललित, रुपम लड्ढा यांच्या काकू होत.



### आशाबाई वाघ

**जळगाव** : येथील हरेश्वर नगर, रिंग रोड परिसरातील रहिवासी आशाबाई कमलाकर वाघ (वय ८०) यांचे रविवार, दि.१९ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या किरण वाघ व अनुभूती शाळेतील शिक्षिका वैशाली दुसाने यांच्या आई होत.



### सुपडू सोनवणे

**भुसावळ** : वरणगाव येथील हनुमान व्यायामशाळेचे ज्येष्ठ संचालक सुपडू सोनवणे (पहेलवान) (वय ७४) यांचे रविवार, दि. १९ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवडे असा परिवार आहे. महेश, पप्पू सोनवणे यांचे ते वडील होत.



# जुनी पेन्शनसंदर्भात अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करा

## संघटनेतर्फे आमदार अमोल पाटील यांना निवेदन

**पारोळा** : जुनी पेन्शनसंदर्भात हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करावा, अशी मागणी करणारे निवेदन जुनी पेन्शन योजना संघटनेतर्फे आमदार अमोल पाटील यांना देण्यात आले.

माध्यमिक शाळांमध्ये कार्यरत शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या या १ नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या असून ते कर्मचारी ज्या शाळा व तुकड्यांवर नियुक्त आहेत अशा शाळा तथा तुकड्यांना १०० टक्के अनुदान हे १ नोव्हेंबर २००५ नंतर आलेले आहे. शासनाच्या ध्येय धोरणानुसार २००५ पूर्वीच्या राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू झाली, परंतु राज्यातील माध्यमिक शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आजही यापासून वंचित आहेत. राज्यातील जवळपास २६ हजार शिक्षक शिक्षकेतरांना जुनी पेन्शन योजना मिळेल, त्यासाठी येणाऱ्या विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनात आपण शिक्षकांचे प्रतिनिधी म्हणून तारांकित प्रश्न उपस्थित करून न्याय मिळवून द्यावा यासंदर्भात पारोळा भडगाव एरंडोल मतदारसंघाचे आमदार अमोल चिमणराव पाटील यांना संघटनेतर्फे निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी जुनी पेन्शन योजना संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. शांताराम पाटील माध्यमिक पतपेढी जळगावचे संचालक सचिन विठ्ठलराव पाटील शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे गोरख सूर्यवंशी दीपक भावसार, मुख्याध्यापक अशोक भामरे, कमलेश देवरे, विजय बडगुजर, सुरेश पाटील, योगेश पाटील, वाल्मीक पाटील, चंद्रकांत पाटील, शैलेंद्र भावसार, विश्वास वाघ, एन. डी. पाटील, शानाभाऊ पाटील, योगेश बोरसे, अनिल पवार, हेमराज पाटील, संदीप पवार, भरत पाटील, सुरेश पाटील, साहेबराव महाजन, भटू चौधरी, सतीश लोहार, संजय चौधरी, संदीप दाणेज, सुनील धनराळे, सतीश पाटील, श्रीमती अनिता चौधरी, देविदास पाटील, रवींद्र पाटील आदी उपस्थित होते.

# धुळे एसव्हीकेएम अभियांत्रिकीला 'वर्ल्ड स्टँडर्ड्स डे'मध्ये गौरव

## विद्यार्थ्यांना तृतीय स्थान; डॉ. योगेश सोनवणे यांना 'सर्वोत्कृष्ट रिसोर्स पर्सन'

**धुळे** : येथील एसव्हीकेएम अभियांत्रिकी महाविद्यालयातील यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाने पुन्हा एकदा आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. ब्यूरो ऑफ इंडियन स्टँडर्ड्स (बीआयएस)तर्फे आयोजित 'वर्ल्ड स्टँडर्ड्स डे'निमित्त घेण्यात आलेल्या समस्या निराकरण प्रकरण अभ्यास स्पर्धेत संस्थेच्या विद्यार्थ्यांनी तृतीय स्थान पटकाविले.



स्पर्धा सुरत येथील हॉटेल ले मेरिडियन येथे घेण्यात आली. यात लोकेश पाटील, यज्ञेश पाटील, देवराज धनगर व जितेंद्र पाटील (तृतीय वर्ष), ध्रुव चौधरी व रितेश पगारे (द्वितीय वर्ष) यांनी संघ म्हणून सहभाग घेतला. या संघाने नवकल्पनाशीलता आणि सादरीकरण कौशल्य दाखवत तृतीय स्थान मिळविले. विजेत्या संघाला ब्यूरो ऑफ इंडियन स्टँडर्ड्स (बीआयएस) तर्फे १५०० रोख रक्कम, स्मृतिचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. संस्थेच्या अभिमानाचा आणखी एक क्षण म्हणजे, यांत्रिकी अभियांत्रिकी विभागाचे सहाय्यक प्रा. डॉ. योगेश सोनवणे यांना 'सर्वोत्कृष्ट रिसोर्स पर्सन - बीआयएस' हा पुरस्कार मिळाला. हा सन्मान एस. के. सिंह यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

## मेहरुण स्मशानभूमीत लवकर सुविधा : आयुक्तांची नागरिकांना ग्वाही

**जळगाव** : मेहरुण परिसरातील स्मशानभूमीत सुविधा नसल्याने नागरिकांना मनस्ताप होत आहे. सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी नागरिकांनी मनपा आयुक्तांना नुकतेच मागणी निवेदन सादर केले. लवकरच सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील,अशी ग्वाही आयुक्तांनी दिली.

स्मशानभूमीत सुरक्षा रक्षकाची नेमणूक, सीसीटीव्ही कॅमेरे, संरक्षण भिंत, सभा मंडपाचे बांधकाम या प्रलंबित विषयांना अंदाजपत्रकातून मंजुरी देऊन या कामांना सुरुवात केली जाणार आहे. प्रशासनाच्या सकारात्मक निर्णयाने नागरिकांनी सरणावर बसून आंदोलन करण्याचे तुर्तास



थांबविले आहे. यावेळी संदीप मांडोळे, ज्ञानेश्वर पाटील, संजय सपकाळे, गणेश पाटील आदि उपस्थित होते.

# सोयगाव बीडीओंची जरंडीला भेट ग्रामपंचायतीचा होणार कायापालट

**तभा वृत्तसेवा**
**सोयगाव, १९ ऑक्टोबर**

तालुक्यातील जरंडी येथे 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज' अभियानांतर्गत सुरू असलेल्या पहिल्या टप्प्यातील विकासकामांच्या पाहणीसाठी गटविकास अधिकारी शिवाजी यमूलवाड यांनी शुक्रवारी दुपारी दोन वाजता जरंडी येथे भेट दिली. या अभियानामुळे ग्रामीण जनतेचे जीवनमान उंचावून त्यांच्या जगण्यास शांतता आणि स्थैर्य प्राप्त व्हावे, असे प्रतिपादन त्यांनी या भेटीदरम्यान केले.



सरपंच स्वाती पाटील, उपसरपंच संजय पाटील, सदस्य मधुकर पाटील, दिलीप पाटील, वंदना पाटील, संजीवन सोनवणे यांनी यमूलवाड यांचे स्वागत केले. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी सुनील मंगरुळे यांनी पूर्ण झालेल्या, सुरू असलेल्या व अपूर्ण कामांची सविस्तर माहिती दिली. ग्राम पंचायतच्या वतीने गावात झालेल्या विविध कामांचा आढावा सादर केला.

प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात आयोजित चर्चासत्रात स्थानिक नागरिकांशी संवाद साधत अभियानातील अडचणींबाबत समाधानकारक उत्तरे दिली. ग्राम पंचायतींनी कर वसुली वेळेत पूर्ण करावी, घरकुलांची अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करावीत तसेच गावात प्लास्टिक वापरावर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात यावा,असे आवाहन त्यांनी केले.

तालुक्यात जरंडी ग्राम पंचायतच्यावतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज कार्यक्रमांतर्गत झालेल्या पहिल्या टप्प्यातील झालेल्या कामांची पाहणी पूर्ण झाली आहे. जरंडी गाव राज्यात अव्वल ठरणार असल्याचे गटविकास अधिकारी शिवाजी यमूलवाड यांनी सांगितले.

यावेळी प्रकल्पाधिकारी सुभद्रा सैवर, सरपंच स्वाती पाटील, उपसरपंच संजय पाटील, प्रमोद रावणे, पंचायत समितीचे माजी सदस्य संजीवन सोनवणे, मधुकर सोनवणे, संतोष पाटील, सतीश बाविस्कर, अंगणवाडी सेविका आदी उपस्थित होते.

## लाठी विद्यामंदिर पालक-शिक्षक वार्षिक सभेत नवीन कार्यकारिणी मंडळ जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ ऑक्टोबर**

भाऊसाहेब काशिनाथ लाठी विद्यामंदिराच्या पालक-शिक्षक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच उत्साहात पार पडली. अध्यक्षस्थानी पालक शिक्षक संघाच्या अध्यक्षा तथा मुख्याध्यापिका अंजली बागुल या होत्या. सुरुवातीला तिसरी व चौथीच्या विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागतगीत सादर केले. त्यानंतर सरस्वतीपूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सन २०२५-२६ साठी नवीन कार्यकारी मंडळाची बिनविरोध निवड करण्यात आली. त्यानुसार अध्यक्ष अंजली विजय बागुल, उपाध्यक्ष राकेश मच्छिंद्र बोरसे, चिटणीस मृणालिनी विश्वनाथ कोळी, सहचिटणीस भारती प्रमोद वाणी, विद्यार्थी प्रतिनिधी गौतमी संदीप वायकर यांची निवड करण्यात आली. यासभेत १५ पालक व सहा शिक्षक यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली.



## शिरपूरच्या आर. सी. पटेल इंग्रजी विद्यालयात खेळाडूंचा गुणगौरव

**शिरपूर** : येथील आर. सी. पटेल इंग्रजी माध्यमिक विद्यालयाच्या अनेक विद्यार्थ्यांचा विविध स्पर्धांमध्ये विशेष यश संपादन केल्याबद्दल गुणगौरव करण्यात आला.

जिल्हा शासकीय क्रीडा स्पर्धेत फुटबॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिस, रग्बी, कॅरम, बॉक्सिंग अशा विविध शासकीय क्रीडा स्पर्धांत जिल्हास्तरीय व विभागीयस्तरीय सुमारे ५५ विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल तसेच संस्थास्तरीय क्रिकेट, व्हॉलिबॉल, बॅडमिंटन, बास्केटबॉल, फुटबॉल या ॲम्बिशन स्पर्धांत सुमारे ६६ विद्यार्थ्यांनी विविध खेळात विशेष यश संपादन केल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला.

याप्रसंगी शिरपूर एज्युकेशन सोसायटी सचिव रेषा पटेल, संचालक अतुल भंडारी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. उमेश शर्मा, क्रीडा चेअरमन प्रीतेश पटेल, क्रीडा समन्वयक जे. पी. पाटील, प्राचार्य डॉ. अमोल परब, प्राचार्य सचिन पाटील, उपप्राचार्य जितेंद्र पाटील यांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. विविध क्रीडा स्पर्धांत यशस्वी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना क्रीडाशिक्षक अनुप चंदेल, राहुल स्वर्गे, क्रीडाशिक्षिका सुनीता पावरा यांचे मार्गदर्शन लाभले.

## पारोळा येथे वसंत बहार वार्षिक नियतकालिकचे प्रकाशन

**पारोळा** : येथील राणी लक्ष्मीबाई महाविद्यालयाच्या वार्षिक नियतकालिक वसंत बहारचे प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष ॲड.वसंतराव मोरे, संध्या मोरे, संचालिका तनुजा मोरे, प्राचार्य डॉ. व्ही.आर.पाटील यांच्या हस्ते झाले.

संपादक डॉ. डी. एच. राठोड, कनिष्ठ विभागाच्या उपप्राचार्य डॉ. व्ही. एस.पाटील, प्रा. पी. पी. पाटील, सहसंपादक प्रा.एस.सी.पाटील, डॉ. एस.बी.सावंत तसेच डॉ.ए.एस.महाले, डॉ.एस.एन.पाटील, डॉ.सी.आर. पाटील, प्रा.ए.ए. मोरे, डॉ.आय. एस.पाटील, प्रा.पी.एस.कोळी उपस्थित होते. मुखपृष्ठ बेटी बचाव - बेटी पढाव या संकल्पनेवर आधारित आहे. मुखपृष्ठ मानसी अंभोरे या विद्यार्थिनीने साकारले आहे. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ॲड.वसंतराव मोरे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना नियतकालिकेत विविध विषयांवर मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये लेख, निबंध, कविता, चारोळ्या लिहिण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते व त्यांच्या सृजनशीलतेला वाव मिळत असून विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी निर्माण होत असल्याबद्दल संपादक मंडळाचे कौतुक केले.



## एरंडोल येथे तालुका, शहर काँग्रेस कमिटीची बैठक उत्साहात

**एरंडोल** : तालुका व शहर काँग्रेस कमिटीची बैठक एरंडोल येथे प्रा. आर.एस. पाटील यांच्या निवासस्थानी पार पडली.

यावेळी एरंडोल तालुका प्रभारी प्रकाश पाटील (बुलडाणा) यांनी शहरातील व जिल्हा परिषद-पंचायत समिती गटातील व गणातील इच्छुक उमेदवारांची मते जाणून घेतली व कामाला लागण्यास सांगितले. तालुकाध्यक्ष सुनील पाटील यांनी तालुक्यातील गट व गणाचा आढावा दिला. शहराध्यक्ष प्रा. आर.एस. पाटील यांनी शहराचा आढावा दिला.

यावेळी डॉक्टर सेल जिल्हाध्यक्ष डॉ. फरहाज बोहरी, जिल्हा सरचिटणीस राजेंद्र पाटील, महिला तालुकाध्यक्ष प्रतिभा पाटील, युवक काँग्रेस विधानसभा क्षेत्राध्यक्ष इम्रान सय्यद, शहराध्यक्ष अल्पसंख्याक विभाग आयाज भाई मुजावर, माजी शहराध्यक्ष संजय भदाणे, युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष चेतन पाटील, तालुका खजिनदार मदन भावसार, तालुका उपाध्यक्ष अब्दुल हक देशमुख, वकील सेल तालुकाध्यक्ष ॲड. हिंमतराव पाटील, युवा काँग्रेस शहराध्यक्ष जहांगीर शेख, कलावंत सेल तालुकाध्यक्ष आजिजखा कुर्बान खान, कासोदा शहराध्यक्ष समाधान चौधरी, कासोदा युवक तालुका उपाध्यक्ष असलम खा बेलदार, मुसा कादरी, पंडित महाजन, शेख सांडू, प्रणव पाटील, भरत पाटील, सागर पाटील, माजी संचालक शेतकरी संघ एरंडोल प्रकाश ठाकूर, हर्षद अली आदी उपस्थित होते.




# शिंदखेड्याला स्मार्ट शहर करणार

## पालकमंत्री रावल : पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन

**धुळे** : आगामी पाच वर्षांत शिंदखेड्याला स्मार्ट शहर म्हणून विकसित करण्यात येईल, असे प्रतिपादन पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले. पालकमंत्री रावल यांच्या हस्ते शनिवारी (१८ ऑक्टोबर) शिंदखेडा येथे महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत शिंदखेडा शहर पाणीपुरवठा योजना टप्पा क्रमांक-२चे भूमिपूजन करण्यात आले. या वेळी दोंडाईचा बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष महावीरसिंह रावल, माजी सभापती जिजाबराव पाटील, माजी सभापती पंकज कदम, संजीवनी सिसोदे, देविदास बोरसे, डी. एस. गिरासे, अनिल वानखेडे, माजी नगराध्यक्षा रजनी वानखेडे, मनोहर पाटील, मीरा पाटील, प्रकाश देसले, डॉ. रवींद्र देसले, सुभाष माळी, युवराज माळी, माजी उपनगराध्यक्ष प्रकाश देसले, दीपक देसले, संजयकुमार महाजन, मुख्याधिकारी श्रीकांत फागणेकर, माजी नगरसेवक विनोद पाटील, चेतन परमार, प्रवीण माळी आदी उपस्थित होते.

पालकमंत्री रावल म्हणाले की, शिंदखेडा शहरासाठी २१ कोटी रुपये खर्चून पाणीपुरवठा योजना मंजूर केली होती. त्यानंतर तिचा विस्तार टप्पा क्रमांक-२ मंजूर करण्यात आला. या योजनेच्या माध्यमातून शहराचा पाणीप्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. तसेच नागरिकांना पुरेसा जलपुरवठा होणार आहे. या योजनेचे काम तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. विविध योजनांच्या माध्यमातून नागरिकांना नळजोडण्या देण्यात आल्या आहेत. या टप्पा-१ अंतर्गत सुकवद येथे तापी नदीकाठावर अत्याधुनिक जॅकवेल बांधण्यात आला आहे, त्यातून थेट शिंदखेड्यापर्यंत मुख्य जलवाहिनी टाकण्यात आली आहे. यामुळे शिंदखेडा शहराला स्थिर आणि अखंड पाणीपुरवठा शक्य झाला आहे. तसेच शिंदखेड्यात अत्याधुनिक जलशुद्धीकरण प्रकल्प कार्यान्वित केला आहे. त्यासाठी दोन जलकुंभ उभारण्यात आले आहेत. एकूण ७२ किलोमीटरची जलवाहिनी टाकण्यात आली आहे. शिंदखेडा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध आहोत, असेही पालकमंत्री रावल यांनी नमूद केले.

## CLASSIFIEDS

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस सर्व वित्तीय संस्था, पतसंस्था यांना तसेच सागर सुनिल सारस्वत, हितेश सुनिल कासट, स्वप्नील सुभाष काबरे, सुनिल हिरालाल सारस्वत सर्व रा. अडावद, ता.चोपडा, जि. जळगांव, यांना व त्यांचे कुटूंबातील सर्व घटकांना, या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते ते खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन-मौजे अडावद, ता. चोपडा, जि. जळगांव ग्रा.पं. हद्दीतील रामचंद्र नगर मधील प्लॉट नं. २४, गट क्र. ११६३/१, एकुण क्षेत्र १४३.७१ चौ.मी. येणे प्रमाणेची प्लॉट मिळकतीची यांसी चतुःसिमा पुर्वेस प्लॉट न. २२, पश्चिमेस १२ मी. रस्ता, उत्तरेस गट क्र. ११५५, दक्षीणेस गट क्र. २३.**

वर वर्णित मिळकत ही सागर सुनिल सारस्वत, हितेश सुनिल कासट, स्वप्नील सुभाष काबरे, सुनिल हिरालाल सारस्वत सर्व रा.अडावद, ता. चोपडा, जि. जळगांव, यांचे मालकीची व कब्जे उपभोगातील असून सदरची प्लॉट मिळकत ही संपुर्णपणे निर्वेध व बोजेविरहित असल्याचा व ती मिळकत त्यांना कायम मालकी हक्काने विक्री करण्याचा संपूर्ण हक्क व अधिकार असल्याबाबतचा पुर्ण भरवसा व खात्री मिळकत धारक यांनी आमच्या अशिलास दिलेली आहे, त्यांचे म्हणण्यावरच पुर्ण विश्वास ठेवून आमचे अशील यांनी त्यांचेशी सदर मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचा सौदा केलेला असून बयाना दिलेला आहे.

तरी सदरहू नोटीसीने तमाम जनतेस, मिळकत धारक व त्यांचे कुटूंबातील घटकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकती संबंधी कोणाचाही काहीएक हक्क, हितसंबंध, बोजा, तारण, गहाण, जप्तीत, जामिनकीत, कर्ज प्रकरण, वाटणीस, वारसाहक्क, वहिवाट, संबंध दिशा व सिमाक्षेत्र वगैरेबाबत कुठलाही हक्क, दावा, अधिकार, वाद, कोणाचाही असल्यास खालील सही करणार यांच्याकडे ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिवसापासून ५ (पाच) दिवसाच्या आत समक्ष भेटून कागदपत्रे दाखवून लेखी हरकत नोंदवावी. तसा कोणताही आक्षेप अथवा हरकत वर नमूद मुदतीत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध, बोजेविरहित व क्लियर मार्केटेबल टायटलची आहे असे समजून आमचे अशील पुढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणतीही तक्रार आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही ही जाहीर नोटीस दिली असे.

सदरची नोटीस आमचे अशिल नामे सौ. संगिता विलास महाजन यांनी दिलेल्या माहितीवरुन व सुचनेवरुन योग्य ती फी घेऊन आमच्या मार्फत दिली असे.

**सही/-**
**अडावद**
**दिनांक १९/१०/२०२५**
जाहीर नोटीस देणारतर्फे वकील,
**रोनक स्वप्नील काबरा,**
रा. मेन रोड, श्री शंभू भवानी चौक, अडावद
जळगांव. मो.नं.८८८८०६३९७०


महाराष्ट्र चे सुप्रसिध्द ज्योतिषी
१५० वर्षाची परंपरा असलेले
**श्रीभृगूज्योतिषकेंद्र**
तुमच्या जिवनातल्या कोणत्याही कठिण समस्यांचे तुरंत १०१ % कायम स्वरुपी समाधान. जिथं समस्या आहेत, तिथ "निराकरण" ही आहे । गरज आहे, ती योग्य मार्ग दर्शनाची । समस्या, चिंता, निराशा, सोडा, एकदा येऊन प्रत्यक्ष भेटा. मंत्र-सिध्द रुद्राक्ष व रत्ने (खडे), मंत्रसिध्दसर्व यंत्र (अनुभव हिच खात्री) दादावाडी जळगाव
मो.९८२२७७४१५१,९८२३०४७८११

**विकणे आहे**
१४८, आदर्श नगर, जळगाव येथील ३ बी.एच.के. रो-हाऊस (१४०० स्के.फीट प्लॉट, १४०० स्के.फीट बांधकाम ) सर्वसोयी सुविधायुक्त, विकणे आहे.
संपर्क - ९८८१५७९१६७, ९४२२२१५६७४

घर असो वा शेत झेनिथ पाईप सेवेत...
भारतात प्रथम क्रमांकावर असलेले
बिर्लाचे एक उत्पादन
झेनिथ
स्टील पाईप
जी.आय.पाईप
एम.एस.पाईप


• अधिकृत विक्रेता •
संघवी पाईप
'केसर-कस्तुरी' २६,२७ नवीपेठ, जुन्या बस स्टँडसमोर गल्लीत जळगाव
2232641 TO 2232645



हे वृत्तपत्र सर्जना मीडिया सोल्युशन्स प्रा. लि. जळगाव, धुळे, नंदुरबारकरिता मुद्रक व प्रकाशक **संजय प्रभाकर नारखेडे** यांनी **पी.एम.उद्योग**, डी-८९, एम.आय.डी.सी., जळगाव, जि.जळगाव येथे छापून गाळा क्रमांक ४, गोलाणी मार्केट, जळगाव येथे प्रकाशित केले आहे. * संपादक : **चंद्रशेखर दिगंबर जोशी** यांची पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी आहे. ■आर.एन.आय.रजि.नं. ६५९६३/९६, ■पोस्टाचा परवाना रजि. क्र. जेएएल/८८/२०२४-२०२६.
■ फोन : ०२५७ - २२४२०३१, २२४२०३२, फॅक्स : २२४२०३३. ■E-mail - jaltbharat@gmail.com
■ editor.tarunbharat.jalgaon@gmail.com, ■E-paper : epaper.tarunbharatlive.com

# युद्धविरामावर अफगाण-पाकिस्तान सहमत

## दोहा येथील बैठकीत करारावर स्वाक्षरी ● कतारची माहिती

◆ **इस्लामाबाद, १९ ऑक्टोबर**

अफगाणिस्तान आणि पाकिस्तानने तत्काळ युद्धबंदीवर सहमती दर्शवली आहे, अशी माहिती कतारच्या परराष्ट्र मंत्रालयाने रविवारी दिली. एका आठवड्यापेक्षा अधिक चाललेल्या संघर्षानंतर दोन्ही देश युद्धबंदीवर सहमत झाले. या संघर्षात १२ पेक्षा जास्त लोक मारले गेले आणि शेकडो जखमी झाले आहेत.

कायमस्वरूपी शांतता आणि स्थैर्य कायम करण्यासाठी यंत्रणा स्थापन करण्यावर तसेच येत्या काही दिवसांत युद्धबंदी टिकवून ठेवण्यासाठी पुढील चर्चा आयोजित करण्यावर दोन्ही बाजूंनी सहमती दर्शवली, असे कतारने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

एका आठवड्यापेक्षा जास्त काळ चाललेल्या संघर्षात १२ पेक्षा जास्त लोक मारले गेले असून, दोन्ही बाजूंचे शेकडो जण जखमी झाले आहेत. अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील शिष्टमंडळ मागील काही वर्षांतील त्यांच्यातील सर्वांत घातक संकट सोडवण्यासाठी दोहा येथे चर्चेसाठी आले. तुर्की आणि कतार या चर्चेत मध्यस्थाची भूमिका पार पाडत आहे.



दोहा येथे युद्धबंदी करारानंतर हस्तांदोलन करताना अफगाणिस्तानचे संरक्षणमंत्री मुल्ला मुहम्मद याकुब आणि पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा मुहम्मद आसिफ

दोन्ही देशांनी त्यांच्या संरक्षण मंत्र्यांना या चर्चेचे नेतृत्व करण्यासाठी पाठवले होते. अफगाणिस्तानातून उद्‌भवणाऱ्या सीमापार दहशतवादाचा अंत करण्यासाठी आणि सीमेवर शांतता व स्थैर्य आणण्यासाठी त्वरित उपाययोजनांवर लक्ष केंद्रित केले जाईल, असे पाकिस्तानने म्हटले होते.

### अफगाणिस्तानच्या सार्वभौमत्वाचे उल्लंघन

पाकिस्तानी सैन्याकडून वारंवार गुन्हे होत आहे तसेच अफगाणिस्तानच्या सार्वभौमत्वाचे उल्लंघन केले जात असल्याची टीका तालिबान सरकारचे मुख्य प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी केली. पाकिस्तानचे अशा प्रकारचे कृत्य चिथावणीखोर मानले जाईल तसेच संघर्ष लांबवण्यासाठी जाणीवपूर्वक केलेल प्रयत्न म्हणून पाहिले जाईल, असा इशारा त्यांनी दिला. ■

यापूर्वी प्रत्येक देशाने परस्परांच्या आक्रमणाला प्रत्युत्तर देणार असल्याचे म्हटले होते. सीमावर्ती भागात हल्ले करणाऱ्या दहशतवाद्यांना आश्रय दिल्याचा आरोप अफगाणिस्तानने फेटाळला होता. इसिस आणि अल-कायदाचा गट पुन्हा उदयास येण्याचा प्रयत्न करीत असलेल्या प्रदेशात हिंसाचारामुळे आणखी अस्थिरता निर्माण होण्याची भीती असल्याने सौदी अरब आणि कतारसह प्रादेशिक शक्तींना शांततेचे आवाहन केले आहे.

### पाकिस्तानने दिली हल्ल्याची कबुली

शत्रुत्व थांबवण्यासाठी ४८ तासांची युद्धबंदी शुक्रवारी सायंकाळी संपली. काही तासांनंतर पाकिस्तानने सीमेपलीकडून हल्ला केला. अफगाणिस्तानच्या पूर्व पक्तिका प्रांतातील दोन जिल्ह्यांवर हल्ले केल्याची कबुली पाकिस्तानी सुरक्षा अधिकाऱ्यांनी दिली. हे लक्ष्य दहशतवादी हाफिज गुल बहादूर गटाचे लपण्याचे ठिकाण होते, असा दावा या अधिकाऱ्याने नाव न जाहीर करण्याच्या अटीवर केला. खैबर पख्तुनख्वातील मीर अली येथे झालेल्या बॉम्बस्फोटाला हे उत्तर असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. ■

# तिकीट नाकारल्याने इच्छुकाने फाडले स्वतःचेच कपडे

## लालूंच्या घरासमोर लोळून लोळून रडले नेते

◆ **पाटणा, १९ ऑक्टोबर**

राष्ट्रीय जनता दलाचे प्रमुख लालू प्रसाद यादव यांच्या निवासस्थानाबाहेर रविवारी एक नाट्यमय दृश्य पाहायला मिळाले. राजदचे ज्येष्ठ नेते आणि मधुबन विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेले मदन शाह यांना पक्षाने तिकीट नाकारले. यानंतर त्यांचा भावनिक उद्रेक पाहायला मिळाला. तिकीट नाकारल्यामुळे निराश झालेल्या मदन शाह यांनी स्वतःचा कुर्ता फाडला आणि लालू प्रसाद यादव यांच्या घरासमोरच रस्त्यावर लोळून मोठ्याने रडले. या प्रकारामुळे लालू प्रसाद यांच्या निवासस्थानाबाहेर गोंधळ उडाला. दरम्यान, ही घटना व्हिडीओमध्ये कैद झाली असून, सोशल मीडियावर ती मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

मदन शाह यांनी आरोप केला आहे की, त्यांनी तिकिटासाठी पैसे देण्यास नकार दिल्याने त्यांना उमेदवारी नाकारण्यात आली. थेट आरोप करताना त्यांनी राज्यसभा खासदार संजय यादव यांचे नाव घेतले. पक्षाने माझ्यासारख्या प्रामाणिक आणि कष्टाळू कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष केले आहे. ते आता पैसे देणाऱ्यांना प्राधान्य देत आहेत, असे मदन शाह रडत रडत म्हणाले. दुसऱ्या एका व्हिडीओमध्ये मदन शाह, लालू प्रसाद यादव यांच्या पाटण्यातील निवासस्थानाबाहेर जाऊन त्यांच्या गाडीचा पाठलाग करण्याचा प्रयत्न करताना दिसत आहेत. अखेर सुरक्षा कर्मचाऱ्यांना हस्तक्षेप करावा लागला आणि त्यांनी शाह यांना परिसरातून हटवले. मदन शाह म्हणाले की, त्यांचे सरकार येणार नाही. तेजस्वी खूप गर्विष्ठ आहेत, लोकांना भेटत नाहीत. तेच तिकिटांचे वाटप करीत आहेत. मी इथे मरण्यासाठी आलो आहे. लालू यादव माझे गुरू आहेत. त्यांनी मला तिकीट देण्याचे सांगितले होते. पण, माझ्याऐवजी भाजपा एजंट संतोष कुशवाह यांना तिकीट दिले.





लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांनी रविवारी उत्तराखंडातील पिथोरगढ येथील लष्कराच्या तळाला भेट देत सैन्यातील माजी अधिकाऱ्यांसोबत संवाद साधला

# दिवाळीत दिवे आणि मेणबत्त्यांवर इतका खर्च का करायचा?

## अखिलेश यादव यांचे वादग्रस्त विधान; भाजपाकडून टीका

◆ **लखनौ, १९ ऑक्टोबर**

समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव, त्यांनी दिवाळीच्या तोंडावर केलेल्या एका विधानामुळे चर्चेत आले आहेत. लखनौमध्ये पत्रकारांशी बोलताना त्यांनी ख्रिसमस आणि दिवाळीची तुलना केली आणि दिवे व मेणबत्त्यांवर होणारा खर्च हा अपव्यय असल्याचे म्हटले. अखिलेश यादव यांच्या विधानावर राजकीय पक्षांनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या असून, भाजपाने त्यावर जोरदार टीका केली आहे.

लखनौ येथील पक्ष कार्यालयात पत्रकारांशी बोलताना अखिलेश यादव म्हणाले, मी भगवान रामाच्या नावाने एक सूचना देऊ इच्छितो. पहा, जगभरात नाताळचा काळ असतो. तेव्हा संपूर्ण शहरे लाईट्सनी उजळलेली असतात आणि ती महिनोनमहिने तशीच राहतात. त्यांच्याकडून शिका. दिवाळीत दिवे आणि मेणबत्त्यांवर इतका खर्च का करायचा? या सरकारकडून तुम्ही काय अपेक्षा करू शकता? हे सरकार उलथवून टाका. आमचे सरकार आल्यास आम्ही सुंदर रोषणाई करू.

यावेळी उत्तरप्रदेशातील वीजपुरवठा खंडित होणे, वाहतूक कोंडी होणे आणि नागरी सुविधांचा अभाव यासाठी अखिलेश यांनी राज्य सरकारला जबाबदार धरले. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या बिहार दौऱ्यावरही त्यांनी टीका केली आणि त्यांना ‘स्टार-स्प्लिटिंग एजंट’ असे म्हटले. बिहारमधील लोक कधीही जातीय विचारसरणी स्वीकारणार नाहीत, असे ते म्हणाले.

### भाजपाची टीका

भाजपाचे प्रवक्ते शहजाद पूनावाला म्हणाले की, समाजवादी पक्षाचा इतिहास हिंदूविरोधी आहे. राम मंदिर आंदोलनारम्यानही या पक्षाने विरोध केला होता. आता हाच पक्ष दिवाळीत दिवे लावण्यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहे. सैफईमध्ये भव्य उत्सव होतात, पण जेव्हा अयोध्येत प्रकाशोत्सव साजरा केला जातो, तेव्हा प्रश्न उपस्थित केले जातात. दिव्यांच्या विक्रीमुळे प्रजापती समाज आणि शेतकऱ्यांना रोजगार मिळतो. अखिलेश म्हणतात की हिंदूंनी दिवाळीत दिवे लावू नये. जनता अशा हिंदूविरोधी व्यक्तीला नक्कीच धडा शिकवेल.

# ट्रम्प यांच्या विरोधात ‘नो किंग’ निदर्शने

## हजारो निदर्शक उतरले रस्त्यावर | वेगवेगळ्या शहरांमध्ये २,६०० पेक्षा जास्त रॅली

◆ **वॉशिंग्टन, १९ ऑक्टोबर**

अमेरिकेच्या विविध शहरांमध्ये हजारो लोकांनी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात प्रचंड निदर्शने केली, ज्यांनी आरोप केला आहे की त्यांच्या राजवटीत देश वेगाने हुकूमशाहीकडे सरकत आहे.

आयोजकांच्या मते, जूनमध्ये झालेल्या पहिल्या ‘नो किंग्ज’ निदर्शनादरम्यान जवळपास २,१०० ठिकाणी रॅली काढण्यात आल्या होत्या, त्यानंतर देशभरात २,६०० हून अधिक ठिकाणी रॅली काढण्यात आल्या.

न्यू यॉर्कच्या टाईम्स स्क्वेअर, बोस्टन, अ‍ॅटलांटा आणि शिकागोमधील उद्यानांमध्ये प्रचंड गर्दी जमली. वॉशिंग्टन, लॉस एंजेलिस आणि रिपब्लिकन-बहुल अनेक राज्यांमध्येही लोक रस्त्यावर उतरले. रिपब्लिकन पक्षाने या निदर्शनांना ‘हेट अमेरिका रॅलीज’ असे नाव दिले. निदर्शनांमध्ये सहभागी झालेल्यांनी लोकशाही, न्याय आणि सत्तेच्या गैरवापराविरुद्ध आवाज उठवला.

न्यू यॉर्कच्या टाईम्स स्क्वेअरमध्ये निदर्शकांनी शांततेत निदर्शने केली. पोलिसांनी कोणत्याही अटकेची नोंद केलेली नाही, तर शहरात एक लाखांपेक्षा जास्त लोक सहभागी झाले होते. बोस्टन, फिलाडेल्फिया, अटलांटा, डेन्व्हर, शिकागो आणि सिएटल येथेही हजारो लोक जमले होते.

लॉस एंजेलिसमध्ये डझनभर रॅली निघाल्या. सिएटलमध्ये, लोक शहराच्या स्पेस नीडलजवळील एका मैलाच्या परेड मार्गात सामील झाले. सॅन दिएगोमध्ये, २५,००० पेक्षा जास्त लोक शांततापूर्ण निदर्शनात सामील झाले.

### ट्रम्प यांच्या कार्यकाळातील तिसरा मोठा निषेध

ट्रम्प यांच्या कार्यकाळातील हा तिसरा मोठा निषेध आहे. महत्त्वाचे म्हणजे, अमेरिका सध्या बंद आहे, अनेक सरकारी सेवा ठप्प आहेत. ट्रम्प प्रशासनाच्या कठोर धोरणामुळे काँग्रेस आणि न्यायव्यवस्थेशी संघर्ष वाढला आहे. ट्रम्प आठवड्याच्या शेवटी त्यांच्या फ्लोरिडा येथील घरी, मार-ए-लागो येथे होते. एका टीव्ही मुलाखतीत ते म्हणाले, ते मला राजा म्हणत आहेत, पण मी राजा नाही. त्यांच्या सोशल मीडिया टीमने नंतर ट्रम्पला राजा म्हणून दाखवणारा एक व्हिडीओ प्रसिद्ध केला. ■

# पॅरिसमधील प्रसिद्ध लूव्र संग्रहालयात चोरी

◆ **पॅरिस, १९ ऑक्टोबर**

फ्रान्सची राजधानी पॅरिसमधील प्रसिद्ध लूव्र संग्रहालय रविवारी सकाळी तात्पुरते बंद करण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार, संग्रहालयातून मौल्यवान दागिने चोरीला गेले. फ्रेंच संस्कृती मंत्री रशिदा दाती यांनी या घटनेची पुष्टी केली आणि चोरीची चौकशी सुरू असल्याचे सांगितले. सुरुवातीच्या वृत्तांनुसार, चोरांनी सुरक्षा व्यवस्था ओलांडून संग्रहालयाच्या प्रसिद्ध गॅलरीतून मौल्यवान दागिने चोरले.

रशिदा दाती यांनी इन्स्टाग्रामवर एक पोस्ट शेअर केली, ज्यामध्ये म्हटले आहे की आज सकाळी लूव्र संग्रहालय उघडताच दरोडा पडला. चोरीनंतर प्रसिद्ध झालेल्या व्हिडीओ फुटेजमध्ये संग्रहालयातून बाहेर पडण्यासाठी वाट पाहणाऱ्या पर्यटकांच्या लांब रांगा दिसत होत्या, तर इतर व्हिडीओंमध्ये संग्रहालयाबाहेर तैनात असलेले सुरक्षा कर्मचारी दिसत होते.

दरोडेखोरांनी दागिने घेऊन संग्रहालयातून पळ काढला. या घटनेनंतर, लूव्र संपूर्ण दिवस बंद ठेवण्यात आले. संग्रहालयाने अधिकृत निवेदनात म्हटले आहे की ते ‘विशेष परिस्थितीमुळे’ बंद राहील, परंतु दरोड्याबद्दल कोणतीही अतिरिक्त माहिती शेअर केलेली नाही. अधिकृतपणे म्युसी डू लूव्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या संग्रहालयात सुमारे ५,००,००० कलाकृती संग्रहित आहेत. यात इतिहासातील काही महान चित्रांचा समावेश आहे. यामध्ये लिओनार्डो दा विंचीची मोना लिसा, द वेडिंग फेस्ट अ‍ॅट काना आणि द व्हर्जिन अँड चाइल्ड विथ सेंट अँ यासारख्या अमूल्य कलाकृतींचा समावेश आहे.

# गरीब कैद्यांचा जामीन सरकार भरणार

## सर्वोच्च न्यायालयाने तयार केली ‘एसओपी’

◆ **नवी दिल्ली, १९ ऑक्टोबर**

सर्वोच्च न्यायालयाने एक अनोखी एसओपी तयार केली आहे, ज्यामध्ये असा निर्देश देण्यात आला की, जर एखाद्या गरीब व्यक्तीला जामिनासाठी आर्थिक हमी देता येत नसेल तर, सरकार जिल्हा कायदेशीर सेवा प्राधिकरण (डीएलएसए) ती प्रदान करेल. यामुळे त्याची सुटका सुनिश्चित होईल.

वरिष्ठ वकील सिद्धार्थ लुथरा आणि अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी यांच्या सूचनांनुसार न्यायालयाने ही ‘एसओपी’ तयार केली. हजारो कैदी जामीन मंजूर होऊनही तुरुंगात आहेत हे कळल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली.



न्या. एम. एम. सुंदरेश आणि एस. सी. शर्मा यांच्या न्यायासनाने सांगितले की, डीएलएसए एक लाख रुपयांपर्यंत जामिनाची रक्कम देऊ शकते. जर ट्रायल कोर्टाने जास्त रक्कम निश्चित केली तर डीएलएसए ती कमी करण्यासाठी अर्ज दाखल करेल. जर एखाद्या कैद्याला जामीन मंजूर झाल्यानंतर सात दिवसांच्या आत सोडण्यात आले नाही तर, तुरुंग प्रशासन डीएलएसए सचिवांना कळवेल. कैद्याच्या बचत खात्यात निधी आहे की नाही हे पडताळण्यासाठी सचिव ताबडतोब एका व्यक्तीची नियुक्ती करतील. जर आरोपीकडे निधी नसेल, तर जिल्हास्तरीय सक्षम समिती अर्थात् डीएलएसएच्या शिफारशीनुसार, पाच दिवसांच्या आत जामीन निधी सोडण्याचा निर्देश देईल.

### न्यायालयाने काय म्हटले?


न्यायालयाने म्हटले आहे की, ज्या प्रकरणांमध्ये सक्षम समितीने शिफारस केली आहे की एखाद्या अंडरट्रायल कैद्याला गरीब कैद्यांसाठी सहाय्य योजनेअंतर्गत आर्थिक मदत दिली जावी, त्या प्रकरणांमध्ये आवश्यक रक्कम, प्रति कैदी ५० हजारांपर्यंत, संबंधित न्यायालयात निश्चित ठेव म्हणून जमा केली जाईल किंवा जिल्हा समितीने योग्य मानलेल्या इतर कोणत्याही मार्गाने पाच दिवसांच्या आत उपलब्ध करून दिली जाईल, जोपर्यंत फौजदारी न्यायव्यवस्थेत एकीकरण होत नाही.

## तेलंगणा सरकार पालकांशी गैरवर्तन करणाऱ्यांचे पगार कापणार!

◆ **हैदराबाद, १९ ऑक्टोबर**

तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांचे सरकार एक नवीन नियम लागू करण्याची तयारी करत आहे. या नियमानुसार, जर एखाद्या सरकारी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या पालकांशी गैरवर्तन केले किंवा दुर्लक्ष केले तर, त्यांच्या पगाराच्या १० ते १५ टक्के रक्कम कापली जाईल. त्यानंतर ही रक्कम कर्मचाऱ्यांच्या पालकांना दिली जाईल.

मुख्यमंत्री रेवंथ रेड्डी यांनी लोकांच्या गरजांप्रती कर्मचाऱ्यांचे वर्तन सुधारण्याची गरज देखील अधोरेखित केली. नव्याने निवडलेल्या गट-२ कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्रे देण्यासाठी राज्यात आलेल्या रेड्डी यांनी त्यांना जनतेप्रती संवेदनशीलता दाखवण्यास सांगितले. कर्मचाऱ्यांनी त्यांच्या समस्या घेऊन येणाऱ्यांप्रती संवेदनशील असले पाहिजे, असेही मुख्यमंत्री म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या पालकांशी चांगले वागण्याचे आवाहनही केले.



उत्तरप्रदेशातील प्रयागराज येथे श्री बडे हनुमानजींचे दर्शन घेण्यासाठी रविवारी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी उसळली होती

# वापरलेल्या प्लेट्स धुवून दिले जेवण!

## अमृत भारत एक्सप्रेसमधील प्रकार

◆ **नवी दिल्ली, १९ ऑक्टोबर**

भारतीय रेल्वेमध्ये दिल्या जाणाऱ्या जेवणाच्या दर्जाबद्दल अनेकदा प्रश्न उपस्थित केले गेले आहेत. निकृष्ट दर्जाचे जेवण दिल्या जात असल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. पण, जेव्हा देशातील लक्झरी ट्रेनमध्येही असेच घडत आहे, तेव्हा काय करायचे असा प्रश्न पडतो. अमृत भारत एक्सप्रेसमध्ये दिल्या जाणाऱ्या जेवणाच्या दर्जाबद्दल समाज माध्यमांवर जोरदार चर्चा रंगली आहे.

ट्रेनमध्ये दिल्या जाणाऱ्या जेवणाच्या पॅकेटचे फोटो व्हायरल होत आहेत, ज्यामध्ये टाकून दिलेल्या डिस्पोजेबल प्लेट्स आणि उरलेले अन्न दिसत आहेत. प्रवाशांचा दावा आहे की, त्यांना पुन्हा वापरल्या जाणाऱ्या प्लेट्सवर जेवण देण्यात आले होते. हे फोटो समाज माध्यमांवर तुफान व्हायरल होत आहेत. अमृत भारत एक्सप्रेसमध्ये प्रवाशांसोबत किळसवाणा प्रकार घडल्याचे सांगितले जात आहे.

ट्रेनमध्ये जेवण देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या डिस्पोजेबल प्लेट्स आणि बॉक्स धुऊन पुन्हा वापरल्या जात आहेत. प्रवाशांचे म्हणणे आहे की, त्यांना जुन्या पदार्थांचे आणि तेलाचे डाग असलेल्या बॉक्समध्ये जेवण देण्यात आले होते. कोणीतरी याचे फोटो समाज माध्यमांवर टाकले, जे आता वेगाने व्हायरल होत आहेत. काही जणांनी यावर टीका करीत लिहिले की, रेल्वेने आता शाश्वत विकासात पुढाकार घेतला आहे, कारण प्लेट्स आता फेकल्या जात नाहीत तर, धुतल्या जातात आणि पुन्हा वापरल्या जातात. प्रकरण वाढताच, रेल्वेने केटरिंग एजन्सीकडून रिपोर्ट मागवला आणि चौकशी सुरू केली.

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ‘एक्स’वरील विनय यादव नावाच्या अकाउंटवरून शेअर केलेले हे फोटो अनेकांनी पाहिले आहेत. रेल्वेने सार्वजनिक आरोग्याशी तडजोड केल्याबद्दल अनेकांनी संताप व्यक्त केला आहे.

## चित्रपट वार्ता

### परिणीतीला पुत्ररत्नाची प्राप्ती



**मुंबई :** हिंदी सिनेसृष्टीत सध्या गोड बातम्याचा सुकाळ दिसतो आहे. एकीकडे कॅटरिना आणि विकी कौशल बाळाच्या प्रतीक्षेत असून परिणीती चोपडा आणि राघव चड्ढा या दाम्पत्याकडे चिमुकल्याचे आगमन झाले आहे. परिणीतीने १९ ऑक्टोबरला गोंडस बाळाला जन्म दिला. समाज माध्यमांवर पोस्ट जारी करीत राघव चड्ढा यांनी ही गोड बातमी दिली. याआधीचे आयुष्य आम्हाला आठवत नाही...पहिले आम्ही एकमेकांसाठी होतो. आता आमच्याकडे सगळे काही आहे, असे राघव चड्ढा यांनी लिहिले आहे. या बातमीनंतर जोडप्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. परिणीती आणि राघव यांचे लग्न २०२३ मध्ये झाले होते. लग्नानंतर दोन वर्षांनी ते आई-बाबा झाले आहेत. ऑगस्ट महिन्यात परिणीतीने गरोदर असल्याची बातमी जगजाहीर केली होती. ऐन दिवाळीत आता चिमुकल्याच्या आगमनाने दोघांच्याही कुटुंबात आनंदाला उधाण आले आहे. ■

### बडजात्यांच्या चित्रपटात आयुष्मान-शर्वरी

**मुंबई :** आयुष्मान खुराना सध्या त्याच्या ‘थम्मा’ चित्रपटाची तयारी करीत आहे. हा चित्रपट दिवाळीत म्हणजे मंगळवारी प्रदर्शित होत आहे. त्याच्या हॉरर कॉमेडी चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर दहा दिवसांनी, आयुष्मान दिग्दर्शक सूरज बडजात्या यांच्या फॅमिली ड्रामाचे चित्रीकरण सुरू करेल. चित्रपटाचे नाव सध्या ठरलेले नाही. राजश्री प्रॉडक्शन आणि महावीर जैन फिल्म्स हे चित्रपट तयार करतील. याचे चित्रीकरण १ नोव्हेंबरपासून सुरू होईल. हा एक रोमँटिक कौटुंबिक मनोरंजनपट आहे आणि त्यात सूरज बडजात्याचा ट्रेडमार्क टच असेल.



संयुक्त उठावना



गं. भा. शैला राधेशाम लड्ढा
सूचित करते हुवे अत्यंत दुःख होता है की रवींद्र, मनोज लड्ढा इनकी भाभीजी तथा दिलीप (झाबक) सचिन, ललित, रुपम के काकीजी
गं. भा. शैला राधेशाम लड्ढा
दि. १९/१०/२०२५ को श्री जी शरण हुए.
इनकी उठावना
दि. २०/१०/२०२५ वार सोमवार
स्थल - महेश प्रगती हॉल, रिंग रोड,जलगाव
समय - सुबह १० बजे
बैठक -११ बजे से १२ बजे तक
शोकाकुल
लड्ढा परिवार (खेडी कढोली), बसेर परिवार (जामनेर)

## अग्रलेख...

# जे पेराल, तेच उगवते!

कर्म ही एक प्रकारची परीक्षा असते. तुम्ही जसे कर्म कराल, तसे फळ मिळणे निश्चित आहे. कर्माच्या मागोमाग त्याचे फळ मिळतेच. कितीही प्रयत्न केले तरी ते टाळता येत नाही. मग कर्म वाईट असो की चांगले! यासंदर्भात संत कबीर यांचा दोहा आहे. कबीर म्हणतात-

**जो टोकू कांटा बुवे, ताहि बोय तू फूल ।**
**तोकू फूल के फूल है, बाकू है त्रिशूल ॥**

अर्थात्, कुणी जर तुमच्या मार्गात काटे टाकत असला तरी तुम्ही फुले टाका. तुम्हाला फुलेच मिळणार आणि काटे टाकणाऱ्याला मिळणार त्रिशूळासमान काटे. जन्म झाला तेव्हापासूनच पाकिस्तानने भारताच्या मार्गात सातत्याने काटे पेरण्याचा प्रयत्न केला आहे. केवळ भारतच नव्हे तर तेव्हाचा पूर्व पाकिस्तान आणि आताचा बांगलादेश असो की शियाबहुल इराण, पाकिस्तान सातत्याने कुरापती करीत आला. गेल्या ७८ वर्षांत इस्लामिक रिपब्लिक ऑफ पाकिस्तान आणि मुस्लिम उम्माहसाठी धडपडणारा हा देश आज रसातळाला गेला आहे. गजवा-ए-हिंदसारख्या कपोलकल्पित कल्पनेच्या मागे धावून स्वत:चे हसे करून घेत आहे. भारताचे तुकडे करण्याचे स्वप्न पाहणारा हा देश आता गृहयुद्धात लोटला जाण्याची परिस्थिती आहे. आज बलुचिस्तान, सिंध, खैबर पख्तूनख्वा आणि व्याप्त काश्मिरात शाहबाज शरीफ सरकारच्या विरोधात जनता रस्त्यावर उतरली आहे. पूर्व सीमा अशांत करून ठेवल्यानंतर आता पश्चिम सीमाही अशांत झाली. गेल्या दोन आठवड्यांपासून अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यात रक्तरंजित संघर्ष पेटला आहे. तसे पाहता अफगाणिस्तान आणि पाकिस्तान कट्टर सुन्नीपंथीय देश आहेत. दोन्ही देशांमधून गैरमुस्लिम अर्थात हिंदू, बौद्ध, शीख, ख्रिश्चन धर्मीय परागंदा झालेत. याचे फळ दोन्ही देश भोगत आहेत.

भारताला लुटणारे परकीय आक्रमक अफगाणिस्तानातूनच आले होते. लक्षावधी भारतीयांची कत्तल करून अगणित संपत्ती त्यांनी लुटून नेली. आज, तोच अफगाणिस्तान जगापुढे भीक मागतो आहे. तेथे सर्वत्र गोंधळ असून सर्वसामान्य अफगाणी मारले जात आहेत. जसे कराल, तसे भराल, हे तत्त्व या देशाला देखील लागू झाले. जर केवळ धर्माच्या आधारावर चालल्याने कुणाचा विकास झाला असता तर आज मध्यपूर्व आणि आखाती देशांमध्ये जिकडे तिकडे श्रीमंती असती.

असो. अफगाणिस्तानात जेव्हा सर्वप्रथम १९९६ मध्ये तालिबान सत्तेवर आला तेव्हा पाकिस्तानच्या आनंदाला पारावार उरला नव्हता. पण, हा आनंद फक्त चार वर्षेच टिकला. कारण, अल-कायदाने न्यू यॉर्कवर दहशतवादी हल्ला केला आणि मग अवघ्या दोनच महिन्यांत तालिबानला सत्तेवरून हाकलले गेले. २००१ ते २०२४ या काळात अफगाणिस्तान निदान गृहयुद्धापासून तरी दूर होता. अमेरिका आणि नेटो फौजांनी तब्बल दहा वर्षे या देशाला आपल्या कब्जात ठेवले. या दहा वर्षांच्या काळात अफगाणिस्तानात भारत आणि पाकिस्तान विविध पातळीवर कार्यरत होते. भारताने अफगाणी नागरिकांच्या विकासाला प्राधान्य देत रस्ते, धरणे, शासकीय इमारती, एवढेच नव्हे तर संसद भवनाचीही उभारणी करून दिली. अमेरिका, रशियासह चीन आणि पाकिस्तान अफगाणिस्तानच्या भौगोलिक स्थानाचा उपयोग स्वार्थासाठी करण्यात मश्गूल असताना भारत सरकारने मानवी आधारावर मदतकार्य सुरू ठेवले. यात भारताचे आर्थिक नुकसान झाले, तालिबानने केलेल्या हल्ल्यांमध्ये काही भारतीय नागरिकांचे प्राणही गेले. हिंसेच्या आधारावर सुरू असलेल्या राजकारणाचे आयुष्य अल्प असते, याची जाणीव भारताला होती. दीर्घकाळ सुरू असलेले स्वार्थविरहित कार्य पाहून २०२४ मध्ये सत्तेवर आलेल्या तालिबानने भारताप्रति नरमाई आणि सहकार्याचे धोरण ठेवले. अफगाणिस्तानला दुसरा पर्याय पण नाही. दुसऱ्या बाजूने पाकिस्तानने हक्कानी गटाच्या पाठिंब्याने तालिबानचा उपयोग दिल्लीच्या विरोधात व्हावा, यासाठी प्रयत्न केले; पण त्याला यश आले नाही. दुसऱ्यांदा सत्ता प्राप्त केल्यानंतर अफगाणिस्तानात अन्नधान्याचा प्रचंड तुटवडा होता. गरीब जनतेची उपासमार सुरू होती. अशा बिकटप्रसंगी भारताने काबुलला गव्हाचा कधी मोफत तर कधी अत्यंत अल्पदरात पुरवठा केला.

अडीच महिन्यांपूर्वी अफगाणिस्तानात विनाशकारी भूकंप आला. दोन हजारांपेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू झाला आणि हजारो नागरिक जखमी झाले. या संकटाच्या काळात मदत करणारा भारत पहिला देश ठरला. चाबाहारमार्गे भारताने गहू, तांदूळ, तात्पुरते तंबू आणि औषधे अफगाणिस्तानला पाठविली. सत्तेवर कोण आहे, याचा विचार भारताने केला नाही. मानवतेच्या नात्याने आणि शेजारी म्हणून भारताने केलेल्या मदतीला पाठ दाखविणे हैबतुल्ला अखुंजादा यांच्या नेतृत्वातील तालिबानला जमले नाही. तसेही भारताची अफगाणिस्तानप्रति असलेली बांधिलकी तालिबान किंवा त्यापूर्वीच्या सत्ताधाऱ्यांशी नव्हे तर सामान्य जनतेशी होती. २०२४ मध्ये काबुल तालिबान्यांच्या हाती पडताच सर्वप्रथम पाकिस्तानचे लष्करी अधिकारी आणि राजकीय मुत्सद्दी काबुलमध्ये तळ ठोकून होते. काश्मीर मिळविण्यासाठी तालिबानी आता आपल्याला नक्की मदत करतील, असा समज (नॅरेटिव्ह) इस्लामाबादने जनतेत निर्माण केला. पण, झाले उलटेच. गेल्या अकरा वर्षांपासून सातत्याने सुरू असलेले विकासाचे काम आणि मानवीय मदत यामुळे तालिबानने कधीही भारताच्या विरोधात भूमिका घेतली नाही. यामुळे संतप्त झालेल्या पाकिस्तानने तालिबानवर दबाव आणण्यास प्रारंभ केला. गेल्या सहा महिन्यांपासून दोन्ही शेजारी देशांमधील संबंध एवढे विकोपाला गेले की रक्तपाताला सुरुवात झाली. तेहरिक-ए-तालिबान या दहशतवादी गटाने थेट पाकिस्तानात घुसून लष्करी तळे आणि प्रशिक्षण स्थळांवर हल्ले चढविले. त्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानी लढाऊ विमानांनी अफगाणिस्तानात मानवी वस्त्यांवर बॉम्ब टाकले. काबुलवरील या हल्ल्यांत निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला. या हल्ल्यांमुळे संतप्त झालेल्या तालिबानने तेहरिक-ए-तालिबानच्या मदतीने ड्युरंड सीमारेषेवरील पाकिस्तानी चौक्यांवर हल्ले चढविले. यामध्ये ५८ पाक सैनिक ठार तर शेकडो जखमी झाल्याचा दावा करण्यात आला. झालेली हानी पाहून शरीफ सरकारने ४८ तासांची युद्धबंदी करण्याची विनंती केली होती. काबुलने ती मान्यही केली. पण, मुदत संपताच पाकिस्तानने पुन्हा हल्ले करीत तीन क्रिकेटपटूंसह ४० नागरिकांचा बळी घेतला. एकीकडे दोन्ही देशांचे प्रतिनिधी शांतता करार करण्यासाठी कतार येथे जमले असताना इकडे पाकिस्तान काबुल आणि इस्लामाबादला धमक्या देत होता. कतारमधील दोहा येथे अफगाणिस्तानचे संरक्षण मंत्री मुल्ला मुहम्मद याकुब आणि पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मुहम्मद आसिफ यांनी युद्धबंदी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. दोन्ही देश या कराराचे पालन किती दिवस करतात हा महत्त्वाचा प्रश्न आहेच. दोन्ही देशांना दहशतवाद हा काही नवीन नाही. गेल्या पाच दशकांपासून पाकिस्तान भारतात दहशतवादी कारवाया करीत आला आणि तालिबान तर त्यात तरबेज आहेच. भारताशी जुळवून घेण्यातच आपला फायदा आहे याची जाणीव अफगाणिस्तानला झाली आहे. दुसरीकडे पाकिस्तानच्या पूर्व आणि पश्चिम सीमा व्यस्त राहाव्यात म्हणून 'गुड तालिबान-बॅड तालिबान'च्या फंदात न पडता बदलती भू-राजकीय परिस्थिती पाहता फार ताणून न धरण्याची भूमिका भारताने घेतली आहे. भारताने दहशतवादी संघटना असलेल्या तालिबानशी कसे काय जुळवून घेतले, असा प्रश्न पाकिस्तान उपस्थित करीत असला तरी त्याकडे लक्ष देण्याची गरज नाही. बदलत्या परिस्थितीला अनुसरून सर्वच देश आपले धोरण ठरवीत असताना भारतानेही हाच कित्ता गिरविणे सोयीचे ठरणारे आहे. गेल्या २० वर्षांमध्ये पाकिस्तानने अफगाणिस्तानात जे पेरले, तेच आता उगवले आहे. रशिया, अमेरिका आणि भारताच्या विरोधात उभे करण्यासाठी पाकिस्ताननेच तालिबानला हवी तेवढी वैचारिक, आर्थिक मदत पुरविली आहे. इथे भस्मासुराचा किस्सा बरोबर लागू होतो. अल-कायदाचा म्होरक्या ओसामा बिन लादेनला तब्बल दहा वर्षे आपल्या भूमीत लपवून ठेवणाऱ्या पाकिस्तानला आपल्या कर्माची फळे भोगावी लागत आहेत. तर अफगाणिस्तानात केलेल्या मानवीय कार्यामुळे तालिबानला भारत जवळ वाटत आहे. हाच कर्माचा न्याय आहे. जे पेराल, तेच उगवते हा सृष्टीचा नियमच आहे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# क्षमा शोभती उस भुजंग को..!

**क्षमा शोभती उस भुजंग को, जिस में गरल हो,**
**ना उसे, जो विनित, विनम्र और सरल हो!**

अल्लाचे नाव घेत निष्पाप इस्रायली नागरिकांवर हल्ला करणाऱ्या हमासला या देशाने असा काही धडा शिकविला की नजीकच्या काळात तरी हमास इस्रायलवर हल्ला करण्याचा विचार करणार नाही. राष्ट्रकवी दिनकर यांच्या एका कवितेत हाच भावार्थ सांगण्यात आला आहे. ज्या भुजंगात विष असतं, त्याच्याच 'माफी' शब्दाला किंमत असते. इस्रायलने गाझा पट्टीत युद्धबंदी मान्य केली, पण गाझा पट्टी व हमासचे नेतृत्व जवळपास पूर्ण उद्ध्वस्त केल्यानंतर.

**हमास अद्याप कायम :** इस्रायलने असे करून साऱ्या जगाला एक धडा शिकविला आहे. आपल्या भूमीवर, आपल्या नागरिकांवर हल्ला करण्यात आल्यावर त्याचा बदला कसा घेतला जातो याचा हा धडा आहे. जगातील अनेक देश विरोधात असताना, इस्रायलने ७३८ दिवस हमासला दररोज तडाखे दिले. याचाच परिणाम म्हणजे हमासने माघार घेत इस्रायलच्या २० नागरिकांची सुटका केली. या सर्वांना रेडक्रॉसच्या स्वाधीन करण्यात आले. इस्रायली नागरिकांना सोडण्याची वेळ, जागा, संख्या या सर्व बाबी हमासने ठरविल्या होत्या. याचा दुसरा अर्थ म्हणजे, गाझा पट्टीतील युद्ध संपले असले तरी हमास संपलेली नाही.

**जबर तडाखा :** ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने इस्रायलवर एक घातक दहशतवादी हल्ला चढविल्यानंतर हमासला संपविण्यासाठी दोन वर्षांपासून इस्रायलने हमासच्या विरोधात युद्ध पुकारले होते. हमासच्या अनेक नेत्यांना संपविण्यात आले, गाझा पट्टीचा काही भाग जमीनदोस्त करण्यात आला. मात्र तरीही हमास संपलेली नाही असा काही अभ्यासकांचा दावा आहे.

**बोगदे शाबूत :** इस्रायलने हमासच्या विरोधात सुरू केलेल्या लष्करी कारवाईत आतापर्यंत ६७ हजार पॅलेस्टिनी ठार झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मात्र हमासने गाझा पट्टीत ७८० किलोमीटर लांबीचे जे भूमिगत बोगदे बांधले आहेत ते इस्रायलला अद्याप उद्ध्वस्त करता आलेले नाहीत आणि जोपर्यंत हे भुयारी बोगदे आहेत, तोपर्यंत हमासचे अस्तित्व शाबूत आहे असे या अभ्यासकांना वाटते.

**हमासला धक्का :** इस्रायलने सुरू केलेल्या लष्करी कारवाईत हमासला जबर धक्का बसला हे मात्र या अभ्यासकांना मान्य आहे. हमासजवळ २७ हजाराचे सैन्य होते. त्यांची संख्या आता केवळ १२ हजारावर आली आहे. म्हणजे १५ हजार हमास सैन्य संपविण्यात इस्रायलला यश आले. मात्र याचवेळी हमासमध्ये पुन्हा नवी भरती सुरू झाली असल्याचे मानले जाते. हमासने सध्या नरमाईचे धोरण घेतले आहे. माघारीचे धोरण घेतले आहे. याच एका कारणामुळे हमासने राष्ट्रपती ट्रम्प यांचा २१ कलमी प्रस्ताव फेटाळून लावलेला नाही. बहुतेक मुस्लिम राष्ट्रांनी हमासला 'ट्रम्प शांतता प्रस्ताव' स्वीकारण्याचा सल्ला दिला होता असे समजते. हमासवर ट्रम्प यांच्यापेक्षा मुस्लिम देशांचा दबाव अधिक होता. कारण या देशांकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीवरच हमासच्या कारवाया चालू राहात होत्या. वास्तविक ट्रम्प यांच्या २१ कलमी प्रस्तावात हमासला कोणतीही भूमिका देण्यात आलेली नाही. तरी हमासने त्यावर सकारात्मक भूमिका घेतली आहे. हे हमासचे मनपरिवर्तन नाही, तर ती या संघटनेची व्यूहरचना असल्याचे म्हटले जाते.

**हमासची ओळख :** साऱ्या जगात हमासची ओळख केवळ एक दहशतवादी संघटना अशी असली तरी प्रत्यक्षात गाझा पट्टीत हमासची ओळख वेगळी आहे आणि ही वेगळी ओळख, 'हमास- पॉलिटिक्स, चॅरिटी ॲण्ड टेररिझम इन द सर्व्हिस ऑफ जेहाद' या पुस्तकात मॅथ्यू लेविट या अमेरिकन लेखकाने उलगडली आहे. विशेष म्हणजे मध्यपूर्वेसाठी १९८८ ते २००० या काळात अमेरिकेचे राजदूत असलेले डेनिस रॉस यांनी या पुस्तकास प्रस्तावना लिहिली आहे. या पुस्तकाला हमासच्या कारवायांबाबतचा एक अधिकृत दस्तावेज मानले जाते.

**हमासचा जन्म :** हमास म्हणजे हरकत अल मुकावामा अल इस्लामिया! इस्लामिक प्रतिकार आंदोलन असे या संस्थेचे नामकरण करण्यात आले. १९८७ मध्ये गाझा पट्टीत स्थापन झालेली ही संघटना गाझा पट्टीत राहणाऱ्या २० लाख लोकांसाठी जीवनरेखा आहे. हमासला डावलून गाझा पट्टीबाबतचा कोणताही निर्णय होऊ शकत नव्हता आणि अखेर राष्ट्रपती ट्रम्प यांनी हमासला धमकी देत या संघटनेला आपल्या शांती योजनेसाठी राजी केले.

**हमासचा जनाधार :** हमास ही एक मूठभर दहशतवाद्यांची संघटना आहे, या संघटनेला जनमताचा पाठिंबा नाही हा समज खोटा ठरविला तो २००६ मध्ये पॅलेस्टिनी संसदेसाठी झालेल्या निवडणुकीने. ४४. ५ टक्के पॅलेस्टिनी जनतेने हमासला पाठिंबा दिला आणि हमासला एकप्रकारे जनमान्यता मिळाली. यानंतर हमासने मागे वळून पाहिले नाही याचे विवेचन या पुस्तकात करण्यात आले आहे.

**शाळा-रुग्णालये :** हमासने गाझा पट्टीत शेकडो भूमिगत बोगदे बांधले. ते कोणत्या तरी घरात जाऊन पोहोचतात. या भूमिगत मार्गांचा माग काढणे इस्रायलला शक्य झालेले नाही हे पुस्तकात सविस्तर सांगण्यात आले आहे. दोन वर्षांपूर्वी म्हणजे ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने इस्रायलवर केलेल्या हल्ल्यात काही इस्रायली नागरिकांचे अपहरण करण्यात आले. त्यातील काही बंधक शेवटपर्यंत हमासच्या ताब्यात होते. इस्रायलने मागील दोन वर्षांत गाझा पट्टीची धुळधाण केली असली तरी या बोगद्यांमुळे अपहरण करण्यात आलेल्या या नागरिकांना शोधणे इस्रायलला शक्य झाले नव्हते.

**शाळांची मैदाने :** हमासने पॅलेस्टिनी मुलांसाठी शाळा सुरू केल्या. त्यांना शिकविण्यासाठी वेगवेगळ्या वेबसाईट तयार केल्या. त्यांना राष्ट्रभक्तीच्या गोष्टी सांगण्यासाठी, त्यांच्या मनोरंजनासाठी वेगवेगळ्या वेबसाईट सुरू केल्या आणि त्याचवेळी शाळांची मैदाने आपली शस्त्रास्त्रे लपविण्यासाठी वापरली.

**रुग्णालये :** हमासने गाझा पट्टीत अनेक रुग्णालये बांधली, चालविली. त्यात पॅलेस्टिनी नागरिक व दहशतवादी दोघांवरही उपचार केले जातात. या रुग्णालयांचा वापर दहशतवाद्यांना लपविण्यासाठी करण्यात येतो हे पुस्तकात सांगण्यात आले आहे. अनेक रुग्णालयांमध्ये हमासची शस्त्र भांडारे आहेत असाही दावा या पुस्तकात करण्यात आला आहे. गाझा पट्टीत राहणाऱ्या २० लाख पॅलेस्टिनींना स्वतंत्र पॅलेस्टिन हवा आहे आणि इस्रायलला हे मान्य नाही. त्यामुळे जोपर्यंत इस्रायल आहे, तोपर्यंत स्वतंत्र पॅलेस्टिनची मागणी आहे, हमासचे अस्तित्व कायम राहणार आहे असा बहुतेक अभ्यासकांचा निष्कर्ष आहे.

**सरकारच हमासचे :** गाझा पट्टीचे प्रशासन-शासन स्वत:कडे घेण्याचा प्रयत्न ट्रम्प यांनी आपल्या २१ कलमी प्रस्तावात केला असला तरी तो दीर्घ काळात यशस्वी होणार नाही असे सांगताना या अभ्यासकांनी म्हटले आहे की, गाझा पट्टीत सरकार वा शासन चालते तेच मुळी हमासचे. गोळ्या घालण्यापासून रुग्णांना गोळ्या देण्यापर्यंत सारे काही हमास करीत असते. अशा स्थितीत हमासला बाजूला करून या भागावर किती काळ शासन करता येईल यावर वेगवेगळी मते आहेत.

**मुस्लिम देशांची कोंडी :** राष्ट्रपती ट्रम्प यांच्या शांती योजनेला पाठिंबा दिल्याबद्दल पाकिस्तानसह अनेक मुस्लिम देशांची मात्र कोंडी झाली आहे. मुस्लिम जगताचा स्वतंत्र पॅलेस्टिन देशाला पाठिंबा आहे आणि हमास त्यासाठीच मागील अनेक वर्षांपासून लढा देत असताना, मुस्लिम देशांनी ट्रम्प यांना साथ द्यावी हे मुस्लिम देशातील जनतेला अजिबात पटलेले नाही. काही मुस्लिम देशांमध्ये आपल्याच देशाच्या या निर्णयाविरोधात निदर्शने झाली आहेत. गाझा पट्टीतील युद्ध थांबलेले आहे, संपलेले नाही. इस्रायलवर पुन्हा एकदा हल्ला करण्यापूर्वी हमासला अनेकदा विचार करावा लागेल आणि हीच या युद्धाची उपलब्धी आहे.

## वेध

सोनाली पवन ठेंगडी

# प्रदूषणमुक्तीचा घेऊया ध्यास

सध्या संपूर्ण देशात दिवाळीची धामधूम आहे. या धामधुमीत खरेदीला नवाच जोर चढतो. मग ते घरातील वस्तू असो, वाहन असो, सोने-चांदी, कपडे, मोबाईल सारे काही मोठ्या उत्साहात खरेदी केले जाते. याच खरेदीत फटाक्यांचाही समावेश असतो. दिवाळी आणि फटाके हे समीकरणच आपल्या देशात रूढ झाले आहे. मागील काही वर्षांत फटाक्यांच्या धुरामुळे होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन याचे प्रस्थ बरेच कमी झाले. शिवाय ज्या घरात पाच ते पंधरा वयोगटातील मुले असतात तिथे फटाक्यांचा उल्हास जास्त असतो. मुले मोठी झाल्यानंतर त्यांना फटाके फोडण्याचा तितकासा उत्साह राहत नाही.

मुळात, फटाक्यांमध्ये आनंद शोधायचाच का? त्यातही फटाके बिना आवाजाचे असतील तर पुरे, अशी मानसिकता का तयार होत नाही, हा प्रश्नच आहे. ज्या फटाक्यांचे आवाज मोठे असतात त्याचा केवळ इतरांनाच नाही तर जे फटाके फोडतात त्यांनाही त्रास होतो. काही लोक तर वात पेटवतात आणि स्वत:च कान बंद करून दूर उभे राहतात. जर तुम्हाला स्वत:लाच आवाज सहन होत नाही तर मग इतरांचाही विचार करा आणि मोठ्या आवाजाच्या फटाक्यांना आपल्या आनंदाच्या संकल्पनेतून हद्दपार करा. फटाके फोडूच नका, असे म्हणणे नाहीच मुळी. फटाके असे असावे ज्याचा डोळ्यांना आणि मनाला आनंद घेता येईल. ज्यामुळे प्रदूषणही कमी होईल. त्यासाठी हरित फटाके हा उत्तम पर्याय आहे. खुद्द सर्वोच्च न्यायालयानेही याला दुजोरा दिला आहे. सर्वोच्च न्यायालयातील एका न्यायाधीशांनी तर सरन्यायाधीशांना म्हटले की, अहो, आपणही लहान होतो आणि आपल्यालाही फटाक्यांचा उल्हास होताच. हा आनंद हिरावता कामा नये. त्यामुळे फटाके फोडायला हरकत नाही. पण, ते हरित फटाके असावेत आणि मोठ्या आवाजाचे नसावेत. आज आपल्या आजूबाजूला पाहिले तर अनेक घरांमध्ये केवळ आजी-आजोबा असतात. दिवाळीच्या पाच दिवसात ते दारं-खिडक्या बंद करून बसतात. कारण त्यांना फटाक्यांचा मोठा आवाज आणि धूर दोन्हीही सहन होत नाही. कोणाच्या घरात आजारी लोक असतात, ज्यांना तर या दोन्ही गोष्टी अतिशय त्रासदायक ठरू शकतात. तान्ह्या बाळांनाही याचा त्रास होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मानवच काय तर प्राणीही फटाक्यांमुळे घाबरून एका कोपऱ्यात बसलेले असतात, हा आपला अनुभव आहे. ज्यांच्या घरात पाळीव प्राणी असतील त्यांनी हे निरीक्षण नक्की करा. निदान आपल्या घरातील या सर्व सदस्यांचा विचार करून तरी मोठ्या आवाजाच्या फटाक्यांना हद्दपार करा. प्रत्यक्षात मोठा आवाज व्हायलाच हवा, हा अट्टहास का? दिवाळीच्या काळात फटाके फोडल्यामुळे हवेतील कार्बन मोनोक्साईड, हायड्रोकार्बन्स, सल्फर डायऑक्साईड इत्यादींचे हवेतले प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढते. गरोदर स्त्रिया, लहान मुले आणि अस्थमाचे रुग्ण यांना या काळात सर्वाधिक त्रास होतो, असे अनेक संशोधनात आढळून आले आहे. हवेतील सस्पेंडेड पर्टिक्युलेट मॅटर्स (एसपीएम) यांची पातळी वाढल्यामुळे घसा, नाक आणि डोळ्यांना त्रास होतो. त्यामुळे डोकेदुखीचा त्रास उद्भवतो आणि मेंदूच्या क्षमतेवर परिणाम होतो. ज्या लोकांना हृदयरोग, श्वसनाचे विकार आणि मज्जासंस्थचे विकार असतात, तसेच सर्दी, खोकला आणि ॲलर्जी असणाऱ्या लोकांना हा त्रास जास्त प्रमाणात उद्भवतो. फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण हा एक महत्त्वाचा मुद्दा आहेच. पण त्याचबरोबर त्यामुळे होणारा आवाज हा आणखी एक मोठा धोका आहे. केंद्र सरकारच्या पर्यावरण नैसर्गिक स्रोत विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आवाजाच्या पातळीसाठी दिवसाला ६० डेसिबल आणि रात्री ५० डेसिबल्स इतकी मर्यादा आखून दिलेली असते. फटाक्यांमुळे ही मर्यादा १४० डेसिबल्सपर्यंत जाते. ८५ डेसिबल्सपेक्षा जास्त आवाजामुळे ऐकायला त्रास होतो. आवाज वाढल्यामुळे अस्वस्थता, तात्पुरता किंवा कायमचा बहिरेपणा, उच्च रक्तदाब आणि अस्वस्थ झोप यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. हा विषय संपूर्ण पानभर लिहिला तरी कमी पडेल इतका मोठा आहे. फक्त आपण एवढेच लक्षात ठेवायचे की काही गोष्टी वास्तवाच्या धर्तीवर विचार करून आपल्यापासून दूर करायला हव्या. या दिवाळीत प्रदूषणमुक्त सणाचा संकल्प करूया आणि दरवर्षी याचे कसोशीने पालन करून आपल्यासोबतच इतरांनाही यासाठी प्रोत्साहित करूया.

७७५५९३८८२२

## कानोसा

अमोल पुसदकर

# आत्मनिर्भरतेचा प्रकाश

दीपावली हा प्रकाशाचा उत्सव आहे. प्रकाशाची आवश्यकता तेव्हा जास्त प्रकर्षाने जाणवते, जेव्हा अंधकार दाटलेला असतो. अंधकार हा व्यक्तीच्या, समाजाच्या आणि राष्ट्राच्या जीवनात सुद्धा असू शकतो. अंधकार ही परिस्थिती आहे, ज्या परिस्थितीमध्ये व्यक्तीला काय करावे, कुठे जावे हे समजत नाही. कोणाच्या मनामध्ये नैराश्याचा अंधकार असतो, कोणाच्या मनामध्ये अपयशाचा अंधकार असतो, कोणाच्या मनामध्ये दुःखाचा अंधकार असतो. यशाशिवाय अपयशाचा अंधकार दूर होऊ शकत नाही आणि आनंदाशिवाय दुःखाचा अंधकार दूर होऊ शकत नाही. आपल्या संस्कृतीमध्ये ऋतुमानाप्रमाणे सातत्याने वेगवेगळ्या पद्धतीचा आनंद साजरा करण्याकरिता सणांची, उत्सवांची रचना असते. बरेचदा आपल्याला दुःख साजरे करण्याची सवय असते. म्हणजे जीवनामध्ये एखादी दुःखाची गोष्ट घडली तर ती आपण अनेक वर्षे लक्षात ठेवतो, परंतु आनंदाची घटना आपण काही दिवसांतच विसरतो. मी किती किलोमीटर रस्ता यशस्वीपणे चाललो हे आपल्या लक्षात राहत नाही, परंतु रस्त्यामध्ये लागलेली एखादी ठेच नेहमी लक्षात राहते. दिवाळी हा आनंदाचा सण आहे. आपण जे दिवे लावतो त्याचा प्रकाश पहिले अंत:करणामध्ये पडतो, नंतर बाहेर पडतो. दिवाळी आली म्हणून काही अडचणी दूर होत नाहीत, परंतु अडचणींना बाजूला सारून सुद्धा मला आनंदात राहायचे आहे, अडचणी असतानाही मला खुश राहायचे आहे, हा तो संदेश असतो.

एकेकाळी देशावर इंग्रजांचे राज्य होते. त्यावेळेला ते येथून मोठ्या प्रमाणावर कच्चा माल इंग्लंडमध्ये घेऊन जायचे व त्यावर प्रक्रिया करून भारतात आणून चढ्या दराने विकायचे. पुढे देश स्वतंत्र झाला. सरकारच्या धोरणांमुळे जितक्या मोठ्या प्रमाणावर भारतीय उद्योजक, कारखाने व वस्तूंची निर्मिती व्हायला पाहिजे होती, तेवढ्या प्रमाणात ती झाली नाही. परिणामी देश विदेशी आयातीवर अवलंबून राहिला. विदेशी आयातीमुळे भारताचे परकीय चलन वाया जाते. आजही आम्ही इतर देशांतून देशाला आवश्यक असलेले अनेक सुटे भाग, यंत्रसामुग्री इत्यादी गोष्टी आयात करतो. भारताला आत्मनिर्भर व्हावेच लागेल. त्यासाठी देशातील उद्योजक, निर्यातदार, विद्यार्थी, शास्त्रज्ञ या सर्वांनाच विविध आयातीच्या विभागाकडे आपले लक्ष केंद्रित करून, देशांतर्गत नवीन वस्तूंचे निर्माण, उत्पादन, वितरण व निर्यात या विषयांवर लक्ष द्यावे लागेल.



अजूनही भारताला जगातील विविध देशांकडून, विविध गोष्टी आयात कराव्या लागतात. आम्ही ज्या गाड्या वापरतो त्यासाठी लागणारे पेट्रोल आणि डिझेल यापैकी ८५ टक्के आम्हाला सौदी अरेबिया, इराक, रशिया इत्यादी देशातून आयात करावे लागते. भारताच्या आयात खर्चात सर्वाधिक योगदान या कच्च्या तेलाचेच आहे. हा खर्च जर आम्हाला कमी करायचा असेल तर, आम्हाला जपानप्रमाणे सायकल छोट्या अंतराकरिता वापरावी लागेल. अगदी जवळच्या कामांना पायी सुद्धा जाता येऊ शकते. सायकलींमध्ये संशोधन होऊन त्या अधिक अंतराकरिता आणि कमी श्रमांमध्ये कशा वापरता येतील यावर काम होणे गरजेचे आहे. इलेक्ट्रिक वाहनांपेक्षाही हायड्रोजनवर चालणारे वाहन लवकरात लवकर बाजारात येणे गरजेचे आहे. मोबाईल, लॅपटॉप, टीव्ही, कार यामध्ये सेमीकंडक्टर चिप्स, डिस्प्ले पॅनल, सर्किट बोर्ड इत्यादी पैकी ९० टक्के सुटे भाग आम्ही चीन, दक्षिण कोरिया, तैवान, सिंगापूर येथून आयात करतो. यावर उपाय म्हणून भारताने स्वतःचा सेमीकंडक्टर चिप बनवण्याचा कारखाना सुरू केलेला आहे.

सौर ऊर्जामध्ये भारत आघाडीवर असला तरीही सौर उपकरणांमध्ये आघाडीवर नाही. यासाठी लागणारे अधिकाधिक सुटे भाग, उदाहरणार्थ इन्व्हर्टर, सोलर सेल, सिलिकॉन वेफर्स हे प्रामुख्याने चीनमधून येतात. यामध्ये सुद्धा आत्मनिर्भरतेकडे सरकारने वाटचाल सुरू केलेली आहे. देशाच्या सुरक्षेसाठी आवश्यक असलेली लढाऊ विमाने, शस्त्रे आम्हाला अमेरिका, रशिया, फ्रान्स या देशांकडून आयात करावी लागतात. परंतु मागील दहा वर्षांत भारताने या क्षेत्रात भरपूर प्रगती केलेली आहे. यावेळेस ऑपरेशन सिंदूरच्या वेळी भारतामध्ये निर्माण झालेल्या क्षेपणास्त्रांचा वापर करण्यात आला. भारतामध्ये बनणारी अनेक शस्त्रे आता विदेशात निर्यात होऊ लागलेली आहेत. सुरक्षा सामग्रीची भारतीय निर्यात आता दीड लाख कोटींवर पोहोचलेली आहे. काही वर्षांपूर्वी वर्तमानपत्रांमध्ये असे लिहून यायचे की, भारत आणि पाकिस्तान युद्ध झाल्यास केवळ दोन दिवस पुरेल एवढाच शस्त्रसाठा आमच्याजवळ आहे. परंतु देशाने संरक्षण साहित्य निर्मिती केलेली ही वाटचाल निश्चितच देशभक्त लोकांसाठी आनंदाची गोष्ट आहे.

आपला देश कृषिप्रधान आहे. मागील ४० वर्षांमध्ये भारताने सरकारी धोरणांमुळे सेंद्रिय, जैविक, नैसर्गिक इत्यादी शेती करण्याच्या पद्धती सोडून रासायनिक खतांवर आधारित शेती सुरू केलेली आहे. या रासायनिक खतांच्या निर्मितीसाठी लागणारे पोटॅश, युरिया, फॉस्फेट, डीएपी इत्यादी गोष्टी आम्हाला रशिया, जॉर्डन, मोरोक्को, ओमान इत्यादी देशांमधून आयात कराव्या लागतात. नागरिकांना विषमुक्त अन्न देण्यासाठी सरकार, शेतकरी, समाज यांनी विषमुक्त शेतीसाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

१४० कोटी लोकांच्या देशासाठी औषधे सुद्धा भरपूर लागतात. औषध निर्मिती करणाऱ्या मोठ्या कंपन्या आहेत, परंतु औषधांसाठी लागणारे एपीआय आणि केमिकल इंटरमिजिएट्स आम्हाला विदेशातून आणावे लागतात. या क्षेत्रात सुद्धा आत्मनिर्भरतेसाठी सरकारने सुरुवात केलेली आहे. उच्च दर्जाची यंत्रसामुग्री आपण दक्षिण कोरिया, जर्मनी, जपान या देशातून आयात करतो, ज्यामध्ये अत्याधुनिक सीएनसी मशीन सुद्धा आहेत. याही क्षेत्रामध्ये भारताने आत्मनिर्भर होण्याची आवश्यकता आहे. सोने हा भारतीयांचा आवडता खरेदी आणि गुंतवणूक पर्याय आहे. दरवर्षी भारत ९०० टन सोने आयात करतो. यामध्ये भारताचे परकीय चलन खूप मोठ्या प्रमाणावर खर्च होते. सोने खरेदी करायचे की गोल्ड ईटीएफ हा सुद्धा प्रत्येकाचा व्यक्तिगत निर्णय आहे. लिथियम बॅटरीमध्ये लागणारे लिथियम आणि अनेक खनिजांसाठी सुद्धा भारताला इतर देशांवर अवलंबून राहावे लागते. भारतात कापूस भरपूर पिकत असला तरी सुद्धा नायलॉन, पॉलिस्टर आणि इतर प्रकारच्या वस्तूंसाठी सुद्धा आम्हाला आयात करावीच लागते.

भारताला आत्मनिर्भर बनण्यासाठी, जे आमच्या देशात बिलकूल होत नाही, त्याच्यासाठी पर्याय काय काढता येईल याचा विचार करण्याची गरज आहे. केवळ सरकारनेच विचार करावा असे नाही, तर समाजाने सुद्धा स्वतःहून 'आम्ही काय वापरावे आणि काय वापरू नये' याचा निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. या दिवाळीमध्ये आम्ही चायनीज दिव्यांच्या माळा आणि पणत्या वापरण्यापेक्षा भारतीय उत्पादकांनी बनविलेल्या दिव्यांच्या माळा व स्थानिक कुंभारांनी बनविलेल्या मातीच्या पणत्या वापरून सर्वांचीच दिवाळी कशी आनंदाने आणि समृद्धीने भरून जाईल, याचा विचार व प्रयत्न करणे आवश्यक आहे. दिवाळीच्या निमित्ताने आत्मनिर्भर भारताचा प्रकाश सर्वत्र पसरावा, यासाठी स्वदेशीचा संकल्प ''सवयीने स्वदेशी, अत्यावश्यक तेव्हाच विदेशी'' करणे गरजेचे आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## आजचे संघगीत-१८

सोमवार, २० ऑक्टोबर २०२५

### मंत्र छोटा तंत्र सोपे

मंत्र छोटा तंत्र सोपे, परी यशस्वी ठरले ते
रीत साधी शिस्त बांधी, कार्य व्यापक उभवीते
मंत्र छोटा तंत्र सोपे

व्यक्ती व्यक्ती जमवूनी भवती, जागृत करणे तयाप्रती
मनात प्रीती हृदयी भक्ती, सेवा करणे नि:स्वार्थी
मंत्र छोटा तंत्र सोपे

असोत जाती नाती गोती, नसे तयांची आम्हा क्षिति
नकोच कीर्ती नको पावती, संघटनेने ये शक्ती
मंत्र छोटा तंत्र सोपे

हिंदू अवघा बंधू बंधू, भारतभूचा पुत्र असे
वंदुनी माता गौरव गाथा, सार्थक त्याचे होत असे
मंत्र छोटा तंत्र सोपे

युगायुगातून इतिहासातून, पराक्रमाची परंपरा
दरीदरीतून मैदानातून, चिरस्फुर्तिचा इथे झरा
मंत्र छोटा तंत्र सोपे

## वाचक पत्रे

### दिवाळी म्हणजे आनंदाचा दीपोत्सव!

बाहेर प्रकाशाचे दिवे लावायचे आणि हृदयातून ज्ञानाचे दिवे प्रज्वलित करायचे. अंत:करणात अज्ञानाचा, विषमतेचा, अहंकाराचा अंधार असेल तर तो दूर करायचा. ज्या प्रमाणे आकाश कंदील, पणत्या लावून बाहेरील अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते तसेच आपल्या अंत:करणात असलेल्या अवगुणांचा अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते. प्रत्येक मनुष्याने शुभ चिंतन करून, शुभ विचार मनात आणून, शुभ विचार प्रकट करून जीवन प्रगल्भ आणि समृद्ध करावे हाच संदेश दिवाळी देते. जीवनातून आसुरी शक्तीचा पराभव करण्यासाठी दैवी शक्तीचा वापर करावा. मानवाची सर्व धडपड जीवनात सुख आणि आनंद मिळवण्यासाठीच चाललेली असते. दुःख भोगल्याशिवाय सुखाची किंमत कळत नाही हे तत्त्वज्ञान सांगण्यासाठी ठीक; मात्र दुःखाची अनुभूती घेण्यास कोणालाही आवडत नाही. मनुष्य स्वभावातील हा स्थायीभाव ओळखूनच भारतीय संस्कृतीत सणांची निर्मिती केलेली असावी याचे भान ठेवूनच प्रत्येकाने सण साजरे करावेत.

गरीब, कष्टी, दीन, दुबळे, वंचित असा मोठा दु:खी वर्ग समाजात आहे. आपल्या घरी दिवाळी साजरी करताना त्यांच्याही घरी आनंदाचा एक दिवा लावावा म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर देखील आनंदाची रेषा पसरेल. अशा लोकांच्या चेहऱ्यावर हास्य पसरवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्यच आहे. चला तर मग दीन दुबळ्यांचे दु:ख वाटून घेऊ, मानवतेचा ओलावा देऊ, त्यांच्या पाठीवर प्रेमाचा हात फिरवू, त्यांच्या जीवनात सौख्य निर्माण करू. आपण या दिवाळीच्या निमित्ताने आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करू.

**श्याम ठाणेदार**

### मनाची तरी लाज बाळगा

'मनाचे श्लोक' म्हटले की समर्थ रामदास स्वामीच आठवतात. समर्थांचे महान कार्य, धर्मप्रेम, राष्ट्रप्रेम, बलशाली तरुण तयार करून राष्ट्राचे रक्षण व्हावे म्हणून सुरू केलेली बजरंगबलीची मंदिरे, मठ आणि आखाडे. त्याकरिता त्यांनी संपूर्ण भारत देश पिंजून काढला. केरळपासून काश्मीर, पूर्वोत्तर भारतात मठ स्थापन केले, ज्यातले काही अजूनही कार्यरत आहेत. आमच्या सर्वांचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे सुपुत्र, हिंदू धर्माकरिता प्राण देणारे, छत्रपती संभाजी महाराज, यांना हर तऱ्हेने सहाय करणारे, मौलिक सल्ला गुप्त संदेशाद्वारे देणारे समर्थ रामदास स्वामी. शारीरिक सुदृढतेसोबत मानसिक आरोग्य जपण्याकरिता दासबोध, सगळ्यांना मार्मिकतेने चिमटे काढत शिकवणारी मूर्खांची लक्षणे, आयुष्यातील प्रत्येक वळणावर मार्गदर्शन करणारे मनाचे श्लोक असे अजरामर साहित्य निर्माण करणारे समर्थ रामदास स्वामी. केवळ मना नावाची नायिका आणि श्लोक नावाचा नायक यांना घेऊन विकृत लिव्ह इन रिलेशनशिपवर मनाचे श्लोक नावाचा उथळ, उठवळ चित्रपट काढणारे निर्माता, दिग्दर्शक, कलाकार, सेन्सॉर बोर्ड सगळेच या बदनामीला जबाबदार आहेत. तसेच हा चित्रपट बंद पाडला म्हणून मराठी कलाकारांची जी आदळआपट सुरू आहे तीही निषेधार्हच आहे.

या चित्रपटाचा आणि 'मनाचे श्लोक' यांचा तिळमात्र संबंध नाही. फक्त 'मना' नावाची नायिका आणि 'श्लोक' नावाचा नायक यांची गोष्ट म्हणून चित्रपटाला 'मनाचे श्लोक' असे नाव देणे हा शुद्ध मूर्खपणा आहे. चित्रपटात समर्थ रामदासांच्या उपदेशांवरती आधारित असे अजिबात काहीही नाही. समर्थांचे काही विचार सुचवले आहेत असे पण नाही. या उलट 'भारतीय लग्न संस्था' यावर नकारात्मक मांडणी केली आहे. ''आधी प्रपंच करावा नेटका'' असा उपदेश करणारे समर्थ रामदास स्वामी आणि लग्न संस्थेवर नकारात्मक टीका करणारे चित्रपटाचे नाव 'मनाचे श्लोक' पाहूनच म्हणावेसे वाटते जनाची नाही तर निदान मनाची तरी लाज बाळगा.

**रवी वाघमारे**

# बँकिंगविषयक तक्रारींच्या निपटाऱ्यासाठी : लोकपाल-ओम्बडसमन्

**बँकांमधील व्यवहार हे पैशांचे असल्यामुळे त्यात कधीतरी हलगर्जीपणा किंवा एखादी चूकदेखील होऊ शकते. अनेकदा बँकेतच ग्राहकांच्या अशा विविध तक्रारींचे निराकरण केले जाते. पण, जर ग्राहकाला बँकेकडून न्याय मिळाला नाही, तर तक्रार दाखल करण्याची सर्वांत अंतिम पातळी आहे ती म्हणजे 'बँकिंग लोकपाल' योजना. लोकपालकडे तक्रार करून ग्राहक आपल्या हक्कांचे संरक्षण करू शकतात. त्याविषयी आजच्या लेखात सविस्तर माहिती जाणून घेऊया...**



अर्थ वृत्तांत
शशांक गुळगुळे


ग्राहकांना चांगली व दर्जेदार सेवा देणे हे प्रत्येक बँकेचे कर्तव्य असते, तसेच बँकेच्या नियमांचे तंतोतंत पालन करणे, हेदेखील ग्राहकांचे कर्तव्य असते. बऱ्याच तक्रारी या तिथल्या तिथे जागेवरच मार्गी लागतात. बँकेच्या शाखेत तक्रारींचे निराकरण झाले नाही, तर प्रादेशिक कार्यालय, विभागीय कार्यालय व मुख्य कार्यालय असे टप्प्याटप्प्याने जाता येते. पण, या पातळींवर ग्राहकाचे समाधान झाले नाही व त्याच्यावर अन्याय होत आहे, असे जर त्याला वाटले, तर तो बँकिंग लोकपालकडे तक्रार करू शकतो आणि इथेही तक्रारीचे निराकरण झाले नाही, तर न्यायालय हा मार्ग आहेच!

बँकांनी ग्राहकांशी कसे वागावे, या संबंधीचे निश्चितच काही नियम आहेत. त्यास 'बँकिंग कोड्स ॲण्ड स्टॅण्डर्ड बोर्ड ऑफ इंडिया' म्हणतात. बँकांकडून दिल्या जाणाऱ्या सेवांमधील त्रुटीसंबंधीच्या तक्रारींची दखल घेऊन लवकरात लवकर त्यांचे निवारण करण्यासाठी कायदेशीर व संस्थात्मक मध्यस्थ म्हणजे 'बँकिंग लोकपाल योजना' आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेचे सर्व प्रकारच्या बँकांवर नियंत्रण असते. लोकपाल नेमणुकीसह सर्व कार्यप्रणाली 'आरबीआय'च्या अखत्यारीत आहे. 'लोकपाल योजना' १९९५ साली सुरू करण्यात आली. त्यानंतर काही बदल केले गेले, काही योजना वेगळ्याही झाल्या. आता २०२१ सालापूर्वी कार्यरत झालेल्या तीन योजना आहेत.

१) बँकिंग लोकपाल योजना, २००६ सुधारित-दि. १ जुलै २०१७, २) नॉन-बँकिंग वित्तीय कंपन्यांसाठी लोकपाल योजना-२०१८, ३) डिजिटल व्यवहारांसाठी लोकपाल योजना, २०१९.

तिन्ही योजनांना एकत्रित करून त्यामध्ये काही नियम व प्रथा बदलून, तर काहींची नव्याने भर घालून तयार केलेली 'एकात्मिक लोकपाल योजना' दि. १२ नोव्हेंबर २०२१ रोजी लागू करण्यात आली. सार्वजनिक बँका, तसेच खासगी, ग्रामीण, सहकारी व इतर सर्व प्रकारच्या बँकांमधील बँकिंग सेवांमधील त्रुटी, कमतरता यासंबंधी ग्राहकांच्या तक्रारी आणि त्या सोडविण्यासाठी नेमलेली सर्व बँकांसाठी एकमेव व्यक्ती म्हणजे, वरिष्ठ अधिकारी लोकपाल. भारत सरकारने बँकेच्या ग्राहकांच्या समस्या आणि तक्रारी यांचे योग्य निराकरण करण्यासाठी विशेषात्वाने तयार केलेले पद म्हणजे बँकिंग लोकपाल. असंतुष्ट ग्राहकांची दखल घेण्याची सोय इथे केलेली आहे. त्यांच्या तक्रारींची संपूर्ण चौकशी करून, समस्या सोडविण्याची जबाबदारी देखील लोकपालपदाची असते. जिथे शक्य असेल, तिथे काही सुधारणादेखील केल्या जातात. त्यावर काम करण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँक एका वरिष्ठ, अनुभवी अधिकारी व्यक्तीवर जबाबदारी देते. त्या व्यक्तीचे पद व कार्य यास 'बँकिंग लोकपाल योजना' संबोधतात. या पदावर नियुक्त होण्यासाठी त्या व्यक्तीला कायदेशीर, बँकिंग, वित्तीय सेवा, सार्वजनिक प्रशासनाचा उच्च दर्जाचा अनुभव, व्यक्तिमत्त्वास अनेक कंगोरे असणे आवश्यक आहे.

२००६ सालामधील या योजनेद्वारे देऊ केलेल्या काही ठराविक सेवांबद्दल काही तक्रार असेल, तर त्याची नोंद घेणे व तक्रारीचे निराकरण, तसेच समाधान करताना सुलभ जाईल. त्यांची यादी केली गेली. त्यात २०१७ साली भर पडली व काही सेवा त्यातून काढूनही टाकण्यात आल्या.२०१८ - बिगर बँकिंग वित्तीय कंपन्यांच्या ग्राहकांच्या सेवेबद्दल असलेल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी सुरू केलेली 'लोकपाल योजना' आहे. ही सेवा निःशुल्क आणि जलद होती.




२०१९ डिजिटल व्यवहारांसाठी लोकपाल योजना. या योजनेचा उद्देश ग्राहक सेवेचा स्तर सुधारणे हा आहे. 'कार्ड', 'एटीएम', 'पेटीएम', 'जीपे', 'भीम', 'मोबाईल बँकिंग', 'एनईएफटी', 'आरटीजीएस' अशा वैविध्यपूर्ण माध्यमातून सध्या इलेक्ट्रॉनिक बँकिंग सुरू आहे. यासाठी रिझर्व्ह बँकेने आधीच्या योजनांचे एकत्रीकरण केले. त्यात सुधारणा करून नवी 'एकात्मिक लोकपाल योजना' देखील तयार केली.

यात वर्तमान व भविष्याचा वाढीव आवाका लक्षात घेऊन विस्तृत बँकिंग सामावून घेतलेले आहे. 'एक देश, एक लोकपाल' या सूत्रावर आधारित ही योजना आहे. पूर्वी विभागानुसार लोकपाल नियुक्त केले होते. आता त्यात बदल करण्यात आला आहे. संपूर्ण देशभरातील सर्व बँकांकडील तक्रारी चंदीगढ येथील भारतीय रिझर्व्ह बँक, केंद्रीकृत जमा आणि प्रक्रिया केंद्राकडे येतात व त्यांवर कारवाई केली जाते. तक्रार प्रत्यक्ष ई-मेल किंवा पोस्टाने करता येते. रिझर्व्ह बँकेच्या कोणत्याही कार्यालयात थेट प्राप्त झालेल्या तक्रारी पुढील कारवाईसाठी चंदीगढच्या ऑफिसमध्ये पाठविल्या जातात. या पोर्टलच्या माध्यातून ऑनलाईन तक्रार नोंदविता येते. ग्राहक त्याच्या स्थानिक भाषेत तक्रार करू शकतो. तक्रार करताना सर्व बारकावे तारीखवार क्रमवार लिहिले पाहिजेत.

नाव, पत्ता, फोन नंबर, बँक व शाखेचे नाव, खाते नंबर व खात्याचा प्रकार, कस्टमर आयडी, व्यवहाराचे स्वरूप, कसे हवे आणि काय झाले अशी सर्व माहिती सविस्तर द्यावयास हवी. खाली खातेदाराच्या सह्या हव्यात. हस्तलिखित टाईप केलेली प्रत्यक्ष नेऊन दिलेली, पोस्टाने अथवा ई-मेलवर पाठविलेली तक्रार ग्राह्य धरली जाते. तक्रार हिंदी, इंग्रजी व अन्य आठ प्रादेशिक भाषांमध्ये करता येते. तक्रार नोंदणी झाल्याची पावती घेऊन नीट ठेवावी. कोणत्या योजनेत आपली तक्रार येते, याचे ज्ञान तक्रार करणाऱ्याला असणे अशक्य असते. म्हणून तक्रारदाराने कोणत्या योजनेत लोकपालकडे तक्रार केली आहे, हे त्याने सांगण्याची गरज नाही. लोकपाल निकाल देताना, त्या सर्व नोंदी त्यात असतात.

बँकेला तिच्या पुढील विशिष्ट जबाबदार कामगिरीसाठी काय करायचे आहे, हे सांगितले जाते. तक्रारदाराला नुकसानभरपाई म्हणून बँकेकडून द्यायची रक्कम कळवली जाते. निकालपत्र मिळाल्यावर ३० दिवसांच्या आत तक्रारदारास निकाल मान्य आहे की नाही, ते कळवावे लागते व त्यापुढील ३० दिवसांच्या आत बँकेने निकालाचे पालन करायचे असते. तक्रारदाराच्या कोणत्याही नुकसानीसाठी वेळ, खर्च, छळवणूक, मानसिक क्लेश यासाठी २० लाख रुपयांपर्यंत भरपाई देण्याचे अधिकार लोकपालांना आहेत. तक्रार करण्यासाठी पत्ता केंद्रीकृत जमा आणि प्रक्रिया केंद्र चंदीगढ लोकायुक्त कार्यालय, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, पहिला चौथा मजला, १४९-१५२, १७ सी. चंदीगढ-१६००१७. टोल फ्री नंबर-संपर्क केंद्र-१४४४८. सकाळी ९.३० ते सायं ५.१५ पर्यंत या क्रमांकावर आपली तक्रार बँक ग्राहकांना नोंदविता येईल.

---

## क्युपिड लिमिटेड महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्काराने सन्मानित

**मुंबई** : क्युपिड लिमिटेड ही भारतातील हेल्थकेअर आणि वेलनेस उत्पादनांचा अग्रणी ब्रँड आहे. या कंपनीला महाराष्ट्र राज्य सरकारने नुकताच निर्यात पुरस्कार देऊन सन्मानित केले.

हा पुरस्कार सोहळा नुकताच मुंबईत आयोजित करण्यात आला होता. ही कंपनी आपली उत्पादने आफ्रिका, ल्याटीनं अमेरिका, आशिया, युरोप आणि मध्यपूर्व या देशांत निर्यात करते. हेल्थ केअर आणि वेलनेस या उत्पादनान्त या कंपनीचा ब्रँड विश्वासार्ह मानला जातो. ही कंपनी १९९३ पासून कार्यरत आहे. पुरुषांचे कंडोम, लुब्रिकन्ट्स, डिओडोरंट, अत्तरे, बदाम तेल, बॉडी ऑइल, पेट्रोलियम जेली तसेच एफएमसीजी उत्पादने ही कंपनी उत्पादीत करते.

कंपनीची सार्वजनिक आरोग्य व जनकल्याणासाठी बांधिलकी आहे. कंपनी आंतरराष्ट्रीय मानकांशी सुसंगत नैतिक व्यवसाय करते. कंपनीने नुकतीच सॅनिटायझर, केस काढण्याचे तेल व फेस वॉश यांचे उत्पादनही सुरु केले आहे. या कंपनीने महाराष्ट्रातील पलावा येथे जमीन खरेदी केली असून, येथे युनिट उभे राहिल्यावर कंपनीची उत्पादन क्षमता वाढेल. कंपनीची उत्पादने ११० हून अधिक देशांत निर्यात होतात परिणामी कंपनीला जास्त उत्पन्न निर्यातीतून मिळते.

## ग्रीनसोलच्या शाश्वत भविष्यासाठी नवे उपक्रम

**मुंबई** : ग्रीनसोल फाउंडेशनने मुंबईतील जयहिंद कॉलेजच्या सहकार्याने सस्टेनन्स २०२५ वार्षिक शाश्वतता कार्यक्रम नुकताच यशस्वीपणे आयोजित केला.

यात देशभरातील नेते, धोरणकर्ते, विद्यार्थी आणि परिवर्तनकर्ते एकत्र आले आणि शाश्वत व समान जग निर्माण करण्यासाठी कृतीयोग्य मार्गांवर चर्चा केली. २०१६ मध्ये खेळाडू श्रीयांस भंडारी आणि रमेश धामी यांनी स्थापन केलेल्या ग्रीनसोल फाउंडेशनने वापरात नसलेले व कपडे यांचा पुनर्वापर करून ते गरीब मुलांसाठी पादत्राणे, पिशव्या आणि चटई या स्वरूपात रूपांतरित केले.

संस्थेने आतापर्यंत ८ लाख पादत्राणांचा पुनर्वापर करून ते गरिबांना वाटले आहेत. याशिवाय कौशल्य केंद्रे स्थापन केली आहेत. कार्यक्रमांची सुरवात माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांच्या भाषणाने झाली. त्यांनी आपल्या भाषणात, शिक्षण तसेच युवकांच्या नवकल्पनांच्या शक्तीची माहिती दिली. यात चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्या पॅनेल सत्रात बरेच वक्ते सहभागी झाले होते. यांचे संयोजन श्रीयांस भंडारी यांनी केले. दुसरे पॅनेल सत्र 'परोपकार, धोरण आणि जागतिक भागीदारी : सामूहिक परिवर्तनाची दिशा' या विषयावर आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी प्लास्टिक कचऱ्यापासून तयार केलेल्या पर्यावरणपूरक कचऱ्याच्या डब्याचे अनावरण करण्यात आले. त्याशिवाय यात ग्रीनसोलच्या प्रवासावर आधारीत माहितीपट दाखविण्यात आला. याचा समारोप जयहिंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने झाला.

## भारत समुद्री सप्ताहची केंद्रीय मंत्री सोनोवाल यांच्यातर्फे घोषणा

**अर्थ उद्योग वार्ता**

**मुंबई** : भारत सरकारच्या बंदर, नौकानयन आणि जल मार्ग मंत्रालयाने आणि इंडियन पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने भारत समुद्री सप्ताह मुंबईत २७ ते ३१ ऑक्टोबर या दरम्यान आयोजित करण्यात आला आहे.

केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी यावेळी बोलताना, भारताच्या सागरी क्षेत्राच्या दीर्घाकालीन योजनाविषयीची माहिती दिली. ते म्हणाले की, ''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणांमुळे, भारताचा सागरी प्रवास नव्या पर्वात प्रवेश करीत आहे. पंतप्रधानांच्या गतिमान नेतृत्वाखाली आम्ही देशातील बंदरे, नौकानयन आणि लॉजिस्टिक्स प्रणाली अधिक सक्षम, टिकाऊ व भविष्याभिमुख करण्यासाठी कार्यरत आहोत,'' असेही सोनोवाल यांनी सांगितले.

ते म्हणाले की, ''२०४७ पर्यंत आम्ही जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा उभारून, मोठ्या प्रमाणावर गुंतवणूकीला चालना देऊन आणि ब्लू इकॉनॉमी मध्ये स्पर्धा वाढवून, भारताला सागरी महासत्ता करण्याचा संकल्प केला आहे. यासाठी १ ट्रिलियन अमेरिकी डॉलर गुंतवणूकीचा रोड मॅप तयार करण्यात आला आहे. भारत जगासोबत हात मिळवणी करून समृद्ध, टिकाऊ आणि सर्व समावेशक सागरी भविष्यासाठी नेतृत्व करण्यास तयार आहे. २०४७ पर्यंत भारताने सागरी मार्गांत जागतिक नेतृत्वाचे ध्येय ठेवले आहे. तो पर्यंत सुमारे ८० लाख कोटींची गुंतवणूक आणि १.५ कोटी रोजगारनिर्मिती हे लक्ष्य आहे.



२०१४ नंतर आंतरिक जल मार्गावरिल मालवाहतूक आठपट वाढली आहे. देशातील सर्व प्रमुख १२ बंदरे २०४७ पर्यंत पूर्णपणे कार्बन - न्यूट्रल करण्यात येणार आहेत, असेही त्यांनी सांगितले. या भारत समृद्धी सप्ताहात १०० हून अधिक देशांतील मंत्रिमंडळ प्रतिनिधी, १ लाख प्रतिनिधी व ५०० प्रदर्शक सहभागी होणार आहेत.

---

# समृद्धीसाठी अस्तंबा शिखराच्या दिशेने पडली पावले!





**नंदुरबार, १९ ऑक्टोबर**

अवघ्या भारतात पसरलेल्या पर्वतांमध्ये सातपुडा एक महत्त्वाची पर्वतरांग आहे. मध्य भारतात असून, हा पर्वत गुजरात, महाराष्ट्र, मध्य प्रदेश व छत्तीसगड या राज्यांना जोडतो. याच सातपुड्याच्या चौथ्या रांगेत अस्तंबा हे ऐतिहासिक व धार्मिक पार्श्वभूमी लाभलेले शिखर आहे. या शिखरावर अनादिकाळापासून आश्विन अमावास्येला पूजाविधी होतात. ही विधी सातपुड्याच्या कुशीत वसलेल्या आदिवासी बांधव रूढी-परंपरेनुसार करीत आला आहे. या परंपरेला अनुसरूनच पूजाविधीला यंदाही सातपुड्यातील आदिवासी बांधवांना प्रतीक्षा लागली होती.

खरेतर आदिवासीमध्ये आश्विन महिन्याच्या सुरुवातीला विविध उत्सव तथा पूजाविधींना सुरुवात झाली. या महिन्याच्या सुरुवातीलाच (पौर्णिमेला) आदिवासींनी नवाय हा उत्सव साजरी केला. नवायच्या अखेरच्या दिवशी आदिवासींमधील पूर्वज व काही राजांनी सुरू केलेला दसराही मनवला. या बाधवांमध्ये नऊ दिवसांची नवाय, दहा दिवसांचा दसरा व वीस दिवसांची दिवाळी हे प्रचलित वाक्य सातत्याने उच्चारले जाते. तसे यंदाही प्रत्येकाच्या तोंडून हे वाक्य उच्चारले जात आहे. आश्विन पौर्णिमेला नवायला सुरुवात करून पौर्णिमेच्या दहाव्या दिवशी दसरा साजरा केल्यानंतर वीस दिवसांनी दिवाळीही साजरी होत आहे. यावरून आदिवासींमध्ये कालगणनाही चंद्राच्या आकारावरुन केली जात असल्याचे स्पष्ट होत आहे.

### असे पाळतात व्रत अर्थात पालनी

अस्तंबा शिखरावरील दिवाळी पूजा प्रत्येक आदिवासी कुटुंबामार्फत केली जाते. प्रामुख्याने या पूजेसाठी अस्तंबाकडे जाणारा व्यक्ती हा कुटुंबातील कर्ता असतो. त्या व्यक्तीला पूजेसाठी आवश्यक असणारे व्रत (पालनी) पाळावे लागतात. हा व्यक्ती दिवाळीपूर्व किमान सव्वा महिने आधी पवित्र स्नान करतो. या पालनी कालावधीत या व्यक्तीला महिलांचा स्पर्श, खाटेवर बसणे, दगड फेकून मारणे, कुसंगत करणे, वाईट विचार करणे या बाबी टाळाव्या लागतात. एवढेच नव्हे; तर त्या व्यक्तीला भोपळ्याचे सेवन करणेही टाळावे लागत असल्याचे म्हटले जाते. शिवाय, त्या व्यक्तीला सव्वा महिन्याच्या कालावधीत सुरुवातीची पवित्र स्नान करताना अंथरुण-पांघरुण, अन्य कपडे व जेवणाची भांडीदेखील स्वच्छ करावी लागतात. या वस्तू सव्वा महिनाभर त्या व्यक्तीशिवाय अलिप्तच ठेवावी लागतात. पूजेसाठी निघताना संपूर्ण साहित्यांची जुळवाजुळव त्याच व्यक्तीने करावी, अशी काही पालनीची पथ्ये पाळावी लागतात.



### अशी आहे 'डोगोअं दिवालीची पूजा'

अस्तंबा शिखरावर दीपोत्सव कालावधीत होणाऱ्या पूजेला 'दिवाळीची पूजा' म्हटले जाते. या पूजेला आदिवासी बांधवांमध्ये 'डोगोअं दिवालीची पूजा' म्हटले जाते. ही पूजा सुरू झाल्यापासून महाराष्ट्राशिवाय गुजरात, मध्य प्रदेशातून हजारो भाविकांची पावले अस्तंबा शिखराकडे पडू लागली आहेत. भाविकांचा ओघ वाढत चालल्यामुळे हीच 'डोगोअं दिवालीची यात्रा' ठरविली गेली. मात्र, ही यात्रा नसून आजही दिवाळीच आहे. ही पूजा केवळ एखाद्या देव-देवतांप्रति केली जात नसून, हवा, पाणी, सूर्यप्रकाश व अन्न या निसर्गातील घटकांची पूजा होते.

### अवघ्या जगाच्या कल्यासाठीच प्रार्थना

परंपरेनुसार अस्तंबा शिखरावरील पूजेसाठी नव्या अन्नाचे कण, दोरखंड, रोशा गवत प्रवर्गातील एका वनस्पतीची मूठभर मोळी सोबत नेली जाते. अस्तंबा शिखरावरील ही पूजा मायभूवर असलेले समस्त मानव, पशू-पक्षी यांच्यासह प्रत्येक जीवजंतू, जल-जंगल यांच्या भरभराटीसाठी केली जाते. त्यामुळे अवघ्या जगाच्या कल्याणासाठीच प्रार्थना केली जात असल्याचे स्पष्ट होत आहे. म्हणूनच या पूजेसाठी केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे; तर गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान व छत्तीसगड या राज्यांतूनही भाविक दाखल झाले आहेत.

### भाविकांकडून जाताना रस्त्यात होते भावभक्तीत पूजा

तेथून पुढे जाताना रस्त्यात डोकीअं डोण (मोठा दगड) हे या दिवाळी पूजेतील दुसरे पूजेचे ठिकाण असून, याची भावभक्तीत पूजा होत आहे. त्यानंतर येणारे हाकडाथेवा (निवडुंगवर्गीय वनस्पती) घसरणी, यासह देवस्थानावरही पूजा केली जात आहे. त्यानंतर पूजेच्या मुख्य ठिकाणी भाविक दाखल होत आहेत. तेथे भाविक आदिवासी समाजातील कथाकार, इतिहासकार (आदिवासींमधील मोडवी) व पुजारा यांच्यामार्फत पूजाविधी पूर्ण करीत आहेत. त्यानंतर शिखरावरील पूजाविधी पूर्ण झाल्यानंतर बहुतांश भाविक गाय किवाडी या देवस्थानाचेही दर्शन घेत आहेत.

### असे जावे लागते अस्तंबा शिखराकडे...

अस्तंबा शिखराला आज मोठे धार्मिक महत्त्व प्राप्त झाले, म्हणून अस्तंबा शिखर अगदी अवघड असूनही ते सर करताना फारसा थकवा जाणवत नाही. शिवाय, कुठलाही अनुचित घडत नसल्याचे म्हटले जाते. अस्तंबा शिखरावर जाण्यासाठी असली, पाडली, नकट्यादेव व चांदसैली या गावांवरून मार्ग आहे. असली व पाडलीकडून शिखराच्या स्थानकापर्यंत जाण्यासाठी रस्ता आहे; परंतु नकट्यादेव व चांदसैलीवरून जाताना मात्र पायवाटेचाच पर्याय आहे. रस्ता व पायवाटेने शिखराकडे जाणारा प्रत्येक भाविक स्थानकात प्राथमिक पूजाविधी करतो. त्यानंतर शिखराच्या दिशेने वाटचाल करताना रस्त्यात लागणाऱ्या उगलकुंडीत (पाण्याचे कुंड) येथे पवित्र स्नान केल्याशिवाय कुठल्याही भाविकाला मार्गस्थ होता येत नाही. त्यामुळे प्रत्येक भाविक पवित्र स्नान करीत आहे.



### 'आठहिवटी' पूजेनंतर पिकांची मळणी

खऱ्या अर्थाने अस्तंबा शिखरावरील पूजा जगातील रोगराईपासून सुटका, अन्नधान्याच्या वाढीसाठी, शिवाय संपूर्ण समृद्धीसाठी केली जात असल्याने अस्तंबा देवस्थानाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. शिखराकडून घराकडे परतणारा भाविक सोबत नेलेल्या वस्तू परत घराकडे नेत आहेत. डोगोअं दिवाळीच्या पूजेनंतर पुन्हा प्रत्येक आदिवासी कुटुंबात विधिवत नव्या अन्नाची पूजा पूर्ण केली जात आहे. या पूजाविधीला 'आठहिवटी' म्हटले जात आहे. या संपूर्ण विधी पूर्ण केल्याशिवाय खरीप हंगामात पिकवलेल्या पिकांची मळणी केली जात नाही. त्यामुळे पिके परिपक्व झाली असली, तरी त्यांची केवळ कापणीच सुरू आहे. कापणी पूर्ण झालेली पिके पारंपरिक खळ्याच्या ओट्यावर रचून ठेवली आहेत. काही कुटुंबांत या पूजाविधी आटोक्यात आणण्यासाठी आदिवासी बाधवांची धावपळ सुरू आहे.

क्रीडा वृत्त...



## हस्ती स्कूलमध्ये कांतिलाल जैन यांची जयंती उत्साहात

**दोंडाईचा (शिंदखेडा)** : हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती पब्लिक स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, हस्ती वर्ल्ड स्कूल व हस्ती गुरुकुलमध्ये शनिवारी (१८ ऑक्टोबर) मानवमित्र, खान्देशरत्न, सहकारमहर्षी (स्व.) कांतिलाल जैन यांची ७९ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्राचार्य राजेंद्र त्रिभुवन, प्राचार्य जीवन सपकाळे, मुख्याध्यापक सदाशिव महाजन यांनी प्रतिमापूजन केले. प्रशासकीय अधिकारी रेखा गाडेकर, उपप्राचार्या रझिया दाऊदी, समन्वयक मनोज ठाकूर, महेश डिगराळे, समन्वयिका समीना बोहरी, पूनम गुरुबानी आदी उपस्थित होते. मनोज ठाकूर यांनी प्रास्ताविकात, (स्व.) कांतिलाल जैन यांचे चरित्र कथन करताना स्वयंशिस्त, कर्तव्यनिष्ठा व पारदर्शक व्यवहाराचे तत्त्व आदी विशद केले. प्राचार्य, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शिक्षणाबद्दल सदैव जागृत राहून; गुणवत्तायुक्त शिक्षण देण्यास, सोबत विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याच्या संकल्पासह प्रतिज्ञा घेतली. मुख्याध्यापक सदाशिव महाजन यांनी प्रतिज्ञेचे वाचन केले. स्कूलच्या प्रवेशद्वाराच्या प्रांगणात चेअरमन कैलास जैन यांच्या उपस्थितीत शिक्षकांनी वृक्षारोपण केले.



## तीनमौली येथे श्रमदानातून वनराई बंधारा

**नंदुरबार** : पिंपरीपाडा (ता. नवापूर) ग्रुप ग्रामपंचायतींतर्गत तीनमौली गावाजवळील नाल्यावर वनराई बंधारा बांधण्यात आला. सरपंच प्रमिला पाडवी, ग्रामपंचायत अधिकारी कमल मावची, उपसरपंच लता वसावे, ग्रामपंचायतीचे सदस्य रवींद्र वळवी, रेखा वसावे, सुदाम वळवी, तसेच गावातील बचत गट व तरुण मंडळी, रोजगार सेवक व कर्मचाऱ्यांनी श्रमदान केले. जलसंवर्धन ही काळाची गरज आहे. पर्यावरणाचे रक्षण करण्याची जबाबदारी आपली आहे. उद्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी जलसंवर्धन, पर्यावरणाचे रक्षण करणे आवश्यक आहे. जैवविविधता टिकवणेही आव्हान आहे. ते पेलण्यासाठी प्रयत्न करणे हेही कर्तव्य आहे. पर्यावरण रक्षणाचे महत्त्व लोकांना कळावे व गाई-गुरांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी वनराई बंधारा बांधण्यात आला, असे सरपंच प्रमिला पाडवी यांनी सांगितले.




## पाटील महाविद्यालयात मानसिक आरोग्य दिन साजरा

**नंदुरबार** : येथील जी. टी. पाटील महाविद्यालयात जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त कार्यक्रम झाला. प्राचार्य प्रा. डॉ. एम. जे. रघुवंशी अध्यक्षस्थानी होते. संस्थेचे समन्वयक डॉ. एम. एस. रघुवंशी, उपप्राचार्य डॉ. एस. पी. पाटील प्रमुख अतिथी होते. शासकीय रुग्णालयाचे समुपदेशक डॉ. सुभाष पवार प्रमुख वक्ते होते. प्राचार्य डॉ. रघुवंशी यांनी, विद्यार्थ्यांनी दिनचर्येत आरोग्यसंपन्न सवयींचा अवलंब करणे आवश्यक असल्याचे सांगितले. डॉ. सुभाष पवार यांनी, विद्यार्थिदशेतच व्यक्तिमत्त्व, सवयी, विचारसरणी आणि मूल्य घडत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी केवळ बौद्धिक विकासावरच नव्हे, तर शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे, असे सांगितले. डॉ. एस.आर. सूर्य यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. एस. यू. अहिरे यांनी प्रास्ताविक केले. खुशी तांबोळी यांनी सूत्रसंचलन केले. शेवंती भिल हिने आभार मानले. कार्यक्रमासाठी प्रा. एस. डी. गवळी यांनी सहकार्य केले.



## महेंद्र पब्लिक स्कूलतर्फे विद्यार्थ्यांना भेटवस्तू वितरण

**नंदुरबार** : येथील महेंद्र पब्लिक स्कूलतर्फे सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वेच्छेने ५० रुपयांचे योगदान देऊन एकत्रित निधी जमा केला. या निधीतून आश्रमशाळेतील ५० विद्यार्थ्यांना पौष्टिक भोजन आणि दिवाळी भेटवस्तू किट देण्यात आले. या कृतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये "देण्यातच खरा आनंद आहे" हा संदेश प्रभावीपणे पोहोचला. निझर येथील दिनेशभाई पाटील, यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक सुनील पाटील, शाळेच्या संचालिका पिनल शहा, प्राचार्य अरुण पाटील प्रमुख अतिथी होते. पिनल शहा यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी स्वतःहून समाजासाठी पुढे येणे ही आनंदाची बाब आहे. अशा उपक्रमांमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सामाजिक जबाबदारीची जाणीव वाढते.




## दहिवद येथील रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**शिरपूर** : दहिवद येथील एसव्हीकेएम अभियांत्रिकी महाविद्यालय व अस्तित्व सोशल वेल्फेअर फाउंडेशन यांच्यातर्फे माजी मंत्री तथा आमदार अमरिशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर घेण्यात आले. शिबिराचे उद्घाटन प्रमुख पाहुण्या फाउंडेशनच्या संचालिका कु. द्वेता भूपेशभाई पटेल, उद्योजक प्रशांत अग्रवाल, प्राचार्य डॉ. नितीन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिराला विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या ५२ जणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान केले. शिबिराच्या यशस्वितेसाठी प्राचार्य डॉ. नितीन पाटील, समन्वयक सोनिया भसीन, प्रा. लोकेश सोनार, स्वीय सहाय्यक योगेश्वर माळी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी प्रतिनिधींनी प्रयत्न केले.



## नंदुरबार पालिकेला पाटील महाविद्यालयाची भेट

**नंदुरबार** : येथील गजमल तुळशीराम पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. जे. रघुवंशी यांच्या मार्गदर्शनात राज्यशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासपूरक उपक्रमांतर्गत पालिकेला भेट देऊन प्रत्येक विभागाचे कामकाज जाणून घेतले. या वेळी मुख्याधिकारी राहुल वाघ, पालिकेचे समन्वयक संजय माळी, विषय शिक्षक डॉ. एम. एम. महाजन, प्रा. एस. एस. दातीर उपस्थित होते. क्षेत्रभेटीवेळी पालिकेचे सर्व विभागप्रमुख आणि कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी निवडून येणाऱ्यांनाच प्राधान्य

### आमदार रघुवंशी : कोळदा, खोंडामळीत शिवसेना शिंदे गटाचा मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, १९ ऑक्टोबर**

जिल्ह्यात आणि तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत निवडून येणाऱ्या व्यक्तींनाच उमेदवारीसाठी प्राधान्य देण्यात येईल. ज्यांना निवडणूक लढवायची असेल, त्यांनी पक्षाकडे अर्ज करावेत. त्यांचा नक्की विचार करण्यात येईल. निवडणुकीत जनतेला ग्राह्य धरण्यात येऊ नये. जनता सर्व ओळखून आहे, असे प्रतिपादन शिवसेनेचे संपर्कप्रमुख आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी केले.



आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नंदुरबार तालुक्यातील कोळदा व खोंडामळी येथे आमदार चंद्रकांत रघुवंशी म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कार्यकर्त्यांच्या असतात. आता कार्यकर्त्यांनी त्यांचे कर्तव्य पार पाडायला पाहिजे. पक्षाचे आमदार, खासदारांच्या निवडणुका गेल्या. कार्यकर्त्यांनी त्यांचे कर्तव्य निवडणुकांमध्ये पार पाडल्यामुळेच राज्यात मोठ्या संख्येने शिवसेनेचे उमेदवार निवडून आले. कार्यकर्त्यांची जिल्ह्याची आणि तालुक्याच्या जनतेची प्रामाणिक सेवा केली. त्यामुळेच ईश्वरी कृपेने कोपर्लीचे आरक्षण ओबीसी पुरुष निघाले. मागील पंचवार्षिक निवडणुकीत एकाच परिवारातील पाच जणांना उमेदवारी देण्यात आली. आदिवासी समाजाची प्रामाणिकपणे सेवा केली आहे. त्याच्या प्रमाणपत्राची मला कोणाचीही गरज नाही, असेही त्यांनी नमूद केले.

पंचायत समितीचे माजी सभापती विक्रमसिंह वळवी म्हणाले की, माजी आमदार बटेसिंगभय्या रघुवंशी यांनी जिल्हा परिषद व पंचायत समितीत आदिवासी समाजातील अनेक युवकांना पदाधिकारी म्हणून काम करण्याची संधी दिली. त्यांनीही दिलेल्या विश्वासाबद्दल तडा जाऊ दिला नाही. आदिवासींच्या राजकीय जीवनात जसजशी संधी देण्यात आली, तसतसे जनतेत राहून काम करून विश्वास संपादन केला.

जिल्हा परिषदेचे माजी सदस्य देवमन पवार, कोळदा गटात दोन निवडणुकांमध्ये चुकीच्या निर्णयांची खंत असून, आता ग्रामस्थांनीही विचार करण्याची गरज आहे. गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत पहिल्या टर्मच्या निवडणुकीत गावातील उमेदवाराला पराभूत करीत बाहेरच्या उमेदवाराला विजयी करण्यात आले, असेही आमदार रघुवंशी यांनी नमूद केले.

या वेळी शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड. राम रघुवंशी, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष वकील पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख डॉ. सयाजीराव मोरे यांनीही मार्गदर्शन केले. याप्रसंगी शिवसेना पदाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांतील पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## राज्य नोबेल विज्ञान पुरस्कारासाठी 'समुत्कर्ष'चे महाजन यांची निवड



**नंदुरबार** : दिवंगत माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त जळगाव येथील नोबेल फाउंडेशन, नोबेल विज्ञानप्रसारक बहुउद्देशीय संस्था व अमळनेर येथील स्वामी विवेकानंद इंटरनॅशनल स्कूलतर्फे नुकतीच राज्यस्तरीय नोबेल विज्ञान पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. यात माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या नावाने दिल्या जाणाऱ्या नोबेल विज्ञान प्रतिभा पुरस्कारासाठी नंदुरबार येथील समुत्कर्ष बहुउद्देशीय संस्थेचे संचालक ललित महाजन यांची निवड करण्यात आली आहे.

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रचार व प्रसारासाठी कार्य करीत असणाऱ्या संस्था, शिक्षक व विद्यार्थ्यांना दरवर्षी राज्यस्तरीय नोबेल विज्ञान पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. यासाठी पुरस्काराने नीरज अग्रवाल, डॉ. प्रमोद माहुलीकर, डॉ. संजय शेखावत, जामनेर येथील पोदार जिनियस इंटरनॅशनल स्कूलचे सहकार्य लाभते. विज्ञान पुरस्कार संस्था गटासाठी २०२५ या वर्षासाठी नोबेल विज्ञान पुरस्कार संस्था गटासाठी जळगाव येथील योगी, अमळनेर तालुक्यातील मिलके चलो असोसिएशनची निवड झाली आहे. डॉ. सी. व्ही. रमण विज्ञान शिक्षक पुरस्कारासाठी विवेकानंद प्रतिष्ठानचे विज्ञान शिक्षक उमेश इंगळे, वाळवा तालुक्यातील बोरगाव हायस्कूलचे शिक्षक दीपक चौधरी यांची निवड झाली.

उपक्रम प्रकल्प, तसेच विज्ञानातील यशाबद्दल हिंगणघाट येथील अथर्व जनईकर यांची राज्यस्तरीय डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम बालवैज्ञानिक पुरस्कार, तर माजी राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या नावाने दिल्या जाणाऱ्या नोबेल विज्ञान प्रतिभा पुरस्कारासाठी नंदुरबार येथील 'समुत्कर्ष'चे संचालक ललित महाजन यांची निवड झाली.

**यांनी केली पुरस्कारार्थींची निवड**

या पुरस्कारार्थींची निवड पुरस्कार समिती अध्यक्ष माजी कुलगुरू डॉ. प्रमोद माहुलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. लवकरच या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार असल्याचे नोबेल फाउंडेशनचे संचालक जयदीप पाटील यांनी सांगितले.



## मानमोडेत विशेष कापूस प्रकल्पांतर्गत शेतदिन कार्यक्रम

### डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषी विज्ञान केंद्रातर्फे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**नंदुरबार, १९ ऑक्टोबर**

येथील डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषी विज्ञान केंद्रातर्फे भारतीय कृषी अनुसंधान परिषद, केंद्रीय कापूस संशोधन संस्था (नागपूर) यांच्या माध्यमातून जिल्ह्यात घन लागवड - दादा लाड कापूस तंत्रज्ञान प्रकल्प राबविण्यात येत आहे. शहादा तालुक्यातील मानमोडे, भुलाने, शोभानगर या गावांत दादा लाड तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिके घेण्यात आली. कापूस तंत्रज्ञानाची माहिती इतर शेतकऱ्यांना व्हावी यासाठी मानमोडे (ता. शहादा) येथे शेतदिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. सरपंच देविदास पावरा अध्यक्षस्थानी होते. शहादा येथील उपविभागीय कृषी अधिकारी के. एस. वसावे, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ पद्माकर कुंदे, मंडळ कृषी अधिकारी एम. आर. खैरनार, उपकृषी अधिकारी एकनाथ सावळे, सहाय्यक कृषी अधिकारी अर्जुन पावरा, माजी सरपंच उत्तम भिला वसावे आदी प्रमुख पाहुणे होते.

कार्यक्रमात कृषी विज्ञान केंद्रातील कापूस प्रकल्पाचे दुर्गाप्रसाद पाटील यांनी प्रास्ताविकात, जिल्ह्यात सुरू असलेल्या प्रयोगाची माहिती दिली. शेतदिन कार्यक्रमात पद्माकर कुंदे यांनी दादा लाड कापूस तंत्रज्ञानात कापूस लागवड, गळ फांदी काढणे, शेंडा खुडणी करणे तसेच कापूस पिकातील गुलाबी बोंडअळीसाठी एकात्मिक कीड नियंत्रण आणि रब्बी पिकातील ज्वारी, मका, हरभरा, गहू पिकांसाठी तंत्रशुद्ध पेरणी, बीजप्रक्रिया, जैविक व रासायनिक फवारणी याविषयी माहिती दिली.

के. एस. वसावे यांनी ग्रामीण भागातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी नगदी पिकाकडे वळावे तसेच कापूस पिकातील जैविक औषधी व सापळे यांचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन केले.

कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना, पॅक हाउस योजना आणि अवजार बँक यांची निवडप्रक्रिया, कागदपत्रे पडताळणी, पोर्टलवर अपलोड करताना घ्यावयाची काळजी तसेच एआय महाविस्तार ॲपअंतर्गत चॅट बॉट, हवामान अंदाज, बाजारभाव, सरकारी योजना यांची माहिती मिळते, शेतकऱ्यांसाठी ही डिजिटल क्रांती असल्याची माहिती मंडळ कृषी अधिकारी एम. आर. खैरनार यांनी दिली.

कृषी विज्ञान केंद्रातील कापूस प्रकल्पाचे संदीप कुवर यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. कार्यक्रमासाठी नवजीवन शेतकरी गट व राजेश पावरा, मंगल पावरा, विनोद भामरे, सीमा पावरा, ज्योती सोनवणे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमास भुलाने, मानमोडे गावातील शेतकरी उपस्थित होते.

**प्रक्षेत्र भेटींतर्गत प्रात्यक्षिक क्षेत्राची पाहणी**

विशेष कापूस प्रकल्पांतर्गत कार्यक्रमानंतर चंद्रसिंग भगा सोनवणे यांच्या घन लागवड - दादा लाड कापूस तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक केलेल्या क्षेत्राची पाहणी करून पद्माकर कुंदे यांनी झाडाची गळ फांदी काढणे, शेंडा खुडणी माहिती समजावून सांगितली. याप्रसंगी शेतकरी चंद्रसिंग भगा सोनवणे यांनी तंत्रज्ञान केलेल्या प्रयोगाचे अनुभव कथन केले व याद्वारे झालेला बदल उपस्थिताना लक्षात आणून दिला.

## ऑनलाइन फसवणूक रोखण्यासाठी सायबर जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, १९ ऑक्टोबर**

ऑनलाइन फसवणूक, अज्ञात क्रमांकावरून येणारे कॉल रोखण्यासाठी सायबर जनजागृती मोहीम सुरू आहे. याचाच भाग म्हणून जिल्ह्यातील पोलिसांनी ऑक्टोबरपासून नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी विशेष मोहीम सुरू केली आहे. पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांनी सांगितले की, याअंतर्गत शाळा, महाविद्यालये आणि विविध वसाहतींमध्ये कार्यशाळा आयोजित केल्या जाणार आहेत.

सायबर फसवणुकीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. नागरिकांना संशयास्पद लिंक, ॲप डाउनलोड आणि बँकसंबंधित माहिती विचारणाऱ्या संदेशांपासून सावध राहणे आवश्यक आहे. गुन्हेगार विविध प्रकारे जाळ्यात त्यामुळे लोकांना ओढतात. जनतेत सतर्कता आणि स्व-संरक्षणाची सवय होणे गरजेचे आहे. जिल्ह्यात आतापर्यंत एक कोटी ४३ लाखांचा सायबर फ्रॉड झाल्याचे पोलिसांनी नोंदवले असून, त्यापैकी ३४ लाख ३७ हजार रुपये पोलिसांनी रिकव्हर करण्यात यश मिळवले आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस. यांनी दिली.

फसवणूक करणारे लोक मुख्यतः सोशल मीडिया, फोन कॉल, ई-मेल, फेक वेबसाइट्स आणि मोबाइल ॲपच्या माध्यमातून लोकांना लक्ष्य करतात. ई-केवायसी अपडेट, बँक खाते बंद होईल, लॉटरी लागली आहे किंवा रिवॉर्ड पॉइंट मिळवा, अशा संदेशांद्वारे नागरिकांची आर्थिक माहिती मिळवली जाते. अनेक वेळा ते प्रसिद्ध कंपन्यांचे किंवा बँक प्रतिनिधी असल्याचे भासवतात. फसवणूक टाळण्यासाठी नागरिकांनी अज्ञात लिंक किंवा मेसेजवर क्लिक करू नये, बँक खाते, ओटीपी, डेबिट, क्रेडिट कार्ड क्रमांक कोणालाही देऊ नये, केवळ मान्यताप्राप्त व अधिकृत ॲप्सचा वापर करावा, सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती शेअर करण्याचे टाळावे, फसवणूक झाल्यास त्वरित सायबर क्राइम हेल्पलाइन १९३० या क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक श्रवण दत्त. एस यांनी केले.

## नंदुरबारमध्ये गाय-वासरू शिल्पाचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, १९ ऑक्टोबर**

दिवाळीच्या पहिल्याच दिवशी वसुबारसचे औचित्य साधून शहरातील महाराणा प्रताप पुतळ्याजवळ बसवण्यात आलेल्या गाय-वासराच्या शिल्पाचे लोकार्पण करण्यात आले.



शिवसेनेचे संपर्कप्रमुख आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या संकल्पनेतून आमदार चंद्रकांत रघुवंशी मित्रमंडळातर्फे शहरातील महाराणा प्रताप पुतळ्याजवळ गाय-वासरूचे शिल्प बसवण्यात आले आहे. हिंदू धर्मसंस्कृतीत गाईला मातेचे रूप मानले गेले असल्याने तिला गोमातेचा दर्जा देण्यात आला आहे. दीपोत्सवाच्या पहिल्याच दिवशी वसुबारसचे औचित्य साधून आमदार रघुवंशी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

या वेळी माजी नगराध्यक्षा रत्ना रघुवंशी, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख माजी उपनगराध्यक्ष कुणाल वसावे, माजी सभापती मनीषा वळवी, माजी नगरसेविका सोनिया राजपूत, माजी सभापती कैलास पाटील, माजी नगरसेवक राजेश परदेशी, परवेज खान, विलास रघुवंशी, रोशन कुरेशी, रियाज कुरेशी, फारुक मिस्तरी, फारुख मेमन, अमित रघुवंशी, ईश्वर चौधरी, गजेंद्र शिंपी, प्रेम सोनार, जगन माळी, महानगरप्रमुख विजय माळी, पत्रकार संघाचे अध्यक्ष हिरालाल चौधरी, मोहितसिंग राजपूत, सुरेश घाटे, प्रमोद शेवाळे, बाजार समितीचे संचालक प्रकाश माळी, निंबा माळी, मोहिनीराज राजपूत यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच गोरक्षक उपस्थित होते.

## विभागस्तरीय सायकलिंग स्पर्धेसाठी नरेश भिल, कृष्णा वळवीची निवड

### लहान शहादा येथील नेहरू विद्यालयाचे खेळाडू

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, १९ ऑक्टोबर**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय (पुणे), जिल्हा क्रीडा परिषद (नंदुरबार) आणि सायकलिंग असोसिएशन यांच्यातर्फे येथील जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित जिल्हास्तरीय सायकलिंग स्पर्धेत लहान शहादा येथील जवाहरलाल नेहरू विद्यालयातील नरेश चिंतामण भिल (१४ वर्षे वयोगट) आणि कृष्णा कांतिलाल वळवी (१७ वर्षे वयोगट) यांनी मास स्टार्ट प्रकारात उत्कृष्ट प्रदर्शन करून जिल्हास्तरावर प्रथम स्थान पटकावले. दोघांची निवड आता विभागीय स्तरावरील सायकलिंग स्पर्धेसाठी झाली आहे.

संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र सुदाम पाटील, उपाध्यक्ष पार्थ राजेंद्र पाटील, मुख्याध्यापक सुनील डायाभाई पटेल, शिक्षक माधव पाटील, योगेश्वर पाटील, सारिका पाटील, रोशनी पाटील, कुणाल पाटील, भूषण सोनवणे, कल्पेश देवरे, दीपक पाटील, उमेश पाटील, पियुष पाटील, सुशील पाटील यांनी नरेश भिल आणि कृष्णा वळवी यांचा सत्कार केला.



क्रीडाशिक्षक संदीप भटू पाटील आणि पंकज प्रताप दाभाडे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे क्रीडा क्षेत्रातून कौतुक होत आहे.

## शाळेतून मिळाला दिवाळीचा फराळ, उटणे, मेहंदी, रांगोळी, टिकल्यांसह पर्यावरणपूरक फटाके!

### जि. प. च्या थेवापाणी पाड्यावरील शिक्षिकेचा उपक्रम; गरीब विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित

**नंदुरबार** : दिवाळी म्हटली की आनंद, उत्साह, फराळ, नवे कपडे, अभ्यंगस्नान, रंगीबेरंगी रांगोळ्या आणि नातेवाईकांचा सहवास. मात्र डोंगरदऱ्यात, अतिदुर्गम भागात राहणाऱ्या मुलांसाठी ही दिवाळी कधी स्वप्नवतच राहते. तळोदा तालुक्यातील अशाच एका दुर्गम ठिकाणी, थेवापाणी पाड्यावरील जिल्हा परिषद शाळेतील गरीब विद्यार्थ्यांसाठी, यंदाची दिवाळी विशेष आनंददायी आणि संस्मरणीय ठरली, ती फक्त एका शिक्षकाच्या जिद्दीमुळे आणि संवेदनशीलतेमुळे. शाळेवर नुकत्याच रुजू झालेल्या स्नेहल सर्जेराव गुगळे या शिक्षिकेच्या पुढाकाराने, या विद्यार्थ्यांना ना केवळ फराळ मिळाला, तर त्यांच्यासाठी दिवाळीचा संपूर्ण आनंद घेता यावा, याची काळजी घेतली गेली. प्रत्येक विद्यार्थ्याला वाटण्यात आलेल्या पॅकेटमध्ये होते. बुंदीचे लाडू, अर्धा किलो चिवडा, सुगंधी उटणे, चंदन साबण, सुगंधी तेल आणि मुलींसाठी मेंदी कोन, नेलपेंट, रांगोळी रंग, तसेच मुलांना टिकल्या फोडण्यासाठी




बंदूक, टिकल्या पाकीट व पर्यावरणपूरक फटाके.

थेवापाणी पाड्यावर पोहोचण्यासाठी सहा किलोमीटरचा खडतर डोंगरी पायी प्रवास करावा लागतो. नेटवर्कचा अभाव, वाहतुकीची सुविधा नाही, अशा परिस्थितीत स्वतः स्वखर्चाने साहित्य खरेदी करून, पाठीवर व डोक्यावरून सामान वाहत, सलग पाच दिवस नियोजनपूर्वक हे साहित्य शाळेत पोहोचवण्याचे श्रमदायक कार्य स्नेहल गुगळे आणि मुख्याध्यापक चंद्रकांत सपकाळे यांनी पूर्ण केले. हा प्रवास थकवणारा होता, पण विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंदाने तो थकवा क्षणात दूर झाला. गुगळे म्हणतात, 'या विद्यार्थ्यांसाठी काहीतरी विशेष करावं, ही भावना माझ्या मनात महिनाभर घोळत होती. आर्थिक खर्च मोठा वाटत नव्हता, पण या सर्व वस्तू या दुर्गम पाड्यावर प्रत्यक्ष नेणे ही खरी कसरत होती. तरीही ती मी मनापासून केली.'

गुगळे यांनी केवळ फराळच दिला नाही, तर दिवाळीला अभ्यंगस्नानाची जी तयारी घरी केली जाते, तीच तयारी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी केली. या उपक्रमात त्यांच्या लहान भावंडांचाही समावेश करण्यात आला, ही बाब उल्लेखनीय ठरली. या पाड्याच्या शाळेच्या इतिहासात प्रथमच एक महिला शिक्षक म्हणून गुगळे यांनी हजेरी लावली आहे. त्यांच्या कल्पकतेने, संवेदनशीलतेने साकार झालेला हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या जीवनात आनंदाचे रंग भरणारा ठरला. याबद्दल मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी मानसिंग ठाकरे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

मुख्याध्यापक चंद्रकांत सपकाळे यांनी सांगितले की, 'दिवाळी त्यांच्या आयुष्यातील अमूल्य आठवण ठरणार असून, त्यातून त्यांचे जीवन अधिक सुंदर व्हावे अशी सदिच्छा आहे.' शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शांताराम वळवी यांनी पालकांच्या भावना मांडताना सांगितले, 'पाड्यावर असे शिक्षक असल्यामुळे मुलांनाही दिवाळीचा खरा आनंद मिळाला.' केंद्रप्रमुख रंजना निकुंभे यांनी, 'महिलांचे धाडस कुठेही कमी नाही,' असे म्हणत गुगळे यांना प्रेरणा दिली.

**सर्व भक्तांना नम्र आवाहन**

**जनहितार्थ प्रकाशित**

*** मंदिरात दर्शनाला जाताना आपले दुचाकी/चारचाकी वाहन गेटसमोर लावू नका. बाजूला नीट लावा.**

*** मंदिरासमोरून जाताना दुचाकी/चार चाकीवरून एका हाताने देवाला नमस्कार करून पुनः स्टाईलीश ओठ/छातीला लावू नका. अपघात होतो आणि आपला देव नाहक बदनाम होतो.**

**-एक भक्त**

वा. व. नं. २५२

## थोडक्यात महत्त्वाचे...



### छत्रपती शिवाजी वाचनालयातर्फे शेंदुर्णीत वाचन प्रेरणा दिवस साजरा

**शेंदुर्णी (ता. जामनेर)** : माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त शासनाने वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्याचे जाहीर केले असल्याने त्या अनुषंगाने शेंदुर्णीत छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक वाचनालयातर्फे गुरुकुल विद्यालयात वाचन प्रेरणा दिवस साजरा केला. अध्यक्षस्थानी शेंदुर्णी शिक्षण संस्थेचे माजी सचिव सतीश काशीद होते. प्रमुख अतिथी म्हणून शेंदुर्णी शिक्षण संस्थेच्या संचालिका उज्ज्वला काशीद, सहकार महर्षी उत्तमराव थोरात, पारस पतसंस्थेचे संचालक प्रकाश झंवर, वामनराव फासे, सेवानिवृत्त पोस्टमास्टर अशोक भारुडे, सामाजिक कार्यकर्ते भगवान सोनार, डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अजय सुर्वे, गुरुकुल विद्यालयाचे अध्यक्ष डॉ. विजयानंद कुळकर्णी, प्राचार्य डॉ. भक्ती कुळकर्णी, वाचनालयाचे अध्यक्ष अतुल जहागीरदार, संचालक वीरेंद्र पाटील, धीरज जैन, श्रीकांत काबरा, संजय कावडिया, रवींद्र सूर्यवंशी, जिल्हा परिषद मुलांच्या शाळेचे मुख्याध्यापक संजय बारी, उर्दू शाळेचे मुख्याध्यापक शरीफ आदी उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांचा वाचनालयातर्फे सत्कार करण्यात आला. मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन पाटील यांनी केले. आभार प्रदर्शन उपशिक्षिका अर्चना थोरात यांनी केले.

### निर्मल स्कूलची इशिता निळे हिची उंच झेप घेत विभागीय स्पर्धेकडे वाटचाल

**पाचोरा** : क्रीडा व युवक सेवा संचालनालय तसेच जिल्हा क्रीडा परिषद आणि



जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या सहकार्याने आयोजित जिल्हास्तर शालेय उंच उडी स्पर्धा पाचोरा येथे घेण्यात आल्या. त्यात निर्मल इंटरनॅशनल स्कूलची विद्यार्थिनी इशिता रवींद्र निळे हिने १४ वर्षे वयोगटात आपल्या उत्कृष्ट कौशल्य व आत्मविश्वासाच्या जोरावर चमकदार कामगिरी सादर केली आहे. आपल्या झेपेच्या बळावर इशिताने स्पर्धेतील प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड मिळवली आहे. या यशाबद्दल संस्थाध्यक्षा वैशाली सूर्यवंशी, सचिव नरेंद्रसिंग सूर्यवंशी, प्राचार्य गणेश राजपूत, जनसंपर्क अधिकारी आय. बी. सिंग, उपप्राचार्य प्रदीप सोनवणे, समन्वयक स्नेहल पाटील व प्रशासकीय अधिकारी संतोष पाटील यांनी इशिताचे अभिनंदन करून विभागीय स्पर्धे तही उत्तुंग यशासाठी शुभेच्छा दिल्या. या यशामागे क्रीडा शिक्षक गणेश मोरे, नंदू पाटील, प्रवीण मोरे आणि सोमनाथ माळी यांचे प्रयत्न, तांत्रिक मार्गदर्शन व सातत्यपूर्ण प्रेरणेचा मोलाचा वाटा आहे.



### पाचोऱ्यात अ. भा. मराठा महासंघाची बैठक विविध विषयांवर झाली चर्चा

**पाचोरा** : अखिल भारतीय मराठा महासंघाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष चंद्रकांत बनकर यांच्या अध्यक्षतेखाली संघटनेची पाचोरा, भडगाव तालुका पदाधिकारी यांची पाचोरा येथे रविवारी बैठक झाली. या बैठकीस जळगाव जिल्हा संपर्कप्रमुख हरिभाऊ तुकाराम पाटील, जिल्हा उपाध्यक्ष यशोदीप पाटील भडगाव शहराध्यक्ष जगदीश शिंदे, चेतन शिंदे, आप्पा हटकर उपस्थित होते. बैठकीत आण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळात बेरोजगार तरुणांना कर्ज उपलब्ध होण्यासाठी निर्माण होणाऱ्या समस्यांवर तसेच सारथी योजने बाबत सविस्तर चर्चा विनिमय करण्यात आली येणाऱ्या काळात आण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ जळगाव या विभागाच्या अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन समस्यांचे निवारण करण्याचे आदेश चंद्रकांत बनकर यांनी दिले.



### छत्रपती संभाजी राजेंचा पुतळा उभारणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**जळगाव** : छत्रपती संभाजी राजे यांचा पुतळा मेहरुण परिसरातील स्वामी समर्थ चौकात लोकसहभागातून उभारण्याचा संकल्प केला असून त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांची भेट घेत नागरिकांच्या स्वाक्षरीचे निवेदन सादर करण्यात आले. निवेदन देताना दीपक मांडोळे, ज्ञानेश्वर पाटील, संजय सपकाळे, संजय जगताप, चेतन शिंपी, सचिन वाघ, गणेश पाटील, अरुण मालपाणी, यशवंत सपकाळे, दीपक बाविस्कर, सागर पाटील, विशाल गुजर, संदीप मांडोळे, माजी नगरसेवक वासुदेव सोनवणे, गणेश सोनवणे, आशुतोष पाटील, उमेश सोनवणे, राजेंद्र घुगे यांच्यासह नागरिक जिल्हाधिकारी कार्यालयात मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### १२०० किलोमीटर सायकलने प्रवास करणार नशिराबाद येथील विकास नाथ

**नशिराबाद (ता. जळगाव)** : नशिराबाद येथील पेठ भागातील रहिवासी विकास शालिक नाथ रविवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी नशिराबाद येथून सायकलने प्रवासाला निघाले. ते १२०० किलोमीटर प्रवास करतील. राजस्थानमधील खाटूश्याम बाबा येथे ते जातील. हे त्यांचे दुसरे वर्षे आहे. यानिमित्त त्यांना शुभेच्छा देण्यासाठी माजी सरपंच पंकज महाजन, उमेश महाजन, विनोद धर्माधिकारी, केवल नाथ, नामदेव महाजन, सुनील महाजन, बापू माळी, भैया बहारे, नीलेश नाथ आदी उपस्थित होते.

# नशिराबाद नगरपरिषद निवडणूक, मतदार याद्यांवर हरकतींचा पाऊस

**तभा वृत्तसेवा**
**नशिराबाद (ता. जळगाव), १९ ऑक्टोबर**

नशिराबादेत नगरपरिषद निवडणुकांचे बिगुल वाजले. नगरपरिषद प्रभागांचे आरक्षण जाहीर झाले आहे. यासह मतदार याद्यादेखील प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहे. अशातच नशिराबाद नगरपरिषदेचे निवडणुकांसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या मतदार याद्यांवर तब्बल २६९४ हरकती दाखल करण्यात आल्या आहेत. मोठ्या प्रमाणावर हरकती दाखल झाल्यामुळे कर्मचाऱ्यांना कसरत करावी लागत आहे.



नशिराबाद नगरपरिषदेच्या प्रभाग आरक्षणाची सोडत ८ ऑक्टोबर रोजी काढण्यात आली होती. त्याचबरोबर मतदार याद्या प्रसिद्ध झाल्या आणि त्यावर मतदारांनी हरकती घ्याव्यात, यासाठी मुदत देण्यात आली होती. दरम्यान पहिल्या काही दिवसातच तब्बल १६०० हरकती दाखल झाल्या होत्या.

हरकती घेण्यासाठी १३ ऑक्टोबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र नागरिकांच्या सोयीसाठी ही मुदत १७ ऑक्टोबरपर्यंत वाढवण्यात आली होती. शेवटच्या दिवशी नगरपरिषद हरकतींचा पाऊस पडला. शेवटच्या दिवशी २६९४ मतदारांनी हरकती नोंदवल्या आहेत. त्यात प्रभाग क्रमांक १ ते १० या प्रभागातील मतदारांनी मतदार याद्यांवर हरकती घेतलेल्या आहेत.

नगरपरिषद मतदार यादीवर आलेल्या २६९४ हरकतींची नोंदणी छाननी प्रत्यक्ष प्रभागात जागेवर जाऊन तपासणी व पंचनामे ही सर्व कार्यालयीन कामे नगरपरिषद कर्मचारी करीत असून चुकीचे आलेल्या अर्जांची पडताळणी करताना कर्मचाऱ्यांची दमछाक होणार असून अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या अधि प्रमाणित करून ३१ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध होणार आहेत. तसेच मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या ७ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे, असे नशिराबाद नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रवींद्र सोनवणे यांनी सांगितले.

## किसान संघातर्फे वसुबारस उत्सव

**केकत निंभोरे, (ता. जामनेर)** : जळगाव जिल्हा भारतीय किसान संघातर्फे जिल्ह्यात एकूण १६ ठिकाणी वसुबारस उत्सव उत्साहात आणि भक्तिभावाने



साजरा करण्यात आला. पाचोरा तालुक्यातील पिंपळगाव (हरेश्वर), कळमसरा, कोल्हे आणि कुऱ्हाड येथे गोमातेचे पूजन व आरतीचे कार्यक्रम उत्साहात घेण्यात आले. रावेर तालुक्यातील तांदलवाडी, मस्कावद, सावदा येथील गो शाळेत, निंबोल, ऐनपूर या गावांमध्ये सुद्धा वसुबारस उत्सव साजरा झाला. जामनेर तालुक्यातील गारखेडा येथे वसुबारसनिमित्त गोमातेच्या कीर्तनाचा कार्यक्रम झाला. तसेच वाडी येथे ग्राम समितीतर्फे सामूहिक गोपूजन व आरतीचे आयोजन करण्यात आले होते. केकत निंभोरा येथे गोवत्स पूजन करण्यात आले. जामनेर येथील वैदिक गोशाळेत पूजन करण्यात आले होते.

चोपडा तालुक्यात अकुलखेडा आणि चोपडा शहरात तीन चौकांमध्ये वसुबारस साजरी करण्यात आली. धरणगाव तालुक्यात कल्याण होळ येथे पारंपरिक वसुबारस उत्सव साजरा करण्यात आला. यावल शहरातसुद्धा दोन ठिकाणी वसुबारस हा उत्सव संपन्न झाला. या सर्व ठिकाणी ग्रामस्थ, महिलावर्ग व किसान संघाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. वसुबारस उत्सवाच्या माध्यमातून गो संवर्धन, भारतीय संस्कृतीचे जतन आणि ग्राम एकतेचा संदेश दिला गेला.

## पाचोरा तहसील आवारातून जप्त ट्रॅक्टरचे साहित्य गायब



### सीसी टीव्ही कॅमेरे फक्त नावालाच

**तभा वृत्तसेवा**
**पाचोरा, १९ ऑक्टोबर**

येथील तहसील आवारात जप्त केलेल्या ट्रॅक्टरचे साहित्य गायब झाले असून, कॅमेरे फक्त नावालाच असल्याचे चित्र आहे.

येथील महसूल विभागाच्या वतीने अवैध गौणखनिज वाहतूक करताना, गौणखनिज पथकाने जप्त केलेले ट्रॅक्टर येथील तहसील आवारात लावण्यात येतात. या आवारात सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्ही कॅमेरेदेखील इमारतीवर लावण्यात आले आहेत. असे असतानाही आवारात लावण्यात आलेल्या ट्रॅक्टरांचे टायरसह इतर साहित्य गायब असल्याचे चित्र दिसून येत आहे.

गौणखनिज पथकाने जप्त केलेल्या ट्रॅक्टरचे पंचनामे व मुद्देमालाची परीस्थिती व आज रोजी तहसील आवारातील ट्रॅक्टरांची परीस्थिती पाहता मुद्देमाल चोरीस गेल्याचे दिसून येत आहे.

या इमारतीवर लावण्यात आलेले कॅमेरे हे धुळ तर खात नाही ना, असा प्रश्न जनसामान्यांतून उपस्थित होत आहे.

या प्रकाराकडे मात्र पाचोरा तहसीलदारांचे सोयीस्कररीत्या दुर्लक्ष होतानाचे चित्र दिसून येत आहे, असा आरोप करण्यात येत आहे.



## ‘एक पेड माँ के नाम’ उपक्रम पर्यावरण संरक्षणासाठी महत्वाचा -गटशिक्षणाधिकारी पवार

### १० शाळांचा झाला सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**पाचोरा, १९ ऑक्टोबर**

एक पेड मा के नाम या केंद्र शासनाच्या उपक्रमाला पाचोरा तालुक्यात चांगला प्रतिसाद मिळाला असून शालेय विद्यार्थ्यांनी सुमारे १२६८८ रोपांची लागवड अभियान काळात केली. २४० शाळांनी इको क्लबची स्थापना शालेय पातळीवर केली आहे. गटशिक्षणाधिकारी विजय पवार यांनी शाळांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने एक पेड मा के नाम उपक्रमात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या दहा शाळांचा अभिनंदन पत्र व गुलाब पुष्प देऊन सन्मान केला. ‘एक पेड मा के नाम’‘ हा उपक्रम पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. विद्यार्थ्यांमध्ये वृक्षप्रेम,मातृ प्रेम, पर्यावरण संरक्षणाची जबाबदारीची जाणीव या उपक्रमातून होईल, असे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी विजय पवार यांनी याप्रसंगी केले.

या कार्यक्रमाला शालेय पोषण आहार अधीक्षक सरोज गायकवाड, शिक्षण विस्तार अधिकारी समाधान पाटील, केंद्रप्रमुख शांताराम वानखेडे, अभिजित खैरनार, संगणक प्रोग्रामर योगेश अहिरराव, विषयतज्ज्ञ गिरीश भोयर, सुनील शिवदे यांची उपस्थिती होती.

**सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या शाळा व लावलेली रोपे अशी-**

१. पी. के. शिंदे विद्यालय, पाचोरा (१०३५)
२. एस. पी. शिंदे विद्यालय, पाचोरा (७१५)
३. जी. एस. हायस्कूल, पाचोरा (७०३)
४. सु. भा. प्राथमिक विद्यालय, पाचोरा (४५३)
५. न्यू इंग्लिश मीडियम, पाचोरा (३८२)
६. सिंधुताई शिंदे विद्यालय, पाचोरा (३२९)
७. ग्रामविकास विद्यालय पिंपळगाव हरे (३२७)
८. खाजगी प्राथमिक शाळा, नगरदेवळा (२९८)
९. माध्यमिक विद्यालय, शिंदाड (२५९)
१०. जि. प. शाळा वरखेडी (२४७)

## केवळ पाणी अन् हवेवर पाच वर्षांपासून कठोर साधना करणारे अवधूत संत दादागुरू

केवळ नर्मदा मैय्या जल आणि हवेवर पाच वर्षांपासून निराहार जगणारा दादागुरुंचे १४ ऑक्टोबर रोजी नर्मदा पुराण कथेच्या समारोपनिमित्ताने मालपूर गावात आगमन झाले आणि त्यांच्या पावन पदस्पर्शाने मालपूर नगरी पावन झाली.

विज्ञान युगात हा चमत्कार असून, मध्यप्रदेश सरकारने यावर संशोधन पूर्ण केले. दादागुरू हे नर्मदेचे ३०० मि ली. पाणी आणि हवेवर जगत असून, ते एका जागेवर न बसता सतत परिक्रमा करत असतात. नद्यांचे संरक्षण, संवर्धनासाठी त्यांचे हे व्रताचे महाव्रत आजही सुरू आहे.

१७ ऑक्टोबर २०२५ रोजी रेवा पथाचे महायोगी श्री दादागुरु नर्मदेच्या पाण्यावर लक्ष केंद्रित करून अखंड उपवास महाव्रत साधनेला ५ वर्षे पूर्ण केली. निसर्ग, पर्यावरण आणि पवित्र नद्यांचे संवर्धन या पवित्र उद्देशाने १७ ऑक्टोबर २०२० पासून अविरतपणे सुरू असलेली दादागुरूंची महासाधना या शतकातील सर्वात मोठे रहस्य बनून देश आणि जगासमोर उभी आहे. कोणतेही अन्न न घेता, नर्मदा जल आणि केवळ हवेवर, पूर्णपणे सक्रिय आणि निरोगी राहून कोणतीही व्यक्ती ५ वर्षे कशी जगू शकते हे रहस्य आहे, कारण दादगुरूंचे महाव्रत नर्मदेच्या पाण्यावर असले तरी ते ६२०० कि. मी. चालत परिक्रमा करतात. १८ तास ते सक्रिय राहतात, ध्यान करतात एवढेच नाही तर त्यांनी महाव्रत काळात ४ वेळा रक्तदानदेखील केले आहे. हे गूढ उकलण्यासाठी मध्यप्रदेश राज्य सरकारने उच्च वैद्यकीय संस्थांमधील नामवंत डॉक्टरांची एक टीम तयार करून दादागुरूंच्या जीवनशैलीवर संशोधन करण्याचा निर्णय घेतला. पण डॉक्टरांचे संशोधन किती काळ चालले पाहिजे हे ठरवण्यासाठी या प्रकारच्या जीवनशैलीचा कोणताही प्राचीन सिद्धांत किंवा इतिहास नव्हता. शेवटी शरीरविज्ञान आणि संरचनेच्या आधारावर असा निष्कर्ष काढला गेला की जर एखादी व्यक्ती पाणी आणि अन्नाशिवाय ४० ते ४५ डिग्री सेल्सियस तापमानात दररोज ३० ते ३५ किमी चालत असेल, तर ३ ते ५ दिवसात त्याचे अंतर्गत अवयव निर्जलीकरणामुळे कार्य करणे थांबवतात आणि अशा परिस्थितीत



मृत्यू निश्चित आहे. त्यामुळे संशोधनाचा कालावधी सात दिवसांवर निश्चित करण्यात आला.

दादागुरूंना संशोधन अभ्यासासाठी मेडिकल कॉलेज जबलपूर येथे वैद्यकीय देखरेखीखाली ठेवले आणि पॅरामेडिकल कर्मचारी, पोलिस आणि मीडियाची उपस्थिती आणि सतत सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे निरीक्षण, त्याच्या आरोग्यावर आणि दैनंदिन दिनचर्याचे बारकाईने निरीक्षण केले गेले. सात दिवसांत त्याच्या शरीराच्या सर्व अवयवांची आणि शरीरातील जवळपास सर्व घटकांची बारकाईने तपासणी करण्यात आली. काही चाचण्या अगदी दररोज पुनरावृत्ती केल्या गेल्या आणि सर्व चाचण्या सात दिवस सामान्य होत्या. काही बदल अधूनमधून दिसले पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे ते देखील सामान्य झाले कारण दादागुरुंचे शरीर कोणतीही विकृती लवकर सुधारते. एका दिवसाप्रमाणे त्याच्या रक्तातील साखरेची पातळी सर्वात कमी होती परंतु ते सामान्यपणे फिरत होते. शुगर लेव्हल एवढ्या कमी झाल्यामुळे कोणतीही व्यक्ती बेशुद्ध होऊ शकते, त्याचे मानसिक संतुलन देखील बिघडू शकते, परंतु दादागुरुंच्या बाबतीत असे काही घडले नाही आणि काहीही न घेताही त्यांची साखरेची पातळी सामान्य झाली. दादागुरु रोज सकाळी ९ ते साडे सहा या वेळेत परिक्रमा करायचे आणि या काळात शारीरिक चाचण्याही घेतल्या जात. संशोधन कार्य उन्हाळ्याच्या कडक उन्हात (४० ते ४५) पूर्ण झाले. या काळात दादागुरु पूर्णपणे निरोगी राहिले आणि त्यांच्या सर्व चाचण्या सामान्य होत्या, अगदी विज्ञानाला ही यंत्रणा परिभाषित करता आलेली नाही आणि संशोधनादरम्यान पुन्हा पुन्हा आश्चर्यचकित झाली आहे. संशोधनानंतर डॉक्टरांच्या टीमने आपला अहवाल मध्य प्रदेश राज्य सरकारला सादर केला आहे. दादागुरूंच्या महाव्रताने आता पृथ्वी विज्ञान आणि सौर भौतिकशास्त्र इत्यादींवर लक्ष केंद्रित केले आहे कारण वैद्यकीय शास्त्राला स्वतःच्या मर्यादा आहेत. हे जगातील पहिले संशोधन असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

लोककल्याणाच्या पवित्र हेतूने केलेल्या दादागुरूंच्या महाव्रताची नोंद गोल्डन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली आहे. विशेषत: हा विश्वविक्रम १००० दिवसांत नोंदवला गेला, आज महाव्रताला ५ वर्षे झाली.

दादागुरुंनी उपवास करताना नर्मदेच्या पायी ६२०० किमी प्रदक्षिणा केल्याची नोंद गोल्डन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली आहे. विशेष म्हणजे यानंतर दादगुरुंनी वायूवर पायी चालत माँ नर्मदेची प्रदक्षिणाही केली आहे. उपवास करताना दादागुरूंच्या रक्तदान सेवेची नोंद गोल्डन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली आहे.

अमरकंटक लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झालेल्या दादागुरूंच्या मार्गदर्शनाखाली आयोजित ‘वृक्ष रक्षा संकल्प महोत्सव’ शिवशक्ती, निसर्ग आणि राष्ट्राच्या उपासनेचे जिवंत उदाहरण असलेल्या जबलपूरच्या ७ संस्कार कावड यात्रेची दादागुरुंच्या मार्गदर्शनाखाली आणि ‘रन फॉर नेचर’ गोल्डन बुकमधे दादागुरुंची नोंद झाली आहे.

**शब्दांकन- रवींद्र राजपूत, मालपूर**

## शिक्षकांचे वेतन संस्थेच्या उत्पन्नातून अदा करा

### शैक्षणिक संस्थेस शिक्षण उपसंचालकांचे आदेश

**जळगाव, १९ ऑक्टोबर**

नऊ कर्मचाऱ्यांचे वेतन अडवून धरल्याने या प्रकरणी पुढील सुनावणीचे निर्णय होईपर्यंत सर्व शिक्षकांचे वेतन संस्थेच्या उत्पन्नातून अदा करावे, तसेच वेतन अदा होईपर्यंत सध्या कार्यरत मुख्याध्यापकांचे वेतन अदा होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आदेश नाशिक विभागाचे शिक्षण उपसंचालक संजयकुमार राठोड यांनी अमळनेर येथील शिवाजी हायस्कूल अध्यक्ष तसेच सचिव यांना दिले.

शिक्षण उपसंचालकांनी सचिव यांना दिलेल्या पत्रात म्हटले की, शिवाजी संस्थेतील शीतल देसले, वीरेंद्र सिसोदिया, शैलेश विसपुते, संगीता पाटील, अलका देवरे, वनिता जवागे, विशाल पाटील, ललिता पाटील, संजय पाटील या शिक्षकांचे वेतन अदा झाले नव्हते. यामुळे या शिक्षक कर्मचाऱ्यांनी तक्रार निवारण समितीमध्ये अर्ज दाखल केला आहे.

याप्रकरणी मंगळवारी (७ आक्टोबर) शिक्षण उपसंचालक कार्यालयात सुनावणी होती. या अर्जानुसार या कर्मचाऱ्यांचे वेतन अडविण्याचे कारण बाबत शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे माहिती उपलब्ध नाही. हा अर्ज निकाली काढण्यासाठी या कार्यालयात तक्रारदार कर्मचारी वेळोवेळी सुनावणीकामी उपस्थित राहिले. मात्र मुख्याध्यापक आणि संस्थेच्यावतीने कोणीही उपस्थित राहिलेले नाही, याबद्दल उपसंचालक यांनी कानउघाडणी केली. पुढील सुनावणीचे निर्णय होईपर्यंत सर्व शिक्षकांचे वेतन संस्थेच्या उत्पनातून अदा करण्यात यावे. कर्मचाऱ्यांचे वेतन अदा होईपर्यंत सध्या कार्यरत मुख्याध्यापकांचे वेतन अदा होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही शिक्षण उपसंचालक यांनी पत्रात आदेशीत केले. या शिक्षकांतर्फे ॲड. मोहन बी. पाटील हे कामकाज पाहत आहेत.

**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**
महात्मा गांधी रोड, नेहरुचौक, जळगांव - ४२५०००१
फोन - (०२५७) २२२२२६१, ६२, ६३,६४,६५ फॅक्स २२२२२६

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgoan 425001
Phone : 2222261,62,63,64,65 Fax: 222226

**संदर्भ क्र. ज.श.म.न.पा./ /२०२५-२६** **दिनांक / /२०२५**

**जाहीर आवाहन**

जळगांव शहरातील तमाम नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येते की, दिवाळी उत्सवाच्या काळात शहरातील प्रदूषणावर नियंत्रण राखण्यासाठी दि. २१,२२,२३ ऑक्टोबर २०२५ या दिवसात शहरातील सर्व प्रकारची बांधकामे बंद ठेवण्यात यावीत. शासन निर्देश व मे. न्यायालयाच्या निर्देशाचे पालन करून प्रदूषणावर नियंत्रण राखणे कामी नागरिकांनी सहकार्य करावे, असे जाहीर आवाहन करण्यात येत आहे

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**

## थोडक्यात महत्त्वाचे...



### पारोळा व्यापारी महासंघातर्फे औद्योगिक वसाहतीची मागणी

**पारोळा :** शहरात औद्योगिक वसाहत व्हावी अशा मागणीचे निवेदन आमदार अमोल पाटील यांना पारोळा व्यापारी महासंघाच्यावतीने देण्यात आले. पारोळा तालुक्यात असा एकही उद्योगधंदा नाही जो तरूणांना रोजगार देऊ शकेल म्हणून पारोळा शहरातील युवक हे रोजगारासाठी मोठमोठ्या शहरात स्थलांतरित होत आहेत. जर का शहरात औद्योगिक वसाहत झाली तर काही प्रमाणात येथे ही रोजगार उपलब्ध होऊ शकेल, म्हणून शहरात औद्योगिक वसाहत एमआयडीसी ची गरज आहे. काही महिन्यांपूर्वीच आपल्या प्रयत्नांनी एरंडोल येथे औद्योगिक वसाहतीसाठी सर्वेक्षण करण्यात आले असल्याची माहिती मिळाली आहे. त्याच धरतीवर पारोळा येथेदेखील सर्वेक्षण करून येथेही औद्योगिक वसाहत निर्माण व्हावी, अशी मागणी पारोळा व्यापारी महासंघाच्यावतीने करण्यात आली आहे. याप्रसंगी पारोळा व्यापारी महासंघाचे सदस्य शहरातील व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चाळीसगावात बाहेरच्या तालुक्यातील मतदारांची नावे असल्याचा आरोप

**चाळीसगाव :** महाराष्ट्र राज्यात नुकत्याच होऊ घातलेल्या निवडणुकीसंदर्भात विरोधी पक्ष नेत्यांकडून मोठ्या प्रमाणावर मतदान याद्यांमध्ये घोळ असल्याचा गंभीर आरोप होत आहे. हा घोळ निस्तरल्यानंतरच स्थानिक संस्थांच्या निवडणुका घेण्याची मागणी होत असताना चाळीसगाव शहरातदेखील मतदार याद्यांमध्ये प्रचंड घोळ झाला आहे. बाहेरच्या तालुक्यातील काही गावातील मतदारांची नावे शहरातील प्रभागामध्ये समाविष्ट करण्यात आली असल्याचा गंभीर आरोप माजी नगरसेवक घृष्णेश्वर पाटील यांनी पत्रकार परिषदेत केला. चाळीसगाव शहरातील प्रभाग क्रमांक १ मधील यादीत मालेगाव तालुक्यातील काही गावातील लोकांची नावे समाविष्ट केली असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला. एकाच प्रभागात किती नावे असतील, असे सांगत काही मतदारांकडे दोन-दोन ओळखपत्र असल्याचे ते म्हणाले. चाळीसगाव तालुका हे उत्तर महाराष्ट्र मध्ये सर्वधिक हरकतीचे गाव ठरले आहे. ज्यांनी ज्यांनी हरकती घेतल्या त्यांनी हरकतीची शहा निशा करावी, पण राजकीय दबावामुळे तसे होणार नाही, असा आरोपही त्यांनी यावेळी केला. यामुळे सामान्य माणूस नगरसेवक होऊ शकत नाही, असे वक्तव्य त्यांनी पत्रकार परिषदेत केले.

### अखिल भारतीय ग्राहक पंचायत धरणगाव तालुकाध्यक्षपदी विनायक महाजन

**धरणगाव :** अखिल भारतीय ग्राहक पंचायत मध्य महाराष्ट्र प्रांताच्या



प्रांताध्यक्ष बाळासाहेब औटी यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रांत सचिव व जिल्हाध्यक्ष डॉ. अनिल देशमुख यांच्या आयोजनात जळगाव व नंदुरबार जिल्ह्याची संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत धरणगाव तालुकाध्यक्षपदी विनायक महाजन यांची एकमताने फेरनियुक्ती झाली. बैठकीस प्रांत उपाध्यक्षा व नंदुरबार जिल्हाध्यक्ष वंदना तोरवणे, जिल्हा पालक विलास लेले, प्रांत कोषाध्यक्ष विलास जगदाळे, कार्यकारिणी सदस्या ॲड. भारती अग्रवाल, संघटक ॲड. सुभाष तायडे, जगन्नाथ तळेले, मकसूद बोहरी, कपिला मुठे, नंदुरबार जिल्ह्याचे प्रा. डी. सी. पाटील, रणजीतसिंग राजपूत पाटील आदींसह पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते. याप्रसंगी प्रांताध्यक्ष बाळासाहेब औटी यांनी जिल्ह्याच्या प्रस्तावित कार्यकारिणीस मान्यता देत जळगाव जिल्हाध्यक्षपदी ॲड. सुभाष तायडे, उपाध्यक्षपदी सतीश देशमुख व दिनेश तायडे, तर सचिवपदी रमेश सोनवणे यांची नियुक्ती जाहीर केली. अन्य नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचेही स्वागत करण्यात आले. श्री क्षेत्र ओझर येथे येत्या २५ व २६ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या अभ्यासवर्गास उपस्थित राहण्याचेही आवाहन त्यांनी केले.



### पूरग्रस्तांसाठी पुष्पा काळे यांच्याकडून मदत

**सोयगाव :** मागील महिन्यात झालेल्या ढगफुटीमुळे घोसला गावातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी खरडून गेल्या व तोंडाशी आलेला घासही निसर्गाच्या पाण्याने हिरावून घेतला. या संकटात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी दिपावलीपूर्वी 'आनंदाचा शिधा' अशा स्वरूपात भाजप नेत्या माजी जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांच्यातर्फे मदतीचा हात दिला गेला. या उपक्रमात भाजप छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे चिटणीस सुनील गावंडे, तालुकाध्यक्ष संजय पाटील, तालुका उपाध्यक्ष विशाल गिरी, महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्षा नंदा आगे, जिल्हा कार्यकारिणी सदस्य वंदना पाटील, तालुका खरेदी विकी संघ संचालक मयूर मनगटे, सुनील पाटील (घोसला), माजी उपसभापती चंद्रकांत पाटील, प्रमोद पाटील तसेच किशोर बावस्कर, समाधान बावस्कर, प्रशांत गावंडे, प्रमोद पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. पूरग्रस्त शेतकरी व गावकऱ्यांना जीवनावश्यक वस्तुंचे वाटप करून आनंदाचा क्षण त्यांच्या आयुष्यात आणला. या मानवतेच्या उपक्रमामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा एकदा आशेचा किरण दिसून आला.



### बाबूरावजी काळे यांना अभिवादन

**सोयगाव :** बाबूरावजी काळे यांच्या ४० व्या स्मृती दिनी छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय क्रीडा संकुल स्टेडीयमला लोकनेते बाबूरावजी काळे यांचे नाव द्यावे अशी मागणी महाराष्ट्र सरकारकडे केली असल्याचे प्रतीपादन करतांना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व माजी सदस्य विलासचंद्र काबरा यांनी केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षपदी ज्येष्ठ इंग्रजी लेखक शेषराव चव्हाण हे होते, तर प्रमुख वक्ते व पाहुणे दादा गोरे, अजिंठा शिक्षण संस्थाचे सचिव प्रकाश काळे, प्राचार्य संजय मुन, रोहित काळे, शिवदीप काळे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

### बांभोरीतील संत गजानन महाराज मंदिरातर्फे २९ ऑक्टोबर रोजी शेगाव पायीवारी

**जळगाव :** शहरापासूनच जवळच असलेल्या श्री क्षेत्र बांभोरी (ता.



धरणगाव) येथील श्री संत गजानन महाराज मंदिरातर्फे शेगाव पायी वारी २९ ऑक्टोबर रोजी काढण्यात येणार आहे. मजल-दरमजल प्रवास करीत ही वारी ३ नोव्हेंबर रोजी शेगावला पोहोचेल. ही वारी पर्यावरण मुक्त अशी असणार आहे. आध्यात्मिक तसेच सत्संगासोबत पायी वारीचा लाभ घ्यावा. ज्या भाविकांना सहभागी व्हायचे असेल त्यांनी नारायण पाटील, के. एस. पाटील, शांताराम राठोड यांच्याशी संपर्क साधावा, असे मंदिराचे संस्थापक अध्यक्ष हभप अण्णा महाराज पाटील यांनी आवाहन केले आहे.



# आई-वडिलांना विसरू नका, तुमच्यामुळे त्यांचं नाव उजळेल - पालकमंत्री पाटील

**तभा वृत्तसेवा**
**पाळधी/जळगाव, १९ ऑक्टोबर**

'आई-वडिलांना कधीच विसरू नका. मुला-मुलींनी असं नाव कमवा की तुमच्यामुळे आई-वडील ओळखले गेले पाहिजेत. ज्या क्षेत्रात तुम्ही शिक्षण घेत असाल त्यात झोकून द्या. नेहमी आई-वडिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवा आणि संस्कारांचे मूल्य जपा. विद्यार्थी आणि शिक्षक यांचे नाते अतूट असते. गुरुंचे आशीर्वाद आणि पालकांचे संस्कार हेच यशाचं खरं रहस्य असल्याचे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.

धरणगाव तालुक्यातील सुमारे २७० गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य गुणगौरव समारंभ पाळधी येथे उत्साहात झाला. पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते व सुप्रसिद्ध प्रेरणादायी वक्ते डॉ. विनोद बाबर यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात दहावी आणि बारावी परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार झाला.

जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रतापराव पाटील यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन प्राचार्य अजिंक्य जोशी व प्रा. भूषण पाटील यांनी केले. तर आभार नरेंद्र मांडगे यांनी मानले.

**यांची होती उपस्थिती**

या समारंभाप्रसंगी तालुकाप्रमुख डी. ओ. पाटील, शिवराज पाटील, कार्यक्रमाच्या आयोजक तथा जि.प.चे माजी सदस्य प्रतापराव पाटील, पवन सोनवणे, चेअरमन विक्रम पाटील, माजी सभापती राजेंद्र चव्हाण, मुकुंदराव नन्नवरे, उपजिल्हाप्रमुख पी.एम. पाटील, मार्केट कमिटीचे चेअरमन प्रेमराज पाटील, कैलास चौधरी, माजी चेअरमन प्रमोद पाटील, जळगाव पं.स.चे माजी सभापती नंदलाल पाटील, जनाप्पा कोळी, शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र सपकाळे, शिरीष बयास, दूध संघाचे रमेश पाटील, साहेबराव वराडे, सरपंच जितू पाटील, मंगला पाटील, शेतकी संघाचे अध्यक्ष गजानन पाटील, राजू पाटील, गोपाल जीभाऊ, स्वप्निल परदेशी भैया मराठे, गणेश अधिकारी, तडवी उपस्थित होते.

**आई-वडील हेच खरे दैवत - डॉ. विनोद बाबर**

याप्रसंगी विद्यार्थ्यांना प्रेरित करताना डॉ. बाबर म्हणाले, 'आई-वडील हेच खरे दैवत आहेत. त्यांनी गरिबीतून तुम्हाला उभं केलं, त्यामुळे त्यांची गरिबी नव्हे तर श्रीमंती करा. त्यांच्या चेहऱ्यावरचं हास्य हेच तुमचं सर्वोच्च यश आहे, संकटे कितीही आली तरी मागे हटू नका, कारण संघर्ष हीच यशाची पायरी आहे. ताण घेऊ नका, नेहमी आनंदात राहा, असा सल्ला व्याख्याते प्रा. डॉ. विनोद बाबर यांनी दिला.

## पारोळा टायगर इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांची दिवाळी गोड

**तभा वृत्तसेवा**
**पारोळा, १९ ऑक्टोबर**

'दिवे लावणे ही दिवाळीची परंपरा आहे, पण मन उजळवणं ही तिची खरी ओळख!', असाच संदेश देत टायगर इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यंदा दिवाळीचं स्वरूप अधिक अर्थपूर्ण केलं. शाळेचे अध्यक्ष रवींद्र पाटील आणि संचालिका रूपाली पाटील यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांनी गरजू मुलांसोबत दिवाळी साजरी करत, समाजाप्रती आपली कृतज्ञता आणि जबाबदारी व्यक्त केली.

विद्यार्थ्यांनी स्वतःच्या खिशातील बचतीतून आणि शाळेच्या उपक्रमांतून जमा झालेल्या निधीतून मिठाई, पारंपरिक फराळ, फटाके, कपडे आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप केलं. शाळेत विविध सांस्कृतिक आणि कलात्मक उपक्रमही आयोजित करण्यात आले होते दिवे सजावट, कंदील बनवणे, आणि रांगोळी स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता.

या सर्जनशील उपक्रमांनी शाळेचा परिसर उजळून निघाला, आणि खऱ्या अर्थाने दिवाळीचा प्रकाश पसरला. या संपूर्ण उपक्रमाचं नियोजन आणि यशस्वी आयोजन प्राचार्य पी. एस. पाटील, अजीम शेख, उपप्राचार्य कविता सूर्यवंशी, विभागप्रमुख नम्रता बेडीस्कर, वृषाली पाटील, काजल सिंधी आणि क्लार्क श्रीकांत खैरनार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलं. दिवाळीच्या निमित्ताने सर्व विद्यार्थ्यांनी एकत्र येत स्वादिष्ट फराळाचा आनंद घेतला. शाळेचा परिसर आनंद, हास्य आणि एकतेच्या वातावरणाने भारून गेला.



## 'होय, एरंडोलच...' अखेर ॲड. आकाश महाजन यांच्या प्रयत्नांना यश

**एरंडोल :** राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वरील दिशादर्शक फलकांवरील 'एरंडोल' आणि 'पद्मालय' या गावांच्या नावांतील चुकीची नोंद दुरुस्त करण्यात आली असून आता नवीन फलकांवर 'एरंडोल' व 'पद्मालय' अशी अचूक नावे दर्शविण्यात आली आहेत.

या संदर्भात स्थानिक रहिवासी ॲड.आकाश महाजन यांनी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण मुख्य कार्यालय दिल्ली तसेच जळगाव युनिटकडे लेखी निवेदन सादर केले होते. संबंधित निवेदनात महामार्गावर झळकणाऱ्या जुन्या फलकांवर 'एरंडोळ' व 'पद्माळय' अशी चुकीची नावे असल्याचे नमूद करण्यात आले होते. या त्रुटीमुळे प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण होत होता. तसेच ऐतिहासिकदृष्ट्या ओळख असलेल्या 'एरंडोल' आणि 'पद्मालय' गावांच्या योग्य ओळखीला बाधा पोहोचत होती. याबाबत विभागाने सकारात्मक प्रतिसाद देत फलकांवरील नावे दुरुस्त करून नवीन दिशादर्शक फलक




उभारले आहेत.

स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले असून 'आमच्या गावांची खरी ओळख आता योग्यरीत्या दिसू लागली आहे,' अशा प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहेत.

## पारोळ्यात शिवतीर्थ येथे दीपोत्सवाने दिवाळीचा श्रीगणेशा

### माझ्या राजांचा चरणी पहिला दिवा; भुईकोट किल्ल्यावर गडपूजन

**तभा वृत्तसेवा**
**पारोळा, १९ ऑक्टोबर**

छत्रपती शिवशंभू प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित दिवाळीचा पहिला दिवा माझ्या राजांच्या चरणी हा गौरवशाली दीपोत्सव सोहळा यावर्षी १८ ऑक्टोबर रोजी मोठ्या उत्साहात झाला. या प्रतिष्ठानचा हा सलग पाचवा दीपोत्सव सोहळा होता.

दीपोत्सवाच्या मुख्य सोहळ्यापूर्वी, सायंकाळी ५ वाजता पारोळ्याच्या ऐतिहासिक भुईकोट किल्ल्यावर गडपूजन करण्यात आले. भूपेंद्र मराठे यांच्या हस्ते हे गडपूजन झाले. महाराजांच्या कार्याप्रती आणि त्यांनी जपलेल्या गड-किल्ल्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा उपक्रम घेण्यात आला.

**भव्य आयोजनाची रूपरेषा**

सोहळ्यानिमित्त शिवतीर्थावर सर्वत्र दिवे लावून आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. ज्यामुळे संपूर्ण परिसर उजळून निघाला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मानवंदना देऊन झाली. शिवरायांच्या जयघोषात फटाके फोडून उपस्थितांनी आनंद व्यक्त केला. यानंतर सर्व शिवप्रेमींनी एकत्र येऊन सामूहिक महाआरती केली.

या सोहळ्यात पारोळ्यातील शिवकन्या व सर्व शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिवचरित्रावरील निष्ठा व कृतज्ञता व्यक्त केली.

या दीपोत्सव सोहळ्याप्रसंगी आमदार अमोल पाटील, माजी नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. महेश पवार, माजी नगरसेविका रेखा चौधरी, ॲड. कृतिका आफ्रे यांच्यासह इतर सर्व संघटनेचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन छत्रपती शिवशंभू प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य, पारोळा तालुका, सर्व शिवकन्या आणि शिवभक्त यांच्या सहकार्याने करण्यात आले.



**शिवतीर्थावर दीपोत्सव सोहळा**

गडपूजनानंतर, सायंकाळी ७ वाजता पारोळा येथील शिवतीर्थ येथे मुख्य दीपोत्सव सोहळ्याला सुरुवात झाली. गेल्या चार वर्षांपासून छत्रपती शिवशंभू प्रतिष्ठान ही गौरवशाली परंपरा राबवत आहे. 'ज्यांच्यामुळे देवळातील देव आणि दारातील तुळस सुरक्षित आहे,' अशा छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दिवाळीचा पहिला दिवा त्यांच्या चरणी अर्पण करण्याची ही भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# निर्मल सिडस्च्या बिजोत्पादक शेतकऱ्यांचा आकाशवाणीकडून सन्मान



**तभा वृत्तसेवा**
**पाचोरा १९ ऑक्टोबर**

भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या अंतर्गत कार्यरत असणाऱ्या आकाशवाणी जळगाव केंद्राने आपला सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिन १६ ऑक्टोबर रोजी उत्साहात साजरा केला. या सुवर्ण महोत्सवानिमित्ताने कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात बीजोत्पादनातील गुणवत्ता व उत्पादकतेत उच्चांक गाठणाऱ्या निर्मल सिडस्च्या बीजोत्पादक शेतकऱ्यांचा विशेष गौरव करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वनाथ कम्बल्याल (अपर महानिदेशक), प्रमुख अतिथी म्हणून मनीषा शेटे (उपम हानिदेशक), रवींद्र खासनिस (उपनिदेशक) शैलेश माळोदे (सहायक निदेशक), निर्मल सिडस्च्या संचालिका वैशाली सूर्यवंशी, मनोबल संस्थेचे संस्थापक यजुर्वेद्र महाजन, आकाशवाणीचे कार्यक्रमप्रमुख ज्ञानेश्वर बोबडे, भारती नेमाडे (अभि. प्रमुख), विजय भुयार (प्रसारण अधिकारी) इत्यादी उपस्थित होते.

या सोहळ्याला निर्मल सिडस्च्या संचालिका वैशाली सूर्यवंशी यांनी विशेष उपस्थित राहुन शेतकऱ्यांचे अभिनंदन केले. वैशाली सूर्यवंशी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, 'बीजोत्पादन हा कृषी उद्योगाचा पाया आहे. निर्मल सिडस्ने देशभरातील हजारो शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन, प्रशिक्षण व उत्तम दर्जाचे बीजोत्पादन करण्याची प्रेरणा दिली आहे. आजचा हा सन्मान म्हणजे शेतकऱ्यांनी गाळलेल्या घामाचा, कष्टाचा सन्मान आहे,' असे त्या म्हणाल्या.

**सन्मानित शेतकऱ्यांची नावे**

लक्ष्मण प्रभाकर चौधरी (चहार्डी), जनार्दन बापू वाणी (लोहटार), वसंत हरी महाजन (पिंपळगाव हरे.) नरेंद्र तुकाराम पाटील (अटलगव्हाण) या सर्व शेतकऱ्यांनी निर्मल सिड्सच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट बीजोत्पादन करुन गुणवत्तेचा नवा आदर्श निर्माण केला आहे. याची दखल आकाशवाणी जळगाव केंद्राने घेऊन शेतकऱ्यांबद्दल असलेली सामाजिक बांधीलकी जपली असून बीजोत्पादन क्षेत्रातील गुणवत्ता आणि उत्पादकतेच्या उच्च निकषांना प्रोत्साहन दिले आहे. निर्मल सिडस्च्या शेतकऱ्यांना दिलेले हे पुरस्कार शेतकऱ्यांचे आत्मविश्वास वाढवणारे ठरले आहेत. पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांचे निर्मल सिडस्कडून अभिनंदन करण्यात आले.

# केवायसीमुळे लाडक्या बहिणींची दिवाळी अंधारात

### राज्य सरकारने तत्काळ पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धरणगाव, १९ ऑक्टोबर**

तालुक्यासह परिसरातील 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेंतर्गत प्रत्येक लाभार्थी महिलेला ई-केवायसी करणे बधनकारक करण्यात आले आहे. ई-केवायसीसाठी लाडक्या बहिणींसमोर दिवाळी सणासुदित अडचणी निर्माण झाल्या असल्याने लाडक्या बहिणींची दिवाळी अंधारात जाणार असल्याची शंका धरणगाव शिवसेनेच्या माधुरी विनोद रोकडे यांनी व्यक्त केली आहे.

सरकारने या केवायसीच्या अडचणी तत्काळ सोडवाव्यात, अशी मागणी शिवसेना उबाठाच्या कार्यकर्त्या माधुरी विनोद रोकडे यांच्याकडून करण्यात आली आहे.

संकेतस्थळावर वारंवार एरर येत असून, ओटीपी येत नसल्याने लाडक्या बहिणींच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. धरणगाव तालुक्यात ई-केवायसीच्या माध्यमातून पात्र लाभार्थी महिलांची राज्य सरकारने पडताळणी सुरू केली आहे. यासाठी राज्यभरातील लाखो महिलांनी लाडकी बहीण योजनेसाठी नोंदणी केली.

महिलांना ई-केवायसी प्रक्रिया करण्यास विलंब लागत आहे. ई-केवायसी प्रक्रिया करताना ओटीपी येत नसल्याच्या तक्रारीही मोठ्या प्रमाणात समोर येत असून, या समस्या सोडवून ही प्रक्रिया सुलभ करावी आणि ई-केवायसीचे सर्व्हर सुरळीत चालू करावे व मुदत वाढवावी, अशी मागणी ई-मेलद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या संकेतस्थळवर ई-मेल पाठवून माधुरी विनोद रोकडे यांनी केली आहे.

**लाडक्या बहिणींची गैरसोय**

आता केवायसीसाठी दोन महिन्यांची मुदत शासनाने दिली आहे. यात ई-केवायसी करण्यासाठी प्रत्येक स्तर सविस्तरपणे सांगितला जात आहे. मात्र संकेतस्थळ सुरळीत चालत नसल्याच्या अनेक तक्रारी वाढल्या आहेत. ई-केवायसीच्या संकेतस्थळावर कुकी केल्यावर त्याला सुरू व्हायला खूप विलंब लागतो. कसेतरी सुरू झाले तर साईडवरून ओटीपी पाठविला असता मोबाइलवर ओटीपी येत नाही. त्यामुळे अनेक महिला तासन्‌तास आपल्याजवळ मोबाइल घेऊन ओटीपीची वाट बघत बसतात. त्यामुळे लाडक्या गैरसोय बहिणींची होत आहे. अनावधानाने मोबाइलवर ओटीपी आला तर तो ओटीपी टाकायचा कुठे? हा प्रश्न निर्माण झाला आहे. ओटीपी टाकण्यासाठी संकेतस्थळावर बॉक्स उपलब्ध नाही. यामुळे लाडक्या बहिणींना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.



## धरणगाव नगरपरिषदेत दिवाळीनिमित्त कर्मचाऱ्यांना गणवेश, मिठाई, साडी वाटप

**धरणगाव :** येथील नगरपरिषदेतर्फे दिवाळी सणानिमित्त कर्मचारी वर्गासाठी शनिवारी (१८ ऑक्टोबर) आनंदमय कार्यक्रमाचे आयोजन नगरपरिषद कार्यालयात करण्यात आले. यात सफाई कर्मचाऱ्यांना नवीन गणवेश आणि मिठाई वाटप तसेच महिला सफाई कामगारांना साडी भेट देण्यात आली.

अध्यक्षस्थानी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी रामनिवास झंवर होते. त्यांनी सर्व कर्मचाऱ्यांसोबत दिवाळी फराळाचा आस्वाद घेतला.

कार्यक्रमादरम्यान नगरपरिषद कर्मचाऱ्यांनी विविध गाणी सादर करून कार्यक्रम अधिक रंगतदार केला. आनंद, उत्साह आणि परस्पर स्नेहाच्या वातावरणात संपूर्ण कार्यक्रम पार पडला. धरणगाव नगरपरिषद प्रशासनाने कर्मचाऱ्यांसाठी आयोजित केलेला हा उपक्रम दिवाळी सणाचे सामाजिक आणि कौटुंबिक मूल्य जपणारा ठरला. याप्रसंगी कार्यालय अधीक्षक भिकन पारधी, कर प्रशासकीय अधिकारी मंगेश लंके, विद्युत अभियंता राहुल तळेले, पाणीपुरवठा अभियंता धनंजय कोठुळे, स्वच्छता निरीक्षक संतोष बिऱ्हाडे, शहर प्रकल्प अधिकारी तुषार सोनार, शहर समन्वयक नीलेश वाणी, तांत्रिक सहाय्यक विक्रांत चौधरी, किरण पाटील यासह सर्व मुकादम, कार्यालयीन कर्मचारी व सफाई कर्मचारी उपस्थित होते.




## महत्त्वाचे

### कवी अशोक नायगावकरांचा 'मिश्किली कविता' कार्यक्रम



**जळगाव :** येथील आरोग्यदीप किडनी फाउंडेशन, इंडियन मेडिकल असोसिएशन आणि व. वा. जिल्हा वाचनालय यांच्यातर्फे २६ ऑक्टोबरला सायंकाळी सातला ला. ना. विद्यालयाच्या गंधे सभागृहात सुप्रसिद्ध कवी, विनोदी लेखक व मिश्किली कलाकार अशोक नायगावकर यांचा 'मिश्किली कविता' कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी प्रवेश खुला आहे. साहित्य, विनोद आणि काव्य यांचा अनोखा संगम असलेल्या या कार्यक्रमास जळगावकरांनी उपस्थिती द्यावी, असे आवाहन डॉ. शशिकांत गाजरे, डॉ. प्रदीप जोशी, डॉ. भरत बोरोले यांनी केले आहे.

### 'परिवर्तन-जळगाव'तर्फे आज 'दिवाळी पहाट'

**जळगाव :** 'परिवर्तन-जळगाव'तर्फे दरवर्षी नरक चतुर्दशीच्या दिवशी 'दिवाळी पहाट' कार्यक्रम घेण्यात येतो. यावर्षी नरक चतुर्दशीच्या दिवशी सोमवारी (२० ऑक्टोबर) सकाळी सहाला संगीतमय दिवाळी पहाट कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रम भाऊंच्या उद्यानातील एम्पी थिएटरमध्ये होईल. कार्यक्रमाची संकल्पना भूषण गुरव यांची, तर दिग्दर्शन मंजुषा भिडे यांचे आहे. निर्मितीप्रमुख नारायण बाविस्कर व लीना लेले आहेत. तालासुरामध्ये दिवाळीचे स्वागत आणि आपल्या लोकपरंपरेतील दिवाळीचे महत्त्व अधोरेखित करणारा हा कार्यक्रम आहे. 'परिवर्तन'चे कलावंत यात सहभागी होणार आहेत. कार्यक्रमासाठी भवरलाल आणि कांताबाई जैन फाउंडेशन व अविरत बिल्डकॉन यांचे सहकार्य लाभले आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, प्रेक्षकांनी उपस्थिती द्यावी, असे आवाहन 'परिवर्तन'चे अध्यक्ष शंभू पाटील, विनोद पाटील, मंगेश कुळकर्णी आदींनी केले आहे.

### 'सुबोनियो'तर्फे उद्या 'दिवाळी पहाट' रंगणार

**जळगाव :** 'सुबोनियो'तर्फे सप्तसुरांची संगीत व प्रकाशमय 'दिवाळी पहाट' मंगळवार (२१ ऑक्टोबर) रोजी रंगणार आहे. सोहळ्याला खासदार स्मिता वाघ, आमदार सुरेश भोळे, ललित चौधरी, माजी उपमहापौर सुनील खडके, मनसेचे जमील देशपांडे आदी उपस्थित राहतील. गायिका ऐश्वर्या परदेशी, गायक मयूरकुमार, गायिका टी. भानुप्रिया यांची भक्तिरसपूर्ण प्रस्तुती प्रेक्षकांना मेजवानीच ठरणार आहे. राजू जाधव, शैलेश पगारे, जयंत महाजन, कल्पेश पवार, किशोरी राणे (वाघुळदे) यांची साथसंगत असेल. मंगळवारी सकाळी सहाला शहरातील श्री कालिंका माता चौकातील एचडीएफसी बँक प्रांगणात 'दिवाळी पहाट' ही सुश्राव्य संगीताची मैफील रंगणार आहे. या कार्यक्रमाचे निवेदक तुषार वाघुळदे हे राहतील. कार्यक्रमाचे आयोजन 'सुबोनियो' परिवाराचे सुबोधकुमार सुधाकर चौधरी, सुनीलकुमार चौधरी, सुयोगकुमार सुधाकर चौधरी, हिरा सुबोधकुमार चौधरी, सारिका अपर्णा सुयोगकुमार चौधरी, सुमोल चौधरी, सृष्टी सुमोल चौधरी यांनी केले आहे.



**गरजूंसाठी शवपेटी उपलब्ध**
संपर्क – (०२५७) २२३६१६६, २२२३६९९

**अंकासाठी संपर्क**
'तरुण भारत' अंकासंदर्भात काही सूचना, तक्रारी किंवा काही अडचण असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
मो.९०२३३४५५५० ९६२३६०४७१२





# आज नरक चतुर्दशी : अभ्यंगस्नानाचे पर्व

## यम पूजन : बाजारपेठेतील गर्दीचा ओघ कायम





**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ ऑक्टोबर**

दीपोत्सवातील नरक चतुर्दशी या पावन दिवसाची पहाट प्रकाशमय असणार आहे. घरोघरी पणत्या, दिवे आणि रोषणाईने परिसर उजळुन निघेल. सूर्योदयापूर्वी पहाटे उठून उटणे लावून अभ्यंगस्नान करण्याची आज मोठी पर्वणी साधली जाणार आहे. आयुष्यातील गंडांतर टाळण्यासाठी दिवा लावून यमदेवतेच्या पूजेला आज विशेष महत्व पुराणात सांगितले आहे. रविवारी सुटीच्या दिवशी ग्राहकांनी बाजारात गर्दी केली होती. अनेक व्यावसायिकांनी रविवारी त्यांची प्रतिष्ठाने सुरु ठेवली होती, त्यामुळे मोठ्या प्रमाणात उलाढाल झाली.

श्रीकृष्णाने नरकासुराचा या दिवशी वध करुन १६ हजार महिलांना त्याच्या कैदेतून मुक्त केले होते. प्रजेने घरोघरी दिवे लावत आनंद साजरा केला होता. सर्वत्र श्रीकृष्णाचा जयजयकार केला. आणि याला लहान दिवाळी म्हणून महत्व प्राप्त झाले. नरक चतुर्दशी सोमवारी (२० ऑक्टोबर) आहे. प्रकाशाची रोषणाई, फटाक्यांचा आवाज, आनंद आणि उत्साहाचे घरात वातावरण असते. जीवनात आनंद आणि प्रकाश, उत्साह घेऊन येणारा दीपोत्सव म्हणून सर्वत्र जल्लोषात साजरा केला जातो.

**लक्ष्मीपूजनाचा मंगळवारी मुहूर्त**

दिवाळीपर्वात लक्ष्मीपूजन या मंगलमय दिन उत्साह, आनंद, सुशोभिकरण, प्रसन्नता अशा विविध अदांनी नटलेला राहिल. मंगळवारी (२१ ऑक्टोबर) आश्विन अमावस्येच्या रात्री आदीशक्ती लक्ष्मी सर्वत्र पृथ्वीतलावर संचार करते. जेथे स्वच्छता, शोभा, आनंद, समाधान, दयाभाव असतो तेथे आदीशक्ती आकर्षित होते. आदीशक्ती प्रसन्न होवो, म्हणून या दिवशी घर, दुकान, दालनाच्या परिसराची साफसफाई करून रांगोळी, दिवे, फुलांनी सजावट केली जाते. संध्याकाळच्या प्रहरी पणत्यांनी परिसर प्रकाशमय केला जाईल. गृहिणी दाराबाहेर, अंगणात रांगोळी काढतील. लक्ष्मी व कुबेर यांचे पूजन व्यावसायिकाकडून शाही पध्दतीने केले जाईल. लक्ष्मीपूजनाचा दुपारी तीन ते साडेचार तसेच सायंकाळी सहा ते ८.३० व रात्री १०.३० ते १२ वाजेपर्यंत शुभमुहुर्त आहे.

**बुधवारी बलिप्रतिपदा**

बलिप्रतिपदा बुधवारी (२२ ऑक्टोबर) आहे. या पावनदिवशी दानशूर बळीराजाची पूजा घरोघरी केली जाते. याच दिवसापासून काही जण दान देण्याला सुरुवात करतात. चैत्र शुक्त प्रतिपदेस शालिवाहन शकाचे नवे संवत्सर सुरू होते. वहीपूजन करुन व्यावसायिक नवीन वर्षाला सुरुवात करतात .बलिप्रतिपदेला पत्नीने पतीचे औक्षण करण्याची परंपरा आहे. दोघांना दीर्घायुष्य लाभते, अशी आख्यायिका सांगण्यात येते.

**गुरुवारी भाऊबीज**

भाऊबीजेच्या दिवशी अर्थात कार्तिक शुक्ल व्दितीयेला यमराज पूजेचे विशेष महत्व आहे. पुराणानुसार यमराजाने त्याच्या बहिणीच्या हाताचे भोजन करत बहिणीचा सन्मान करत असतो. याच परंपरेनुसार भाऊ बहिणीच्या घरी जातो. बहिणीच्या हातचे जेवण करतो. भावाला ओवाळुन बहिण त्याला दिर्घायुष्य लाभू दे, अशी प्रार्थना करते. बहिणीला विशेष भेट देत भाऊ सदैव पाठीशी आहे, अशी बहिणीला ग्वाही देतो.






# 'सूर निरागस हो...'सह विविध गीतांना श्रोत्यांची उत्स्फूर्त दाद

## 'तरुण भारत' नारीशक्ती मंच आयोजित व के. के. डेव्हलपर्स प्रायोजित 'दिवाळी पहाट' कार्यक्रमास उदंड प्रतिसाद



- पणत्या आणि रांगोळ्यांनी सजला परिसर
- भाऊंच्या उद्यानात आलेल्या अनेकांची पावले गायकीला दाद देत कार्यक्रमस्थळी वळली
- दरवर्षी कार्यक्रम घेण्याचा श्रोत्यांचा आग्रह
- प्रथमच स्थानिक कलावंतांना संधी दिल्याचे समाधान अनेकांनी बोलून दाखविले

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ ऑक्टोबर**

अंधारावर मात करून प्रकाशाचा विजय साजरा करणारा आनंद, उत्साह आणि उमंगाने नटलेला दिवाळीचा सण म्हणजे उत्साहाला उधाण... या उत्साहात भर घातली गेली ती 'तरुण भारत' नारीशक्ती मंच आणि के. के. डेव्हलपर्सतर्फे आयोजित 'दिवाळी पहाट' कार्यक्रमाने. काव्यरत्नावली चौकातील भाऊंचे उद्यानात या सुरेल मैफलीचे आयोजन रविवारी पहाटे करण्यात आले होते.

या प्रकाशोत्सवाची पहाट म्हणजे जणू संस्कृतीचा, स्नेहाचा आणि संगीताचा अनोखा संगमच श्रोत्यांनी अनुभवला. या सुरेल कार्यक्रमाचा प्रारंभ दीपप्रज्वलनाने झाला. के.के. डेव्हलपर्सचे संचालक भूपेश कुळकर्णी, दीपाली कुळकर्णी, 'संस्कार भारती'चे दुष्यंत जोशी, 'तरुण भारत'चे संपादक चंद्रशेखर जोशी, शाखा व्यवस्थापक भावना शर्मा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले.

**अशी झाली गीते सादर**

कधी भक्तीगीतांमधून ईश्वर भक्तीचा सुगंध, कधी अभंगांतून अंतरमनातील साधना तर कधी नवचैतन्य देणाऱ्या मराठी सुरावटींचा आनंद या सोहळ्यात श्रोत्यांनी लुटला. 'राम का गुणगान करी ये...' या गाण्याने या मैफलीला सुरुवात झाली. या नामस्मरणाला श्रोत्यांनी भरभरून दाद दिली. या पाठोपाठ 'सूर निरागस हो...', 'तुज मागतो मी आता', 'अवघे गरजे पंढरपूर', 'नारायणा रमणा', 'हरी भजना वीण टाळ वाजवू नको रे', 'कौसल्येचा राम बाई', 'विजय पताका श्रीरामाची', 'पायोजी मैने', 'खेळ मांडियेला वाळवंटी ठाई', 'केव्हा तरी पहाटे' यासह उपस्थित श्रोत्यांनी मागणी केल्यानुसार काही गीते सादर करण्यात आली. एकाहून एक सुंदर सुरांनी भाऊंच्या उद्यानातील ही पहाट खुलत गेली.

**यांचा सहभाग अन् साथसंगत**

'संस्कार भारती'चे दुष्यंत जोशी, संपदा छापेकर, अंजली धुमाळ, तृप्ती बाकरे, अथर्व मुंडले, चारूल पाटील यांनी गीते सादर केली, तर विविध वाद्यांवर दिग्वीजय जगदाळ, भूषण गुरव यांनी साथसंगत केली.

**मान्यवरांच्या हस्ते गौरव**

मान्यवर गायक मंडळींचा सत्कार 'तरुण भारत'तर्फे करण्यात आला. आमदार सुरेश भोळे, भूपेश कुळकर्णी, दीपाली कुळकर्णी, भाजप नेते सुनील बढे, संचालक विभाकर कुरंभट्टी यांच्या हस्ते कलावंतांना भेट वस्तू देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संपादक चंद्रशेखर जोशी यांनी केले. सूत्रसंचालन मंजुषा अडावदकर. तसेच निवेदन संपदा छापेकर, तृप्ती बाकरे यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन संयोजिका गायत्री कुळकर्णी यांनी केले. या सुरमई पहाटेचा आनंद मनात साठवून शहरातील विविध भागांतून आलेल्या श्रोत्यांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त दाद दिली.

# साडेबारा लाख किमतीचे ६२ अँड्रॉइड मोबाईल हस्तगत

## पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते नागरिकांकडे सुपूर्द



**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ ऑक्टोबर**

सार्वजनिक ठिकाण तसेच बाजारातून महागडे मोबाईल गहाळ झाले होते. सायबर पोलिसांनी याकामी महाराष्ट्रासह अन्य राज्यात शोध मोहीम राबविली. या मोहिमेत पथकाने वेगवेगळ्या ठिकाणाहून सुमारे १२ लाख ५० हजार रुपये किमतीचे ६२ मोबाईल हस्तगत केले होते. या सर्व मोबाईलचे शनिवारी (१८ ऑक्टोबर) पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

पोलीस अधीक्षक डॉ. रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सतीश गोराडे, उपनिरीक्षक गणेश अहिरे यांना हरविलेल्या मोबाईलबद्दल शोध घेण्याचे आदेशीत केले होते. त्यानुसार सायबर पोलीस ठाण्याचे हवालदार किरण वानखेडे, हवालदार हेमंत महाडीक, पोलीस नाईक सचिन सोनवणे, कॉन्स्टेबल पंकज वराडे, कॉन्स्टेबल गौरव पाटील, कॉन्स्टेबल मिलींद जाधव, कॉन्स्टेबल दीपक पाटील यांच्या पथकाने शोध मोहिम राबवून मोबाईल हस्तगत केले होते.

गहाळ मोबाईल संदर्भात आयएमईआय क्रमांकासह संपूर्ण माहिती जळगाव पोलीस फेसबुक पेज यावर अपलोड केली आहे. सीईआयआर पोर्टलवर गहाळ मोबाईलची माहिती अपलोड करावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी यांनी नागरिकांना केले आहे. गहाळ झालेले मोबाईल परत मिळाल्याने नागरीकांनी पोलीसांचे आभार मानले. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलल्याचे चित्र यावेळी दिसून आले.

# मेहरूण तलावात आढळला मृतदेह

**जळगाव :** मेहरूण तलाव परिसरात गृहस्थ मृतावस्थेत आढळून आले. एमआयडीसी पोलिसांनी तपासातून मयताची ओळख पटविली.

संतोष वामन नेरपगार (वय ५९,रा. लेकसीटी अपार्टमेंट, शिरसोली रोड,जळगाव) असे मयताचे नाव आहे. ते दोन दिवसांपासून बेपत्ता झाले होते. कुटुंबियांनी सर्वत्र शोध घेतला असता तपास लागला नव्हता. रविवारी (१९ ऑक्टोबर) सकाळी आठ वाजेच्या सुमारास ही घटना उघडकीस आली.

संतोष नेरपगार हे टेलरिंग काम करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. दोन दिवसापूर्वी ते कोणाला काही एक न सांगता घराबाहेर पडले. त्यानंतर ते हरविले. कुटुंबियांनी त्यांचा नातेवाईकांसह शहरात शोध घेतला असता तपास लागला नव्हता. आज सकाळी मेहरुण तलावात मृतदेह आढळुन आला. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.

# सुसाट दुचाकी पळविणाऱ्या अल्पवयीन तरुणांना थांबवणार कोण?

## सामाजिक कार्यकर्ते दिलीप चौबे यांनी वेधले लक्ष

**जळगाव :** अल्पवयीन मुलांच्या हाती दुचाकी लागताच ते सुसाट वेगाने पळवितात. यातून लहान मोठे अपघात होतात. या घटना टाळण्यासाठी अल्पवयीन तरुण मुलांच्या हातात दुचाकी वाहन देऊ नये, याची पालकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन व्यावसायिक तथा सामाजिक कार्यकर्ते दिलीप चौबे यांनी केले आहे.

चौबे यांनी म्हटले की, बुधवारी (१५ ऑक्टोबर) सकाळी मॉर्नींग वॉक करुन परत येत होतो. मायादेवी मंदिरासमोर दुचाकी चालवणाऱ्या एका अल्पवयीन मुलीने मागून धडक दिलीच. वळून पाहिले तर १४-१५ वर्षाची मुलगी होती. तिचाही बॅलेन्स गेला आणि तीही पडली. विशेष म्हणजे मागच्या सीटवर बहुतेक तिची आई असावी, त्याही खाली पडल्या. आणि रस्त्यावरुन उठायचा प्रयत्न करता करता त्या मुलीला म्हणाल्या, "किती वेळा तुला सांगितले हळू चालव." महिलेने चौबे यांनाही विचारलं, "आपणास दुखापत तर नाही झाली." त्यांना कुठेही दुखापत झाली नव्हती. हे तुझे वय गाडी चालवायचे नाही, असे चौबे हे मुलीला म्हणणार तोवर ती गाडीवर बसली. आईलाही बसवलं आणि म्हणाली, सॉरी अंकल. यावरुन मी एक गोष्ट शिकलो, 'मूव ऑन जीवन... चलने का नाम...'अल्पवयीन मुलींना गाडी चालवण्यासाठी प्रोत्साहन देणारे आणि अपघातास कारणीभूत ठरणारे या मुलांच्या सारखेच पालक वर्गही जबाबदार आहेत. नुसते कडक कायदे करुन फायदा नसून त्याची ठोस अंमलबजावणी होणे महत्वाचे आहे. जेणेकरुन या पालकांना त्यांच्या मुलांच्या हातात गाडीची चावी देतांना दहा वेळा विचार करावा आणि निष्पाप लोकांचे जीव जाणार नाही, असेही दिलीप चौबे यांनी नमूद केले आहे.

## ।। आत्मोत्कर्ष वाणी ।।
## चूक झाली असेल तर मान्य करा...

'यज्ञीय', 'समाचारी', 'खंतुकीय' आणि 'मोक्षमार्गगती' अशा २५ ते २८ अध्यायांवर सविस्तर चर्चा आजच्या धर्मप्रवचनात प.पू. डॉ. हेमप्रभाजी म.सा. यांनी श्रावक-श्राविकांना समजावून सांगितली.

'समाचारी' या अध्यायात घर-परिवार असो वा साधू-साध्वींच्या समूहात, वरिष्ठांना अथवा साधू-साध्वी किंवा घरातील कनिष्ठ सदस्य काय करतात याची कल्पना असायला हवी. आपण करत असलेल्या कृतीची अनुमती घेतलीच पाहिजे. अशा दहा प्रकारच्या गोष्टी विचारल्या पाहिजेत.

हे स्पष्ट करण्यासाठी सासू व सुनेचे उदाहरण सांगण्यात आले. ''चूक झाली असेल तर चूक मान्य करा.'' काही नवीन गोष्ट सतत स्वीकारावी व शिकावी. ''ज्येष्ठांचा आदर, सन्मान करावा'' हे दहा समाचारी जसे साधूजीवनात आवश्यक आहेत तसेच व्यक्तीगत जीवनातही आवश्यक आहेत.

'खंतुकीय' या २७ व्या अध्यायात दुष्ट बैलाचे उदाहरण दिले आहे. त्याचे चार प्रकार सांगण्यात आले. त्याचप्रमाणे चार स्वभावाचे शिष्य असतात. 'अनुशासन' व 'विनय' या दोन्ही गोष्टींचे आचरण करणे अत्यंत आवश्यक आहे, असे सांगण्यात आले.

गर्भाचार्य या गुरूंचे पाचशे शिष्य असतात. ते सर्वच अविनयी, वाईट वर्तन करणारे असतात. आचार्यांनी त्यांना खूप समजावले, शिकविले, पण ते सुधारले नाहीत. अशा शिष्यांत राहून गर्भाचार्य स्वतःची साधना सुरक्षित ठेवण्यासाठी त्या शिष्यांना सोडून निघून जातात.

'मोक्षमार्गगती' या २८ व्या अध्यायात सविस्तर सांगितले आहे की, १ ते १४ 'ज्ञान', १५ ते ३१ 'दर्शन', आणि नंतरच्या गाथांमध्ये 'चारित्र' व 'तप' यांचे महत्त्व सांगितले आहे. 'दर्शन' शिवाय 'ज्ञान' नाही. ज्ञानाला चारित्र्याची जोड मिळावी. संचित कर्मक्षय करण्यासाठी 'चारित्र' आणि 'तप' या चार गोष्टींमुळे मोक्षमार्ग प्रशस्त होतो, असे मोलाचे विचार आजच्या प्रवचनात प्रस्तुत करण्यात आले.

**- शब्दांकन किशोर कुळकर्णी**

## थोडक्यात महत्त्वाचे....



### हास्य परिवारात दीपोत्सव जल्लोषात साजरा

**जळगाव :** येथील केसीई इंजिनिअरींग कॉलेजच्या प्रांगणात हास्य परिवाराने अत्यंत उत्साहात दीपोत्सव साजरा केला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस कॉलेजचे प्राचार्य डॉ. संजय सुगंधी, भारती सुगंधी, हास्य परिवाराचे संचालक अश्विन गांधी, सदस्य प्रिया सफळे, रत्ना पाटील, मनीषा चौधरी, सरिता शिरुडे, तेजल चौधरी यांनी दीपप्रज्वलन करून दीपोत्सवाचा शुभारंभ केला. कॉलेजचे प्रांगण, सुरेख रांगोळ्या, आकाशकंदील, पणत्यांनी सुशोभित करण्यात आले होते. दीपनृत्यातून सर्वांनी दीपोत्सव साजरा केला. ८० सदस्यांनी दीपोत्सवाचा मनमुराद आनंद लुटला. प्रिया सफळे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या दीपोत्सवास संचालक अश्विन गांधी यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सदस्य प्रिया सफळे, रत्ना पाटील, मनीषा चौधरी, तेजल फालक, प्रदीप तळेले, सुरेश महाजन, जयवेंद्र देवरे, शरद सोनवणे व सर्व सदस्यांचे सहकार्य लाभले.



### मातोश्री विद्यालयात डॉ. कलाम यांना अभिवादन

**जळगाव :** शहरातील प्रबोधननगर परिसरातील मातोश्री प्राथमिक विद्यालयात प्रबोधन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अ‍ॅड. जयप्रकाश बाविस्कर यांच्या मार्गदर्शनात माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त अभिवादनपर कार्यक्रम झाला. मुख्याध्यापक समाधान इंगळे यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. त्यांनी मिसाइल मॅन माजी राष्ट्रपती डॉ. कलाम यांच्या जीवनाबद्दल माहिती दिली. समाधान ठाकरे यांनी सूत्रसंचालन केले.



### रोटरी मिडटाऊनतर्फे दिव्यांग, विद्यार्थ्यांना दिवाळी भेट

**जळगाव :** येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव मिडटाऊनतर्फे १७ दिव्यांग बांधव आणि स्माईल फाउंडेशनचे २५ विद्यार्थ्यांना दिवाळी निमित्त किराणा, फराळ व कपड्यांचे गणपती नगरातील रोटरी हॉल येथे अध्यक्ष अ‍ॅड. किशोर बी. पाटील, मानद सचिव डी.ओ. चौधरी, प्रोजेक्ट समन्वयक मनोज पाटील, सुरेंद्रसिंग छाबडा, हेमंत पाटील, व्ही.आर. ज्वेलर्सचे संचालक विश्वनाथ पाटील यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. कार्यक्रमास रोटरी मिडटाऊनचे माजी अध्यक्षा डॉ. उषा शर्मा, छाया पाटील, श्रीरंग पाटील, सुनंदा देशमुख, विलास नायर, प्रा. यशवंत सैंदाणे, सुधीर चौधरी, अ‍ॅड. उज्ज्वला पाटील, सुनिता चौधरी, शारदा पाटील आदींसह सदस्यांची उपस्थिती होती.



### रोटरी वेस्टतर्फे विद्यार्थ्यांना कपडे वितरण

**जळगाव :** येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव वेस्टतर्फे दिवाळीनिमित्त गरीब व अनाथ विद्यार्थ्यांना नवीन कपड्यांचे वितरण करण्यात आले. रोटरी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर इलेक्ट डॉ. राजेश पाटील, माजी अध्यक्ष नितीन रेदासनी, सरिता खाचणे, अध्यक्ष गौरव सफळे यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. कार्डिनचे संचालक मालसीभाई गाला यांचे या उपक्रमास सहकार्य लाभले. प्रवीण पाटील व मनीषा बागुल यांच्या स्माईल फाउंडेशन आणि वैशाली झाल्टे यांच्या अभेद्या फाउंडेशनच्या गरीब व अनाथ विद्यार्थ्यांचा त्यात समावेश होता. यावेळी प्रशासकीय सचिव महेश सोनी, प्रकल्प सचिव देवेश कोठारी, माजी प्रशासकीय सचिव भद्रेश शाह यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक माजी सचिव मुनिरा तरवारी यांनी केले. यशस्वीतेसाठी रोटरक्ट क्लब ऑफ जळगाव वेस्टचे अध्यक्ष वैभव अबोटी, वेदांत खाचणे, किरण इंगळे, मिहीर राजपूत, प्रथमेश मिसार, मोक्षदा ओगले, ईशांत राजपूत, अक्षदा ओगले यांनी परिश्रम घेतले.

### जळगावात 'वर्ल्ड फूड डे'निमित्त सेमिनार

**जळगाव :** अन्न तंत्रज्ञान विभाग, युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (यूआयसीटी), कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व असोसिएशन ऑफ फूड सायंटिस्ट्स अँड टेक्नॉलॉजिस्ट्स (इंडिया) ए.एफ.एस.टी.(आय), मुंबई शाखा यांच्यातर्फे 'वर्ल्ड फूड डे'निमित्त १६ ऑक्टोबर रोजी सेमिनार पार पडले. या वर्षीचा विषय होता 'उत्तम अन्न व उत्तम भविष्यासाठी हातात हात घालून.' कार्यक्रमाचे उद्दिष्ट अन्नसुरक्षा, शाश्वतता आणि नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान याविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच शैक्षणिक उद्योग सहकार्य वाढविणे हे होते. याप्रसंगी डी आर्यन फार्म, आर्कड फायनान्स सोल्युशन, प्रतीक गृह उद्योग, अनीता इंडस्ट्रीज, नवलप्रभा फूड्स व क्विक फूड्स या संस्थांच्या प्रतिनिधींनी मार्गदर्शनपर व्याख्याने दिली. कार्यक्रमात चार उत्तम संकल्पना उत्तम उत्पादन, उत्तम पोषण, उत्तम पर्यावरण आणि उत्तम जीवन या विषयांवर पॅनेल चर्चा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी पोस्टर व तोंडी सादरीकरणांद्वारे नावीन्यपूर्ण संशोधन कल्पना सादर केल्या. नेटवर्किंग सत्रांमुळे उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील संवाद अधिक दृढ झाला. कार्यक्रमाची सांगता भूषण महाजन यांच्या 'आर्थिक साक्षरता' या विषयावरील समारोपीय व्याख्याने झाली.

# श्रीराम मंदिर संस्थानच्या वहनोत्सवास २२ पासून प्रारंभ

## कार्तिकी एकादशीनिमित्त २ नोव्हेंबरला श्रीरामरथोत्सव

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ ऑक्टोबर**

जळगांव नगरीचे ग्रामदैवत श्रीराम मंदिर संस्थान (रामपेठ) जळगांवचे विद्यमाने अवघ्या कान्हदेशाचे सांस्कृतिक, अध्यात्मिक वैभव असलेला व गेली १५३ वर्षे अव्याहतपणे संपन्न होत असलेला श्रीराम रथोत्सव यंदाही आयोजित करण्यात आला आहे. कान्हदेशातील वारकरी सांप्रदायाचे सद्‌गुरू श्री. वै. अप्पा महाराज यांनी शके १७९४ (सन १८७२) मध्ये सुरु केलेला हा संस्थानचा सर्वोच्च मानबिंदू असलेला श्रीराम रथोत्सव यंदा १५३ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. दरम्यान २२ ऑक्टोबरपासून वहनोत्सवास प्रारंभ होत आहे व ०२ नोव्हेंबर २०२५ या कार्तिकी प्रबोधिनी एकादशीच्या पावन दिनी 'श्रीराम रथोत्सव सोहळा' होणार आहे.

परंपरेप्रमाणे कार्तिक शु. प्रतिपदा ते त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत म्हणजेच ५ नोव्हेंबरपर्यंत हा उत्सव होईल. या उत्सवात प्रतिदीनी रोज सकाळी पहाटे ५.०० वाजता काकडाभजन, काकडा आरती, सकाळी ७.०० वाजता मंगलारती, दुपारी ११.३० ते १२.०० माध्यान्ह पूजा, महानैवेद्य आरती. दुपारी ४ ते ५ वा. सामूहिक हरिपाठ. संध्याकाळी ५.०० ते ६.०० नित्यनेमाचे चक्री भजन, संध्याकाळी ६ ते ६.३० संध्यापूजा, धुपारती. संध्याकाळी ७ वाजता श्रीराम मंदिरापासून वहन दिंडीस जलग्राम प्रदक्षिणेस प्रस्थान होईल.



### असा राहिल वहनोत्सव

प्रतिपदेपासून श्रीराम वहनोत्सवास प्रारंभ होत असून वहनोत्सवातील बुधवार (२२ ऑक्टोबर) रोजी पहिले वहन 'घोडा' हे असेल. २३ ऑक्टोंबर दिनी दुसरे वहन 'हत्ती (ऐरावत)' हे सुध्दा एक रत्नच आहे. २४ ऑक्टोबर रोजी तिसरे वहन 'वाघाचे (व्याघ्र)', २५ ऑक्टोबर रोजी चवथे वहन 'सिंहाचे', २६ रोजी पाचवे वहन 'श्री सरस्वती मातेचे', २७ रोजी सहावे वहन 'श्री शेषनाग', २८ रोजी सातवे वहन हे 'गजेंद्र मोक्ष', २९ रोजी आठवे वहन 'श्री चंद्रदेव', ३० रोजी नववे वहन 'श्री सुर्याचे' व ३१ ऑक्टोबर रोजी दहावे वहन 'श्री गरुडाचे', १ नोव्हेंबर रोजी अकरावे वहन 'श्री मारुतीरायाचे', २ नोव्हेंबर रोजी 'एकादशीला श्रीराम रथोत्सव' होईल. तर ३ नोव्हेंबर रोजी रासक्रीडेचे 'मनोहारी वहन' निघुन वैकुंठ चतुर्दशीला ४ रोजी तुळशी विवाह सोहळा व फूलांचा महादेव श्री हरिहर भेट सोहळा श्रीराम मंदिरात होईल. ५ नोव्हेंबर रोजी त्रिपुरारी पौर्णिमेस श्री सत्यनारायण पूजन, श्रीराम मंदिराचे उत्तराधिकारी ह.भ.प.श्री. श्रीराम महाराज जोशी यांचे श्रीगोपाळ काल्याचे कीर्तन सेवा होऊन अन्नसंर्तपण व रथोत्सव वहनोत्सवाची सांगता होईल.

प्रथम वहनपूजन - कार्तिक शु. प्रतिपदा बुधवार (२२ ऑक्टोबर) रोजी संध्याकाळी ६ वा. प्रथम वहनपूजन विधी ह.भ.प.मंगेश महाराज जोशी यांच्या हस्ते होईल. प्रबोधिनी एकादशीला २ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० वा वंशपरंपरेने प्रथम वहनपूजन विधी ह.भ.प.श्री. मंगेश महाराज जोशी (पंचम विद्यमान गादीपती) यांच्याहस्ते होईल. याप्रसंगी जळगांव नगरीतील विविध क्षेत्रातील रामसेवक व मान्यवरांची उपस्थिती राहिल.

**यांनी केले आवाहन**

वहनोत्सव व रथोत्सव सोहळा निमित्त प्रभु श्रीराम चैतन्याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीराम मंदिर संस्थानचे वहीवाटदार, प्रमुख विश्वस्त, विद्यमान्न गादीपती ह. भ. प. मंगेश महाराज जोशी, विश्वस्त डॉ. भरत अमळकर, अ‍ॅड. सुशील अत्रे, शिवाजीराव भोईटे, रथोत्सव समितीचे अध्यक्ष भालचंद्र पाटील, कार्याध्यक्ष प्रभाकर पाटील, विलास चौधरी, सुजित पाटील, मुकुंद धर्माधिकारी गुरुजी, श्रीराम महाराज, नंदु शुक्ल गुरुजी, भानुदास चौधरी, कवि कासार, राजु काळे, अरुण मराठे, महेंद्र जोशी, विकास शुक्ल, विनायक जोशी, संजय पाटील, राजु कोळी, जगदीश खडके, अमील खड्डे, राजप्रकाश भावसार, कलीत चौधरी, मुकुंद मेटकर, अमित भाटीया, आकाश एडे, कथे बापू सपके, सदाशिव लांबट, नकुल कोनी, भारत बारी, किशोर पाटील आदिंनी केले आहे.

# जळगावात राज्यस्तरीय व्हॉलिबॉल स्पर्धा

## सावखेडा शिवारातील शानभाग विद्यालयात २४ पासून प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ ऑक्टोबर**

विवेकानंद प्रतिष्ठान, जळगाव आणि पासिंग व्हॉलीबॉल असोसिएशन, जळगाव (महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन संलग्नित) यांच्या संयुक्त विद्यमाने 'राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा २०२५-२६' चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा २४ ते २६ ऑक्टोबर २०२५ दरम्यान विवेकानंद प्रतिष्ठान संचालित कै. श्रीमती ब.गो. शानभाग विद्यालय, सावखेडा (जळगाव) येथे पार पडणार आहे.

राज्यातील शालेय स्तरावरील तरुण खेळाडूंना राज्यस्तरीय पातळीवर आपली प्रतिभा सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणे आणि व्हॉलीबॉल खेळाचा प्रसार ग्रामीण तसेच शैक्षणिक स्तरावर वाढविणे, हा या स्पर्धेचा मुख्य हेतू आहे. ग्रामीण भागातील खेळाडूंमध्ये स्पर्धात्मकता आणि संघभावना विकसित करण्यासाठीही हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे. या स्पर्धेत १६ वर्षांखालील मुले आणि मुलींच्या गटातील सामने खेळविण्यात येतील. महाराष्ट्र राज्यातील आठ विभागातून पात्र ठरलेले संघ या स्पर्धेत सहभाग नोंदवणार आहेत.



एकूण सुमारे १९२ खेळाडू (९६ मुले आणि ९६ मुली) तसेच संघ प्रशिक्षक आणि व्यवस्थापक या स्पर्धेत आपली ताकद आणि कौशल्य सादर करतील. एकूण ३२० खेळाडू, संघ प्रशिक्षक आणि व्यवस्थापक उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेदरम्यान विविध रोमांचक सामन्यांचे थेट प्रक्षेपण केले जाणार असून, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना 'गौरव पुरस्कार' आणि 'सर्वोत्कृष्ट संघ' पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येईल.

स्पर्धेचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी रोहन घुगे, पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या हस्ते २४ रोजी सायंकाळी ५ वा. होणार आहे. उद्घाटनप्रसंगी पासिंग व्हॉलीबॉल असोसिएशनचे पदाधिकारी, विवेकानंद प्रतिष्ठानचे मान्यवर सदस्य, तसेच स्थानिक क्रीडा क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती उपस्थित राहणार आहेत.



# इनरव्हील ईस्टतर्फे २५० विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ ऑक्टोबर**

इनरव्हील क्लब ऑफ जळगाव ईस्टतर्फे धानोरा येथील मराठी शाळेत शालेय विद्यार्थिनींसाठी आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. या शिबिरात विद्यालयातील २५० विद्यार्थिनींची तपासणी करण्यात आली. यावेळी गुड टच, बॅड टच याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थिनींना ज्या आरोग्याच्या समस्या आहे त्याबाबत तपासणी करून त्यांना आवश्यक त्या मेडिसिन देखील देण्यात आल्या. तसेच विद्यार्थिनींना व्हिटॅमिनच्या मोफत गोळ्यांचे वाटप देखील करण्यात आले. महिलांमध्ये होणाऱ्या कर्करोगाबाबत देखील वैद्यकीय तज्ज्ञांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. मासिक पाळीच्या स्वच्छतेबाबत सांगण्यात आले. जिथे मुलींना त्यांच्या पहिल्या मासिक पाळी दरम्यान आणि त्यांच्या संपूर्ण मासिक पाळी दरम्यान वैयक्तिक स्वच्छता कशी राखावी याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी डॉ. जयश्री महाजन, डॉ. साधना पाटील , डॉ. चेतना राणे, डॉ. शारदा तायडे या स्त्रीरोग तज्ञांनी मुलींची तपासणी केली. यावेळी इनरव्हील क्लब ऑफ जळगाव ईस्टच्या डिस्ट्रीक्ट प्रोजेक्ट कमिटी चेअर पीडीसी संगीता घोडगावकर, अध्यक्ष सिमरन पाटील, सचिव रितू शर्मा यांसह क्लबच्या पदाधिकारी महिला उपस्थित होत्या. या उपक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# आरोग्य भारतीतर्फे धन्वंतरी पूजन, सन्मान सोहळा

## जळगावात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ ऑक्टोबर**

भगवान धन्वंतरी ही धनाची देवता आणि आरोग्य, सुखसमृद्धीसाठी या देवताचे पूजन केले जाते. धनत्रयोदशीच्या दिवशी आरोग्य भारतीतर्फे धन्वंतरी पूजन करण्यात आले.

कार्यक्रम संघ कार्यालयात पार पडला. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे योग सायन्स विभागाचे प्रमुख राजेंद्र पाटील, डॉ. विशाखा गर्गे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यंदाचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी वर्ष असल्याकारणाने आरोग्य भारतीतर्फे शहरातील सेवाभावी व्यक्तिमत्त्वांचा ज्यांनी आरोग्य भारतीचे प्रमुख अजेंड्यावरील विषय पर्यावरण, जल, जंगल, सुपोषण, योगा, आरोग्यसेवा याविषयी निःस्वार्थ काम करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान कार्यक्रमात करण्यात आला.



यात आरोग्यविषयक विशेष कामगिरीबद्दल डॉ. चंद्रशेखर सिकची, डॉ. निरंजन चव्हाण, डॉ.अजिंक्य पाटील, डॉ. जयंत जहागिरदार, हर्षाली चौधरी यांना आणि स्वच्छता आणि पर्यावरणाबद्दल विशेष कामगिरीबद्दल प्रकाश पाटील, सुहास दुसाने, रमेश कांबळे, डॉ. शरयू विसपुते, अर्चना उजगरे यांना आरोग्य भारतीतर्फे सन्मानित करण्यात आले.

अतिथींनी योगा व आयुर्वेदाचा दैनंदिन जीवनशैलीमध्ये किती महत्त्वाचा भाग आहे, हे मनोगतात व्यक्त केले. कार्यक्रमाला आरोग्य भारतीचे प्रांत उपाध्यक्षा डॉ. लीना पाटील, जळगावचे अध्यक्ष डॉ. सुनील सूर्यवंशी, उपाध्यक्ष योगशिक्षिका रेवती याज्ञिक, सचिव डॉ. शरयू विसपुते, सहसचिव भूषण क्षत्रिय, महेश जैन, तुषार चौधरी, डॉ. निष्ठा लोटवाला, सागर पाटील, पल्लवी उपासनी आदी उपस्थित होते. आरोग्य भारतीचे सहसचिव भूषण क्षत्रिय यांनी सूत्रसंचालन केले.

# अथर्वच्या ध्रुपद गायनाने दिवाळी पहाट उजळली

## संस्कार भारतीतर्फे आयोजित उपक्रमाला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ ऑक्टोबर**

खान्देशच्या सांगीतिक इतिहासात यावेळी प्रथमच ध्रुपद गायनाने दिवाळी पहाट मैफिलीस प्रारंभ झाला. संस्कार भारतीच्या धनत्रयोदशी पहाट मैफिलीचे कलाकार होते अथर्व मुंडले.

मूळ जळगावच्या मात्र सध्या बडोदा येथे शिक्षण घेत असलेल्या अथर्वने आपल्या मैफीलीचा प्रारंभ भैरव रागातील 'शिव आदि मध्य अंत'या सूल तालातील पारंपरिक रचनेने केला. डागरबानी घराण्याच्या अंगाने हरी ओम अनंत नारायण अर्थात नोम तोम पद्धतीने सुरेल गंभीर आलापाने भैरव स्थापना करण्यात आली. मुख्यतः गमक, मिंडच्या उपयोगाने या गान प्रकाराला ख्याल गायकी पासून वेगळे केले. ध्रुपद गायना नंतर अथर्वने भक्ती नाट्य संगीताचे दमदार सादरीकरण केले आणि रसिकांची वाहवा मिळवली. 'धन्य भाग सेवा का अवसर पाया' या भैरवीने मैफिलीची सांगता झाली. अथर्वला पखवाजवर दिग्विजय जगदाळ यांनी व तबल्यावर सर्वेश चौक यांनी दमदार साथ संगत केली. तर संवादिनी संगत दुष्यंत जोशी यांनी आणि टाळ संगत भगवंत फडणीस यांनी केली. अभ्यासपूर्ण निवेदन अनघा गोडबोले यांनी केले. सूत्रसंचालन संपदा छापेकर यांनी तर आभार अनिल पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी डॉ. सुभाष महाले, मंचीय कलाप्रमुख भागवत पाटील, प्रांत अधिकारी गीता व मोहन रावतोळे, दिलीप चौधरी, रमा करजगावकर, चिंतामण पाटील, पीयुष रावळ, शरद पांडे उपस्थित होते.



# जळगावच्या वृषाली बडगुजरला नाशिक विभागातून कांस्यपदक

## १०० मीटर जलतरण स्पर्धेत मानाचे स्थान

**जळगाव, १९ ऑक्टोबर**

लातूर शहरात आयोजित राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत नाशिक विभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या जळगावच्या वृषाली नूतन कैलास बडगुजर या खेळाडूने १०० मीटर फ्रीस्टाईल (१००) प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत तिसऱ्या स्थानाचे कांस्यपदक पटकावले.

वृषालीने १०० मीटरची ही शर्यत केवळ १ मिनिट ९ सेकंदात (१:०९.००) पूर्ण केली, जो तिचा सर्वोत्तम वेळ आहे. राज्याच्या सर्वोत्कृष्ट जलतरणपटूंमध्ये तिने मिळवलेले हे यश जळगाव जिल्हा आणि संपूर्ण नाशिक विभागासाठी अभिमानास्पद आहे.

वृषालीला या यशापर्यंत पोहोचवण्यात तिचे प्रशिक्षक वैभव सोनवणे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. जळगाव येथे कार्यरत असलेले सोनवणे हे युवा जलतरणपटूंना तयार करण्यासाठी ओळखले जातात. त्यांच्या अथक परिश्रमामुळे आणि योग्य प्रशिक्षणामुळेच वृषाली आज राज्यस्तरीय पदकापर्यंत पोहोचू शकली.

वृषाली ही फार्मा कंपनीचे प्रतिनिधी कैलास व नूतन बडगुजर यांची कन्या असून स्थानिक क्रीडा अधिकाऱ्यांनी वृषाली आणि तिचे प्रशिक्षक वैभव सोनवणे यांच्या या कामगिरीचे कौतुक केले. तिला या भागातून उदयास येत असलेल्या क्रीडा प्रतिभेचे प्रतीक मानले जात आहे.

# झांबरे माध्यमिक विद्यालयात दीपावली उत्सव

## पारंपरिक सणांचे दर्शन घडविणारे देखावे सादर

**जळगाव, १९ ऑक्टोबर**

ए. टी. झांबरे माध्यमिक विद्यालय येथे दीपावली उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संपूर्ण विद्यालय दिव्यांच्या प्रकाशाने झळाळून गेले होते. विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी मिळून विविध पारंपरिक सणांचे दर्शन घडवणारे सुंदर देखावे व मांडण्या तयार केल्या.

या उपक्रमात लक्ष्मीपूजन, नरक चतुर्दशी, पाडवा, भाऊबीज आणि वसुबारस या सणांचे विशेष महत्त्व शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी सादरीकरणाद्वारे दाखवून दिले. प्रत्येक सणाशी निगडित पारंपरिक रीतिरिवाज, कथा आणि सामाजिक संदेश यांचे सुंदर वर्णन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्‌घाटन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका प्रणिता झांबरे आणि पर्यवेक्षक नरेंद्र बाबूराव पालवे यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांच्या सहभागाने परिसर आनंदोत्सवाने भरून गेला. दिव्यांच्या उजेडात सजलेला विद्यालयाचा परिसर रांगोळ्या, फुलांच्या माळा, तोरण आणि संगीताच्या तालावर अधिकच आकर्षक दिसत होता.



दीपावली उत्सवात साजरा होणाऱ्या पाचही दिवसांचे महत्त्व शाश्वत कुळकर्णी ७ वी व रीया पाटील ८ वी यांनी आपल्या मनोगतात पटवून दिले. अखेर कार्यक्रमाचा समारोप सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी मिळून 'स्वच्छता, सद्भावना आणि ऐक्य' या संदेशाने केला.दीपावलीच्या या उत्सवाने विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, एकता आणि सणांचे सामाजिक महत्त्व यांची जाणीव निर्माण झाली.

**यांनी केले सहकार्य**

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुचिता बाविस्कर, मनीषा जयकर, दीपाली खडके, रत्नमाला शिंदे, खुशबू चौधरी, मंगल लोडते, हेमलता भोळे, नूतन वराडे, ज्योती पाचपांडे, मीनाक्षी इसे तसेच विद्यालयातील इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बंधू-भगिनी यांनी सुद्धा सहकार्य केले.

# आदिवासी पाड्यावर रोटरी गोल्डसिटीने दिवाळीत पसरविला चैतन्याचा प्रकाश

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, १९ ऑक्टोबर**

येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव गोल्डसिटीने पानशेवडी येथील आदिवासी पाड्यावर जाऊन त्या बांधवांमध्ये दिवाळी निमित्त फराळ व कपडे भेट देऊन चैतन्याचा प्रकाश पसरविला.

दरवर्षी रोटरी गोल्डसिटीतर्फे या पाड्यावर दिवाळी साजरी करण्यात येते. यावर्षी त्यासोबत वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन देखील करण्यात आले होते. त्यात नेत्र तपासणी, ब्लड, शुगर,हिमोग्लोबिन तपासणी व मार्गदर्शन आणि मोफत औषधांचे वितरण करण्यात आले. यावेळेस अध्यक्ष डॉ.नीरज अग्रवाल, मानद सचिव स्वप्निल पलोड, मेडिकल कमिटी चेअरमन डॉ. सूर्यकिरण वाघण्णा, सतीश



मंडोरा, नंदू अडवाणी यांची प्रमुख उपस्थिती होती. यशस्वीतेसाठी रोटरी गोल्डसिटीचे माजी अध्यक्ष प्रकाश पटेल, नीलेश जैन, डॉ. गजानन पाटील, डॉ.प्रीती चौधरी, अशोक जैन, किशोर पाटील, अनिका मंडोरे, राधिका सोनी यांनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात महत्त्वाचे...




### वनवासी विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात

**नंदुरबार :** चिंचपाडा (ता. नवापूर) येथील वनवासी विद्यालय व एस. सी. चव्हाण कनिष्ठ महाविद्यालयात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्य प्रमोद चिंचोले अध्यक्षस्थानी होते. विचारमंचावर प्राथमिकचे मुख्याध्यापक लक्ष्मण गावित, प्रा. डी. एस. गावित, प्रा. साळुंके उपस्थित होते. प्रमुख वक्ते डॉ. विकास सपकाळे यांनी, विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व सांगून माणूस वाचनाने कसा प्रगल्भ होतो, ग्रंथ संकटकाळात मनाच्या दोलायमान परिस्थितीमध्ये कशी मदत करतात, याचे उदाहरणासह विवेचन केले. कस्तुरी वसावे, भारती वसावे, प्रिया वसावे, नेहा वसावे, अनुष्का सूर्यवंशी, कृती नाईक यांनी भाषणे केली. ग्रंथपाल सुभाष वळवी यांनी मार्गदर्शन केले. विद्यालयात ग्रंथप्रदर्शन, वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा असे कार्यक्रम घेण्यात आले. स्पर्धांमध्ये विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना पुस्तके भेट देण्यात आली. श्रीमती कापडिया यांनी प्रास्ताविक केले. प्रा. आर. डी. सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. शुभम परदेशी यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी प्रतिमा पाडवी, दाक्षायणी वसावे, प्रीतम वसावे यांनी सहकार्य केले.



### पटेल महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात

**शिरपूर :** एच. आर. पटेल कला व विज्ञान महिला महाविद्यालयात मराठी व इतिहास विभागातर्फे भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त प्राचार्या डॉ. शारदा शितोळे, उपप्राचार्य डॉ. गजानन पाटील यांच्या मार्गदर्शनात वाचन प्रेरणा दिन उत्साहात पार पडला. प्रमुख वक्ते ज्येष्ठ साहित्यिक एम. के. भामरे, उपप्राचार्य डॉ. गजानन पाटील, डॉ. एच. आर. चौधरी आदींच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. यावेळी मोहनदास भामरे, डॉ. गजानन पाटील यांनी राष्ट्रपती डॉ. कलाम यांच्या कार्याची माहिती दिली. प्रा. युवराज पवार यांनी प्रास्ताविक केले. सोनाली पाडवी व अश्विनी पावरा यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. इंदिरा गिरासे यांनी आभार मानले.



### दहिवद येथील अभियांत्रिकीत वाचन प्रेरणा दिन

**शिरपूर :** दहिवद येथील एसव्हीकेएम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये माजी राष्ट्रपती आणि भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त प्राचार्य डॉ. नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनात वाचन प्रेरणा दिन उत्साहात झाला. ग्रंथालय विभागातर्फे 'वाचन कट्टा' उपक्रम राबविण्यात आला. प्राचार्य डॉ. नितीन पाटील यांनी प्रतिमापूजन केले. याप्रसंगी तीन सर्वोत्तम लेखांना बक्षिसे देण्यात आली. यात गायत्री चौधरी, समर्थ भदाणे, झिशान शेख या विजेत्यांसह सहभागी विद्यार्थ्यांचा प्राचार्य डॉ. पाटील यांनी गौरव केला. प्रभारी ग्रंथपाल जिजाबराव पाटील यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले. हिमानी मगर हिने सूत्रसंचालन केले.



### रामसिंगनगर शाळेत वाचन प्रेरणा दिन उत्साहात

**शिरपूर :** येथील रामसिंगनगर भागातील आर. सी. पटेल मराठी प्राथमिक शाळेत माजी राष्ट्रपती तथा शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात पार पडला. मुख्याध्यापक आय. एम. पाटील, ग्रंथालय विभागप्रमुख नंदा राजपूत यांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड आणि पुस्तकांविषयी जिज्ञासा वाढविण्याचे आवाहन करत मार्गदर्शन केले. या वेळी आर. आर. राजपूत, एस. एस. पावरा, प्रताप सोनवणे, दीपक महाजन, नीलेश देवरे, एच. एम. मोरे, भाविका पाटील, कोमलसिंग अलकारी व कर्मचारी उपस्थित होते. यू. के. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. जे. के. सोलंकी यांनी आभार मानले.



### भोरखेडा विद्यालयात प्रकट वाचनाचा कार्यक्रम

**शिरपूर :** भोरखेडा येथील आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. प्राचार्य व्ही. पी. दीक्षित यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला. पर्यवेक्षक सी. एन. पाटील यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना ई-पुस्तकांची व ई-लायब्ररी संकल्पना याविषयी माहिती दिली. या वेळी विद्यार्थ्यांना पुस्तके वाचन करण्यास देण्यात आली. प्रकट वाचन कार्यक्रम राबविण्यात आला. एन. वाय. बोरसे यांनी प्रास्ताविक केले. एम. जी. वाडिले यांनी सूत्रसंचालन केले.



### खर्दे बुद्रुकच्या विद्यालयात महावाचन कार्यक्रम

**शिरपूर :** खर्दे बुद्रुक येथील आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. डॉ. कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रकट वाचन व महावाचन कार्यक्रम घेण्यात आला. शिक्षक एन. डी. चव्हाण अध्यक्षस्थानी होते. श्री. धनगर यांनी प्रास्ताविक केले. एन. डी. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात वाचनाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, यासाठी मार्गदर्शन केले. सुजित जाधव यांनी सूत्रसंचालन केले. श्रीमती एम. एन. पाटील यांनी आभार मानले.

### धुळ्यातील ग्लोबल युनिव्हर्सिटीत वाचन प्रेरणा दिन

**धुळे :** येथील एसव्हीकेएम, एनएमआयएमएस ग्लोबल युनिव्हर्सिटी, स्कूल ऑफ फार्मसी अँड टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट, ग्रंथालय विभागातर्फे वाचन प्रेरणा दिन माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ. समीर गोयल यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. किरण पाटील, डॉ. गिरीजा भवर आदी उपस्थित होते. कार्यक्रमात पुस्तक प्रदर्शन, बुक रिव्ह्यू स्पर्धा, तसेच सर्वोत्कृष्ट ग्रंथालय वापरकर्ता पुरस्कार- २०२५ वितरण करण्यात आले. सर्वोत्कृष्ट ग्रंथालय वापरकर्ता पुरस्कार-२०२५ प्राप्तकर्त्यांत प्रा. मृणाली पाटील, विद्यार्थी वैष्णवी सोनजे, देवयानी विधाते, भाग्यश्री पाटील, प्रथा पाटील, तेजस भोई, अभिजित जैन, भूषण कानडे, मोहिनी ठाकरे, चैताली बेहरे, तर बुक रिव्ह्यू स्पर्धेचे विजेत्यांत भार्गवी वसईकर, निकिता पवार, ऋषिकेश रावल, सेजल सूर्यवंशी, अभिजित जैन, मनस्वी पवार, महेश पाडवी, अभिजित ठाकूर यांचा समावेश होता.

## पुरासह अवर्षणग्रस्त शेतीसाठी नंदुरबारसाठी ५४ लाखांचा निधी

### जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा; डॉ. गावितांचा पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा**
**नंदुरबार, १९ ऑक्टोबर**



राज्य शासनाने सप्टेंबर २०२५ मध्ये राज्यातील विविध भागांमध्ये अवर्षण आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेतीपिकांच्या भरपाईसाठी शेतकऱ्यांना मदतीचा मोठा दिलासा दिला आहे. महसूल व वनविभागाच्या शासन निर्णयानुसार, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून तीन हजार २५८ कोटी ५६ लाख ४७ हजार रुपये निधी वितरित करण्यात येणार आहे. यात नंदुरबार जिल्ह्यासाठी ५३ लाख ९९ हजारांचा निधी मंजूर केला असल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी कल्पना ठुबे यांनी सांगितले. दरम्यान, नुकसानग्रस्तांना मदतीसाठी आमदार डॉ. विजयकुमार गावित यांनी पाठपुरावा केला.



नंदुरबार जिल्ह्यात सप्टेंबरमधील अतिवृष्टी आणि पुरामुळे ९३१ शेतकरी बाधित झाले असून, त्यांच्या ४४५ हेक्टर क्षेत्रातील शेतीचे नुकसान झाल्याची नोंद आहे. यासाठी शासनाने ५३ लाख ९९ हजारांचा निधी मंजूर केला आहे. या अनुदानामुळे शेती पुनरुज्जीवनाला मोठा आधार मिळणार असून, पुढील हंगामासाठी शेतकऱ्यांना थोडाफार दिलासा मिळणार आहे.

नंदुरबारसारख्या आदिवासीबहुल आणि शेतीप्रधान भागात या निधीमुळे शेतकऱ्यांना नवजीवन मिळणार आहे. गेल्या महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक भागांत भात, मका, ज्वारी, बाजरी, सोयाबीन, तसेच फळपिके यांसारख्या पिकांचे मोठे नुकसान झाले होते. शासनाच्या या निर्णयामुळे या पिकांच्या पुनर्लावणी व पुढील हंगामातील उत्पादनक्षमतेस चालना मिळेल. महसूल व पुनर्वसन विभागाचा हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीसह जारी केला असून, तो शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra.gov.in) उपलब्ध आहे.

#### डीबीटीद्वारे थेट खात्यात रक्कम

मदत वितरण प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल केली असून, शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट अनुदानाची रक्कम डीबीटी (डिस्ट्रिक्ट बेनिफीट ट्रान्स्फर) पद्धतीने जमा करण्यात येणार आहे. जिल्हानिहाय लाभार्थ्यांची यादी तयार करून संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांच्या संकेतस्थळावर ती प्रसिद्ध करण्यात येईल.

#### पारदर्शकतेवर भर

एका हंगामात एका शेती हानीसाठीच मदत दिली जाईल. कोणत्याही लाभार्थ्याला दुहेरी मदत होऊ नये यासाठी काटेकोर तपासणी करण्यात येईल. विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांमार्फत या प्रक्रियेची थेट अंमलबजावणीची केली जाईल, असे स्पष्ट निर्देश महसूल व आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिले आहेत.



## 'बौद्धिक संपदा अधिकार'वर युवा उद्योजकांसाठी कार्यशाळा

**शिरपूर :** एसव्हीकेएम, एनएमआयएमएस कॅम्पसमध्ये युवा उद्योजकांसाठी 'बौद्धिक संपदा अधिकारी - मूलभूत तत्त्वे' या विषयावर कार्यशाळेत विविध तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. उद्घाटन डॉ. सुनीता पाटील यांनी केले. डॉ. व्यंकटाद्री एम. यांनी स्वागतपर भाषण केले. डॉ. सुनिता पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत ८५ हून अधिक विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला. डॉ. स्मिता जैन व डॉ. शशिकांत बगाडे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यशाळेत 'पेटंट' आणि 'फार्मा' क्षेत्रातील विशेष सत्रे घेण्यात आली. त्यात विकास असावत यांनी 'संगणक-आधारित शोधांच्या क्षेत्रातील पेटंट ड्राफ्टिंग', किरण कोल्हे यांनी 'नियामक फाइलिंगमधील आयपी अडथळे : फार्मा क्षेत्राचा दृष्टीकोन' यावर माहिती दिली. डॉ. शशिकांत बगाडे यांनी कार्यशाळेचा आढावा सादर केला. डॉ. श्यामसुंदर पंचोली यांनी समारोपाचे मत व्यक्त केले. त्यानंतर सहभागींना प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. डॉ. विशाल बेलदार यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे समन्वयन प्रा. डॉ. शशिकांत बगाडे, प्रा. डॉ. विशाल बेलदार, प्रा. डॉ. अतुल दुसाने यांनी केले.

## महानुभाव पंथीय, पुजारी समाजातर्फे स्वच्छता अभियान

### शिरपूरमध्ये सर्वज्ञ श्री चक्रपाणी प्रभू अवतार दिनानिमित्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**शिरपूर, १९ ऑक्टोबर**

सर्वज्ञ श्री चक्रपाणी प्रभूंनी शके १०४३ ते ११४२ या कालखंडात ६२ वर्षे द्वारकेत अखंडपणे स्वच्छतेचे कार्य केले. त्यांच्या या कार्याला उजाळा देण्यासाठी तसेच महानुभाव पंथाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी सर्वज्ञ श्री चक्रपाणी प्रभू अवतार दिनानिमित्त महानुभाव पंथीय व पुजारी समाजातर्फे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.



येथील माळी गल्लीतील श्रीकृष्ण मंदिरापासून भंडारी गल्ली, बाजारपेठ, पाचकंदीलपर्यंत महानुभाव पुजारी भोपे समाज मंडळ, पंचकृष्ण प्रबोधन मंडळ, पंचकृष्ण सेवाभावी मंडळ यांच्यातर्फे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. श्रीकृष्ण मंदिरात श्रीकृष्णाच्या मूर्तीला, फुलहार व विडा अवसर वाहून अभियानाला सुरुवात करण्यात आली. या वेळी परमपूज्य ऋषिराजदादा भोजने, परमपूज्य अभयराजदादा पंजाबी, माजी नगरसेवक संतोष माळी, परमपूज्य श्री दादा, क्षत्रिय माळी समाजाचे अध्यक्ष बाबूलाल माळी, पुजारी समाजाचे व माळी समाजाचे ज्येष्ठ नागरिक दगाजीराव भोजने, विजयराव पवार, मोतीलाल माळी, साहेबराव माळी, धनंजय पवार, पुजारी समाजाचे अध्यक्ष राजेंद्र कोठीकर, पंचकृष्ण प्रबोधन मंडळाचे अध्यक्ष गिरीश पाटील, रूपेश शैक्षणिक बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष यादव बुवा, राजधर महाजन, ताराचंद माळी, डॉ. किशोर भोजने, रवींद्र भोजने, रवींद्र कोठीकर, संजय भोजने, दिलीप कपाटे, हेमंत सेवातकर, सुनील कोठीकर, कन्हैयालाल पवार, संदीप पवार, अनिल बडगुजर, पुंडलिक माळी, अंबालाल पटेल, चंद्रकांत महाजन, राजेंद्र नाईक, प्रवीण पाटील, रतन माळी, कृष्णा महाजन, योग पटेल, सेवाबाई कपाटे, ताराबाई कपाटे, सखूबाई भोजने, रेखाबाई कोठीकर, सुरेखा कोठीकर, सुमनताई महाजन, मंगलबाई वांईदेशकर, कविता कोठीकर आदींचा सहभाग होता. अध्यक्ष राजेंद्र कोठीकर यांनी आभार मानले.

## जिल्हा कुंभार समाजाच्या अध्यक्षपदी किशोर कुंभार



### उपाध्यक्षपदी दिनेश वाघ; खर्दे येथे मूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्यात कार्यकारिणी घोषित

**धुळे :** जिल्हा कुंभार समाजाच्या अध्यक्षपदी युवा उद्योजक किशोर कुंभार, तर उपाध्यक्षपदी नवे कोडदे येथील सरपंच व उद्योजक दिनेश वाघ यांची निवड करण्यात आली. खर्दे (ता. शिरपूर) येथील संत गोरोबाकाकांचे मंदिर व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात समाजाची कार्यकारिणी घोषित करण्यात आली.

खर्दे येथे संत गोरोबाकाकांचे मंदिर व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा झाला. आमदार काशिराम पावरा, कुंभार समाज सामाजिक संस्थेचे प्रदेशचे संस्थापक अध्यक्ष सतीश दरेकर यांच्या आशीर्वादाने, पुण्याचे कुंभार समाज जिल्हाध्यक्ष व सामाजिक संस्थेचे प्रदेश उपाध्यक्ष ज्ञानेश्वर सोमवंशी यांच्या प्रेरणेने, प्रदेशाध्यक्ष रमाकांत क्षीरसागर, सामाजिक संस्थेचे कोषाध्यक्ष व नाशिक जिल्हाध्यक्ष सोमनाथ सोनवणे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा कुंभार समाजाची कार्यकारिणी घोषित करण्यात आली.

समाजाच्या जिल्हा कार्यकारिणीत अध्यक्षपदी युवा उद्योजक किशोर कुंभार, उपाध्यक्षपदी उद्योजक व नवे कोडदे (ता. शिंदखेडा) येथील सरपंच दिनेश वाघ, सचिवपदी धुळ्याचे पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते अनिल चित्ते, कोषाध्यक्षपदी उद्योजक सुभाष कुंभार, खजिनदारपदी पिंपळनेर येथील प्रा. शेखर बागूल यांची निवड करण्यात आली. जिल्हा युवा उपाध्यक्षपदी भूषण कुंभार यांना कायम ठेवण्यात आले.

नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष किशोर कुंभार यांनी सांगितले की, दिवाळीनंतर समाजातील अडीअडचणी जाणून घेण्यासाठी ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांसोबत बैठक बोलावून जिल्हा दौऱ्यासंदर्भात गावभेटीचे नियोजन करण्यात येणार आहे. त्यानुसार धुळे, साक्री, शिरपूर, शिंदखेडा या चारही तालुक्यांचा दौरा करून समाजातील नवतरुणांशी विचारविनिमय करून समाजाचे जनमत लक्षात घेऊन तालुकाध्यक्ष किंवा विविध आघाड्यांच्या प्रमुख पदाच्या जबाबदाऱ्या सर्वानुमते निर्णय घेऊन दिल्या जातील.

कार्यक्रमाला धुळ्यासह नाशिक जिल्ह्यातील गणेश आहेर, वसंत कुंभार, अशोक जाधव, भरत शिरसाठ, निवृत्ती रसाळ, पुंडलिक सोनवणे आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक संस्थेचे खान्देश विभागीय अध्यक्ष रतिलाल कुंभार, सुभाष कुंभार, गोकुळ कुंभार, विजय ठाकरे, विजय कुंभार, भानुदास वाघ, ईश्वर मोरे, बन्सीलाल मोरे, सुरेश जगदाळे, प्रा. शेखर बागूल, ॲड. पंकज वाघ, नारायण जगदाळे, सागर वाघ, भूषण कुंभार, रूपेश कुंभार, प्रवीण धाडे, दीपक ठाणकर, राजेंद्र जगदाळे, राजेंद्र चित्ते, बापू नथ्थू कुंभार आदी उपस्थित होते.

## नामांकित निवासी शाळांतील पहिलीच्या प्रवेशासाठी २८ ला ईश्वरचिठ्ठीद्वारे निवड

**नंदुरबार :** तळोदा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील तळोदा, अक्कलकुवा व धडगाव या तीन तालुक्यांतील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची शहरातील नामांकित इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांत पहिलीच्या प्रवेशासाठी निवड ईश्वरचिठ्ठीद्वारे २८ ऑक्टोबरला सकाळी अकराला तळोदा येथील प्रकल्प कार्यालयात होणार आहे.

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी पहिलीसाठी ११३ जागांचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून, पैकी ९८ विद्यार्थ्यांची निवड राखीव प्रवर्गातून थेट होणार आहे. उर्वरित १५ जागांसाठी विद्यार्थ्यांची निवड ईश्वरचिठ्ठीद्वारे करण्यात येईल. यात धडगाव तालुक्यासाठी ५, अक्कलकुवा तालुक्यासाठी ५ आणि तळोदा तालुक्यासाठी ५ विद्यार्थ्यांची निवड करावयाची आहे.

प्रवेशासाठी प्राप्त अर्जांची छाननी प्रकल्प अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीद्वारे करण्यात आली आहे. समितीचा निवडीसंबंधीचा निर्णय अंतिम असून, समितीद्वारे पात्र, अपात्र व राखीव प्रवर्ग या प्रमाणात अर्जांची छाननी करण्यात आली आहे. ईश्वरचिठ्ठीची प्रक्रिया २८ ऑक्टोबरला सकाळी अकरानंतर तळोदा येथील प्रकल्प कार्यालयात होणार आहे. निवडप्रक्रिया तळोदा, अक्कलकुवा व धडगाव या क्रमाने तालुकानिहाय सकाळी अकरापासून ते निवड होईपर्यंत होणार आहे. निवडप्रक्रियेबाबतचे सर्वाधिकार एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांना राहतील.

पालकांनी तथा शाळांनी प्रवेशासंबंधीची सर्व कार्यवाही ३० ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करावी. मुदतीनंतर विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार नाही. ईश्वरचिठ्ठीव्दारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी त्यांचे आदेश ३ ते ७ नोव्हेंबरदरम्यान या कार्यालयाकडून घेऊन जावेत. ज्या शाळेत निवड झाली असेल, त्या शाळेत कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतरच प्रवेश घेता येणार आहे.

प्रत्येक तालुक्यासाठी १०० (५० मुले व ५० मुली) विद्यार्थ्यांची निवड प्रतीक्षा यादीसाठी करण्यात येणार आहे. ईश्वरचिठ्ठीव्दारे निवड झालेल्यांपैकी जे विद्यार्थी दिलेल्या मुदतीत प्रवेश निश्चित करणार नाहीत, त्यांच्या जागेवर प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना निवडक्रमानुसार प्रवेशाचे आदेश देण्यात येणार आहेत. या कालावधीत जे पालक पाल्यांचा प्रवेश घेणार नाहीत, तेथे प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांची निवड यादी उपलब्ध करून देण्यात येईल, असे असल्याचे प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी अनय नावंदर यांनी कळविले आहे.

## समाजात नशामुक्तीची जाणीव व्हावी : डॉ. कृष्णा बावले

### बोराडीत मानव केंद्रातर्फे मार्गदर्शनपर कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**शिरपूर, १९ ऑक्टोबर**

नशामुक्ती म्हणजे व्यसनापासून मुक्त होऊन निरोगी आणि आनंदी जीवन जगणे. आजच्या काळात अनेक तरुण विविध नशेच्या आहारी जात आहेत. दारू, तंबाखू, गुटखा, सिगारेट या व्यसनांमुळे आरोग्य आणि आयुष्य दोन्ही नष्ट होते. नशेमुळे कुटुंबात भांडणे, दुःख आणि आर्थिक अडचणी निर्माण होतात. त्यामुळे समाजात नशामुक्तीची जाणीव व्हावी, असे प्रतिपादन डॉ. कृष्णा बावले यांनी केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत, बोराडी (ता. शिरपूर) येथे मानव केंद्र व ग्रामपंचायतीतर्फे नशामुक्ती व ॲनिमियामुक्त मार्गदर्शनपर कार्यशाळा घेण्यात आली, त्या वेळी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. आमदार काशिराम पावरा यांच्या हस्ते कार्यशाळेचा प्रारंभ झाला. सामाजिक कार्यकर्ते रमण पावरा, सरपंच सुखदेव भिल, उपसरपंच राहुल रंधे, राजेंद्र पाटील, मनजित पवार, ग्रामपंचायत सदस्या विद्या रंधे, ऊर्मिला पावरा, नीता पवार, सोनाली सत्तेसा, चांदारीबाई पावरा, आरती भिल, अनिता बडगुजर, मयूरी पवार, शारदा भिल, अनिल पावरा, चंद्रसिंग पवार, बबन पाटील, हारसिंग पावरा, भीमसिंग कुवर, नीलेश महाजन, सतीश पवार प्रमुख पाहुणे होते. आमदार पावरा यांनी, कुटुंबासाठी दारूच्या व तत्सम नशेच्या दृष्ट सवयींपासून दूर राहावे, असे आवाहन केले.

ॲनिमियामुक्त गाव अभियान गावोगावी राबवले पाहिजे, असे आवाहन उपसरपंच राहुल रंधे यांनी केले. या वेळी डॉ.कृष्णा रामचंद्र बावले यांचे मार्गदर्शन लाभले. रमण पावरा यांनी कार्यशाळेचे संयोजन केले.

अभियानास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजीज शेख, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा नोडल अधिकारी स्वरांजली पिंगळे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, गटविकास अधिकारी प्रदीप पवार, विस्तार अधिकारी संजय पवार यांचे मार्गदर्शन लाभले. अभियानाच्या यशस्वितेसाठी चंद्रकांत राजपूत, गणेश भामरे, अंबादास सगरे, गजू पाटील, भूषण कुळकर्णी, मुकेश जाधव, उमेश पावरा, बादल पावरा, विजय पावरा आदींनी सहकार्य केले.



### मालपूरच्या विद्यार्थ्यांचे श्रुतलेखन स्पर्धेत यश

**मालपूर (शिंदखेडा) :** जिल्हास्तरीय अहिल्याबाई होळकर श्रुतलेखन स्पर्धेत येथील जिल्हा परिषद केंद्र शाळेतील दोन विद्यार्थ्यांनी बाजी मारली. तिसरीतील विराज प्रशांत खंडेराय व चौथीतील निधी महेंद्र माळी यांनी जिल्हास्तरावर तिसरे स्थान मिळविले. विद्यार्थ्यांना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजीज शेख, प्राथमिकचे शिक्षणाधिकारी डॉ. किरण कुवर यांच्या हस्ते ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांना गटशिक्षणाधिकारी दीपक सोनवणे, जिल्हा परिषद केंद्र शाळेचे मुख्याध्यापक तथा प्रभारी केंद्रप्रमुख राजेंद्र चौधरी, उपशिक्षक चंचल नागरे, रवींद्र पाटील व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

## मेथी गट अनुसूचित जातींसाठी आरक्षितमुळे निवडणुकीत चुरस!

### इच्छुकांकडून आतापासूनच गाठीभेटी; रावल गटाचे प्राबल्य

**तभा वृत्तसेवा**
**मेथी (शिंदखेडा), १९ ऑक्टोबर**

मेथी जिल्हा परिषद गट यंदाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती महिला संवर्गासाठी आरक्षित झाल्यामुळे इच्छुकांची लगबग सुरू झाली असून, आतापासूनच भेटीगाठी घेतल्या जात असल्याचे दिसून येत आहे. मात्र, मेथी गटावर रावल गटाचे प्राबल्य असून, भाजपचा उमेदवार निवडून येणे सहज शक्य आहे, असे राजकीय वर्तुळातून बोलले जात आहे.

जिल्हा परिषदेवर १५ जानेवारीपासून प्रशासकांची नियुक्ती आहे. तब्बल नऊ महिन्यांनंतर जिल्हा परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. १३ ऑक्टोबरला गट-गणांची आरक्षण सोडत काढण्यात आली. त्यात मेथी गट अनुसूचित जाती महिला संवर्गासाठी निघाला. त्यामुळे इच्छुकांकडून उमेदवारीचा दावा नागरिकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे. मेथी गटात अनुसूचित जातींची संख्या गत निवडणुकीत पंचवीशेच्या घरात होती. या वेळी संख्यावाढ झाल्यामुळे आरक्षणाच्या प्रक्रियेत मेथी गट अनुसूचित जातीसाठी राखीव झाला असल्याचे बोलले जात आहे.



गत पंचवार्षिक निवडणुकीत भाजपतर्फे उमेदवारी करणारे ज्ञानेश्वर भामरे मोठ्या मताधिक्क्याने गटातून निवडून आले होते. मात्र, नंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर जिल्हा परिषद सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्या झालेल्या पोटनिवडणुकीत प्रभाकर पाटील विजयी झाले. त्यांना अवघे दीड वर्षच मिळाले. त्यांनाही परत आरक्षण जर ओबीसीसाठी निघाले असते तर तेच जिल्हा परिषद उमेदवारीचे दावेदार राहिले असते; परंतु आरक्षणाने हा गट अनुसूचित जातीसाठी सुटल्यामुळे त्यांचाही अपेक्षाभंग झाला.

मेथी गटात मेथी व खर्दे असे दोन गण येतात. त्यात मेथी गण अनुसूचित जमाती महिलांसाठी राखीव, तर खर्दे गण सर्वसाधारणसाठी निघाल्याने इच्छुकांची भाऊगर्दी राहणार आहे.

मेथी गटात येथील माजी सरपंच रेखाबाई बागले भाजपतर्फे उमेदवारीसाठी प्रयत्नशील आहेत, तसेच भाजप जिल्हा कार्यकारिणी सदस्य बापू पवार यांच्या पत्नी वैशाली पवार याही भाजपतर्फे उमेदवारीसाठी प्रयत्नशील आहेत. मेथी येथील बन्सीलाल सोनवणे यांच्या पत्नी वैजयंतीबाई बन्सीलाल सोनवणे याही शिवसेना शिंदे गटातर्फे उमेदवारीसाठी इच्छुक असून, अजून निवडणूक जाहीर होण्यापर्यंत कोण-कोण उमेदवारीचा दावा करतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

ही जागा महायुतीकडून भाजप लढेल; पण महाविकास आघाडीकडून कोणाला सुटते, त्यावरून उमेदवाराचा विचार होईल. यासाठी अजून वाट पाहावी लागणार आहे. महाविकास आघाडीकडून उमेदवारांचे पत्ते अजून उघडे केले नसल्याने काय धमाका उडतो की बार फुसका निघतो, हेही पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

मेथी गटात उमेदवारी करणारच, असे बन्सीलाल सोनवणे सांगतात. शिवसेना शिंदे गटाने उमेदवारी दिली नाही, तरीही अपक्ष उमेदवारी करणारच, असे त्यांनी सांगितले. मेथी गटाची निवडणूक तिरंगी होते की चौरंगी, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. मात्र, या गटावर रावल गटाचे प्राबल्य असल्यामुळे भाजपचा उमेदवार निवडून येणे सहज शक्य आहे, असे जाणकार सांगतात.

निवडणूक कधी जाहीर होते याकडे इच्छुकांमध्ये उत्सुकता लागली असून, ऐन दिवाळीक धुराळा उडत असून, भेटीगाठींसाठी वेळ मिळणार असल्यामुळे या प्रक्रियेत कोण किती तग धरते आणि कोण आपली उमेदवारी कायम ठेवते, हेही बघणेसुद्धा महत्त्वाचे ठरणार आहे.



## बोरकर गुरुजींची भविष्यवाणी

**दिनांक** : २०/१०/२०२५ **वार** : सोमवार **शके** : १९४७
**अयन** : दक्षिण **ऋतू** : शरद **मास** : आश्विन **पक्ष** : कृष्ण **महिना** : ऑक्टोबर
**संवत** : २०८१ **अयनांश** : २४-१३-०६ **तिथी** : चर्तुदशी **नक्षत्र** : हस्त
**योग** : वैधृति **करण** : शकुनी **सूर्योदय** : ६-३५ **सूर्यास्त** : १८-११
**चंद्राशी प्रवेश** : कन्या **शुभाशुभ** : शुभ

**दैनिक राशीभविष्य**
**मेष** : धार्मिक साहित्य खरेदी कराल.
**वृषभ** : लवकर स्नानविधी आटोपणार आहे.
**मिथून** : पहाटेपासून उत्साह मनात राहील.
**कर्क** : नवीन कपडे आज वापराल.
**सिंह** : नवीन वस्तू खरेदी कराल.
**कन्या** : मित्र परिवाराचे भेटी होतील.
**तुला** : संसारात रममाण व्हाल.
**वृश्चिक** : मन आनंदी राहील.
**धनू** : आनंदात इतरांना सहभागी करून घ्याल.
**मकर** : विचार उत्तम आचरणात वेगळेपण राहील.
**कुंभ** : धावपळीचा दिवस असेल.
**मीन** : आईसोबत आपण आज रहाल.
**विशेष** : गोड पदार्थ कुळदेवतेला अर्पण करावा.

**पंडित सुरेशराव बोरकर गुरुजी, मु.पो. रावेर, जि. जळगाव मोबा. ९८५००१५५५८**

## थोडक्यात महत्त्वाचे...

### श्रीकृष्ण गोशाळेजवळ नगरपालिकेच्या सभागृहास मंजुरी; आ. अमोल जावळेंची गोप्रेमींना भेट

**रावेर** : येथील श्रीकृष्ण गोशाळेजवळील नगरपालिकेच्या ओपन स्पेसमधील जागेत आधुनिक सभागृह उभारण्यास मंजुरी मिळाली असून, यामुळे परिसरातील गोप्रेमी तसेच सामाजिक संस्थांसाठी मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे. वसुबारसच्या शुभमुहूर्तावर आमदार अमोल जावळे यांनी गोप्रेमींना भेट देत सभागृह मंजुरीची माहिती दिली. त्यांच्या या निर्णयामुळे गोसेवा तसेच सामाजिक उपक्रमांना चालना मिळणार आहे. हे सभागृह गोसेवा उपक्रम, कीर्तन-भजन, प्रबोधन सभा, योग प्रशिक्षण, आणि सामाजिक-शैक्षणिक उपक्रमांसाठी उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे परिसरातील गोप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावेळी आमदार अमोल जावळे म्हणाले की, ''गोसेवा ही भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. अशा सेवाभावी कार्याला पायाभूत सुविधा देणे ही आपली जबाबदारी आहे.''

### जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत वाघझिरा आश्रमशाळेचे यश



**यावल** : जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत वाघझिरा आश्रमशाळेच्या विद्यार्थिनींनी यश संपादन केले. क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जळगाव जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन व शेठ मुरलीधरजी मानसिंगका साहित्य, विज्ञान व वाणिज्य म हाविद्यालय पाचोरा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धा पाचोरा येथे १८ ऑक्टोबर रोजी १७ वर्षा आतील शालेय विद्यार्थिनींच्या जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या. यात शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा वाघझिरा (ता.यावल) विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी विजय संपादन करत विभागीय स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले आहे. या स्पर्धेत १७ वर्षा आतील मुलींच्या गटातून वाघझिरा आश्रमशाळेतील दहावीची खेळाडू नफीसा मुबारक तडवी हीने ३ किलोमीटर चालणे तर नंदिनी प्रेमसिंग बारेला हीने ४०० मीटर धावणे स्पर्धेत व उंच उडी मध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. या विद्यार्थिनींची नाशिक येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थिनींना क्रीडा शिक्षिका सुप्रिया पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाचे प्रकल्पाधिकारी अरुण पवार व मुख्याध्यापक किशोर महाजन इ.सह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




### भोळे कॉलेजमध्ये माहितीचा अधिकार दिन साजरा

**भुसावळ** : येथील देविदास नामदेव भोळे महाविद्यालयात माहितीचा अधिकार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य फोरम जळगाव विभाग उपाध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. पी. फालक होते. व्यासपीठावर विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. संजय चौधरी तसेच सहायक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. अंजली पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. अंजली पाटील यांनी केले. प्राचार्य डॉ. आर. पी. फालक यांनी अध्यक्षीय भाषण करताना, विद्यार्थ्यांना माहितीचा अधिकार दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. माहितीचा अधिकार दिवसाचे चार स्तंभ विविध उदाहरणांसह स्पष्ट केले. माहितीचा अधिकार हा फक्त कायदा नाही, तो जनतेचा विश्वास, लोकशाहीचा श्वास आणि प्रामाणिकतेचा प्रकाश आहे, असे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन डॉ. माधुरी पाटील यांनी केले. यावेळी दिव्या शिवपूजे, यश चंदन यांनी पोस्टर प्रदर्शन करून सर्वांना माहिती दिली. यासाठी सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. एस. डी. चौधरी, सहाय्यक जनमाहिती अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. ढाके, प्रा. जयश्री सरोदे, प्रा. श्रेया चौधरी, प्रा. संगीता धर्माधिकारी यांनी परिश्रम घेतले.

### महिलेचा विनयभंग, तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**भुसावळ** : विनयभंग केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध भुसावळ तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील एका गावातील ३३ वर्षीय पीडित महिलेच्या फिर्यादीनुसार, आरोपी दीपक पुरणसिंग पवार हा घरात घुसून महिलेचा विनयभंग केला. १४ रोजी रात्री ११ वाजता ही घटना घडली. या प्रकाराबाबत जबाब विचारणाऱ्या नातेवाईकांवर आरोपी महेश पवार, कैलास पवार आणि सुरज पवार यांनी शिवीगाळ करून 'जिवंत सोडणार नाही' अशी धमकी दिली. तपास विकास बाविस्कर करत आहेत. याबाबत भुसावळ तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.



### शारदा विद्या मंदिर अन् कनिष्ठ महाविद्यालयात डॉ. कलाम जयंती साजरी

**यावल** : येथील शारदा विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंती 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य आर. जे. महाजन होते. व्यासपीठावर पर्यवेक्षक एस. जे. पवार, बी. ई. महाजन, आर. सी. जगताप, किरणकुमार चौधरी व ए. पी. जाधव उपस्थित होते. प्राचार्य महाजन यांनी डॉ. कलाम यांच्या प्रेरणादायी जीवनावर प्रकाश टाकला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी वाचन, प्रेरणादायी पुस्तक परिक्षणे व अभिवाचन सादरीकरणे केली. सूत्रसंचालन एन. पी. पाटील यांनी केले, तर आभारप्रदर्शन ए. पी. जाधव यांनी केले.

# पूर्णा नदीपात्रातील अनधिकृत भरावामुळे महापुराचा धोका

## राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणासह कंत्राटदारावर कारवाईचे विभागीय आयुक्तांचे आदेश

**रवींद्र कोलते**
**भुसावळ, १९ ऑक्टोबर**

पूर्णा नदीपात्रातील अनधिकृत भरावामुळे महापुराचा धोका वाढला असून, याबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणासह कंत्राटदारावर कारवाई करण्याचे विभागीय आयुक्तांनी आदेश काढले आहेत.

मुक्ताईनगर तालुक्यातील खामखेडा गावाजवळील इंदूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७५३ एलच्या निर्माणाधीन पुलाच्या बांधकामासाठी पूर्णा नदीपात्रात १० महिन्यांपासून अनधिकृतपणे मुरमाचा भराव टाकण्यात आला आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जळगाव यांनी जळगाव पाटबंधारे विभागाची कोणतीही परवानगी न घेता, कंत्राटदार बीएनए इन्फ्रास्ट्रक्चरच्या माध्यमातून शेकडो डंपर मुरम आणि डबर



टाकून पूल उभारणीचे काम सुरू केले आहे. या बेकायदेशीर कृत्यामुळे नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण झाला असून, हतनूर धरणातील ५३ टक्के गाळाच्या समस्येत आणखी वाढ झाली आहे. यामुळे जळगाव जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये पूरपरिस्थितीचा धोका निर्माण झाला आहे.

विशेष म्हणजे या प्रकरणात जळगाव पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता यांनी गेल्या सहा महिन्यांत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक शिवाजी पवार यांना नदीपात्रातील अनधिकृत भराव काढण्यासंदर्भात पाच नोटीस बजावलेल्या असून त्यात बॅकवॉटर क्षेत्रातील ३० ते ४० गावांमध्ये पुराचा फुगवटा निर्माण होऊन जीवित हानी आणि वित्तहानी होण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तरीही या नोटीसला राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने कोणतेही उत्तर दिलेले नाही.

दरम्यान, हतनूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील दमदार पावसामुळे पूर्णा नदीमार्गे तापी नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर गाळ वाहून येत असून, हे गाळयुक्त पाणी भुसावळ, मुक्ताईनगर, रावेर आणि यावल तालुक्यातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याच्या जलस्त्रोतांमध्ये मिसळत आहे. यामुळे जलजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे.

**नाशिक विभागीय आयुक्तांचे कारवाईचे आदेश**

या गंभीर प्रकरणाची तक्रार सबळ पुराव्यांसह नाशिक विभागीय आयुक्तांकडे १२ सप्टेंबर २०२५ रोजी दाखल करण्यात आली होती. तक्रारीसोबत जोडलेल्या पुराव्यांवरून धोकादायक पूरपरिस्थिती आणि जीवित हानीची शक्यता लक्षात येताच, विभागीय अपर आयुक्तांनी २२ सप्टेंबर २०२५ रोजी जळगाव जिल्हाधिकाऱ्यांना नदीपात्रातील अनधिकृत भराव तत्काळ काढण्याचे आदेश दिले आहेत. त्यानंतर १२ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी यासंदर्भात उचित कार्यवाही करणेबाबत मुक्ताईनगर तहसीलदारांना पत्र दिलेले आहे. मात्र अजूनही ठोस कार्यवाहीची सुरवात झालेली नाही. एक प्रकारे नाशिक विभागीय आयुक्त यांच्या आदेशाला जिल्हा प्रशासनाने केराची टोपली दाखवली आहे.

### जिल्हा प्रशासनाचा कानाडोळा

दरम्यान, १ जुलै २०२५ रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या पथकाने नदीपात्रातील अनधिकृत भरावाची पाहणी केली होती, परंतु तरीही त्यानंतर कंत्राटदारावर कोणतीही कारवाई झालेली नाही.
मुक्ताईनगर पोलिसांनी या प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन, अनधिकृत भरावामुळे निर्माण होणाऱ्या गंभीर पूरपरिस्थितीचा एप्रिल आणि मे महिन्यात दोनदा जळगाव जिल्हा पोलीस अधीक्षकांना पत्र पाठवले आहे.
राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने या नोटिसांना केराची टोपली दाखवत काम सुरूच ठेवले, ज्यामुळे कायद्याचे उल्लंघन स्पष्ट झाले आहे.



## आमदार चंद्रकांत पाटलांची संवेदनशीलता

### रिक्षा अपघातातील प्रवाशांना केली मदत

**तभा वृत्तसेवा**
**मुक्ताईनगर, १९ ऑक्टोबर**

आमदार चंद्रकांत पाटील यांनी संवेदनशीलता दाखवत रिक्षा अपघातातील प्रवाशांना मदत केली.

जळगाव येथील एका कार्यक्रमासाठी जात असताना आमदार चंद्रकांत पाटील यांनी भुसावळजवळील साकेगाव येथे माणुसकीचे दर्शन घडवले. साकेगावजवळ एका रिक्षाचा अपघात होऊन ती रस्ता दुभाजकाला धडकून उलटली. रिक्षातील प्रवासी आकांत करत असताना, आमदार पाटील यांची एकमेव गाडी तेथे थांबली.

यावेळी आमदारांनी वेळ न गमावता स्वतः गाडीतून उतरून अपघातग्रस्त प्रवाशांना रिक्षातून बाहेर काढण्यास मदत केली. त्यांनी अपघातग्रस्त आणि घाबरलेल्या प्रवाशांना धीर दिला. तातडीने रुग्णवाहिका बोलवून जखमींना वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्याची व्यवस्था केली.

सध्याच्या काळात लोकप्रतिनिधींमध्ये संवेदनशीलतेची कमतरता जाणवत असताना, एका विधानसभा सदस्याने स्वतः अपघातस्थळी धाव घेऊन केलेली ही मदत नक्कीच कौतुकास्पद आहे. आमदार पाटील यांच्या या कृतीने त्यांच्यातील सामाजिक जाणीव आणि संवेदनशीलता अधोरेखित झाली आहे.

## शिवरायांचा पुतळा डीआरएम कार्यालयात बसवा

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १९ ऑक्टोबर**

डीआरएम कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविण्यात यावा, अशी मागणी रेल कामगार सेनेने केली आहे.

रेल कामगार सेना केंद्रीय अध्यक्ष, शिवसेना नेते खासदार विनायक राऊत, सरचिटणीस दिवाकर देव, केंद्रीय कार्याध्यक्ष संजय जोशी यांच्या आदेशाने रेल कामगार सेना भुसावळ मंडळातर्फे महाप्रबंधक मध्य रेल्वे विजयकुमार यांचा छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रतिमा, भगवी शौल, गुलदस्ता देऊन सत्कार केला व कामगारांच्या मागण्यांचे निवेदन सादर केले.

यावेळेस रेल कामगार सेना मंडल अध्यक्ष ललितकुमार मुथा,मंडल कार्याध्यक्ष प्रीतम टाक,मंडळ संयुक्त सचिव विनोद वाघे,मंडळ उपाध्यक्ष अरविंद थोरात, मीडिया प्रभारी मुकेश महाजन व इतर पदाधिकारी हजर होते. महाप्रबंधकांबरोबर कामगारांच्या ज्वलंत व प्रलंबित मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.



जीएम यांनी सर्व ज्वलंत प्रश्न मुद्दे ऐकून लवकरात लवकर सोडवण्याचे आश्वासन दिले.

**प्रमुख मागण्या अशा-**

छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा डीआरएम ऑफिसच्या प्रवेशद्वाराजवळ बसवणे, रेल्वे कामगारांसाठी अतिरिक्त रीजर्वेशन खिडकी डीआरएम कार्यालयात चालू करणे, नवीन पेन्शन स्कीम बंद करून जुनी पेन्शन स्कीम चालू करणे, एमओएच हे वर्कशॉप आहे की रनिंग शेड हे घोषित करणे, अपडाऊन करणाऱ्या सर्व कामगारांना एफ आर सी कार्डपास देणे, रेल्वे दवाखान्यात ड्युटीवर हजर असणाऱ्या डॉक्टरांचा सूचना फलक मुख्य प्रवेश द्वाराजवळ लावणे, रेल्वे दवाखान्यात रुग्णांना दिल्या जाणाऱ्या औषधांवर सकाळ, दुपार, संध्याकाळ असे लेबल लावून औषध देणे, १०:४० व ऑन रिक्वेस्ट कामगारांना व इतर झोनमध्ये बिनाविलंब लवकरात लवकर रिलीव्ह करणे, रेल्वेच्या सर्व विभागात कामगारांना शुद्ध पाणी पिण्यासाठी आरो प्लांट लावणे. कामगारांच्या ज्वलंत व प्रलंबित मागण्या मंजूर नाही झाल्या तर लवकरच रेल कामगार सेनेतर्फे उग्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल याबाबत चर्चा झाली.

### मांडवादिगर गावात लाठ्या-काठ्यांनी हल्ला

**भुसावळ** : जागेच्या बांधकामाच्या वादातून तिघांनी लाठ्या-काठ्यांनी हल्ला, हल्ला केल्याची घटना मांडवादिगर येथे १५ रोजी घडली. यात तीन जण जखमी झाले.

फिर्यादीनुसार, फिर्यादी सुनीता नीळकंठ पवार (वय २७) रा. मांडवादिगर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, बुधवार, १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता जागेच्या बांधकामाच्या वादातून संघर्ष झाला. आरोपी जगदीश बद्रीनाथ पवार, देशमुख अंकुर पवार, अक्षय जगदीश पवार, कपिल अंकूर पवार, अरविंद जगदीश पवार, सीयाराम बिद्रसिंग पवार, रेणुका देशमुख, सुनीता जगदीश पवार यांनी एकत्र येऊन विटा, काठ्या आणि लाकडी दांडक्यांनी फिर्यादी, तिचा पती नीळकंठ पवार व महेश पवार यांच्यावर हल्ला केला. आरोपी १ व ३ यांनी विटा फेकून आणि दगडाने डोक्यावर मारहाण करून गंभीर दुखापत केल्याचे नमूद आहे. मध्यस्थीला गेलेल्या महेश पवारलाही हल्ल्याचा सामना करावा लागला. या प्रकरणी गुन्हा दाखल झाला असून तपास संजय कंखरे करत आहेत.

### व्हॉट्सॲपवर अश्लील मॅसेजप्रकरणी गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १९ ऑक्टोबर**

व्हॉट्सॲपवर अश्लील मॅसेजप्रकरणी भुसावळ तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एका अल्पवयीन मुलीने दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपी निसार युनूस गवळी (रा. शिवपूर कन्हाळा) याच्यावर बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम कलम ११ (४)/१२ तसेच कलम ७५(१) (१) (२), ७८(१) (१) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपीने फिर्यादीस वारंवार व्हॉट्सॲप मॅसेज व कॉल करून 'माझ्याशी मैत्री कर,' असा आग्रह धरला आणि तिचा सतत पाठलाग करून छळवणूक केल्याचे फिर्यादीने सांगितले.

तपास पोहेकॉ महेश चौधरी यांच्याकडे सुरू आहे.



### भोळे कॉलेजला बॉक्सिंग महिला स्पर्धेत उपविजेतेपद

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १९ ऑक्टोबर**

जळगाव विभाग क्रीडा समिती अंतर्गत आंतर म हाविद्यालयीन बॉक्सिंग महिला स्पर्धा जळगाव येथील नूतन मराठा महाविद्यालयात झाल्या. त्यात भुसावळ येथील देविदास नामदेव भोळे महिला बॉक्सिंग संघास उपविजेतेपद प्राप्त झाले. विजयी- पिंजारी तरुन्नूम फिरोज ४५ ते ४८ कि. ग्रॅ. एस. वाय. बी. ए. विजयी- राजपूत माया राजेंद्र ८०+ कि. ग्रॅ. एम. कॉम. प्रथम वर्ष. या यशस्वी खेळाडूंचा प्राचार्य डॉ. राजू फालक यांनी सत्कार केला. यावेळी क्रीडा संचालक प्रा. डॉ. संजय चौधरी, प्रा. डॉ. अनिल सावळे, प्रा. एस. डी. चौधरी, प्रा. डॉ. जयश्री महाजन, प्रा. डॉ. जगदीश चव्हाण उपस्थित होते. या खेळाडूंची कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आंतर विभागीय बॉक्सिंग स्पर्धा शिरपूर धुळेसाठी निवड झाली आहे.

### वरणगावात राष्ट्रवादी ट्रेड युनियन; नवीन कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १९ ऑक्टोबर**

वरणगाव सर्कल येथील कामगारांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठवण्यासाठी राष्ट्रवादी ट्रेड युनियन शाखेची स्थापना करण्यात आली आहे. यानिमित्ताने कामगारांच्या हितासाठी काम करणाऱ्या नव्या कार्यकारिणीची निवड नुकतीच सर्वानुमते वरणगाव शासकीय विश्रामगृहात पार पडली.

युनियनचे अध्यक्ष अरुण दामोदर यांच्या नेतृत्वाखाली पुढील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. अध्यक्ष गणेश पाटील, उपाध्यक्ष नवलसिंग बेलदार, कार्याध्यक्ष मनोज सुरवाडे, सचिव राहुल तायडे, खजिनदार नीलेश वाढे, सदस्य ज्ञानेश्वर कोळी यांची निवड झालेली आहे.

नवीन कार्यकारिणीच्या निवडीनंतर वरणगाव परिसरातील कामगारांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. कामगारांचे हक्क, सुविधा आणि सुरक्षा यांसाठी ही युनियन सातत्याने प्रयत्नशील राहील, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

या निवडीनंतर शहरात अनेक ठिकाणी नविन पदाधिकाऱ्यांचे हार्दिक स्वागत व अभिनंदन करण्यात आले. कामगारांच्या समस्यांवर ठोस उपाय शोधणे, त्यांचे प्रश्न शासन दरबारी मांडणे आणि त्यांना न्याय मिळवून देणे, हे युनियनचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे अध्यक्ष अरुण दामोदर यांनी सांगितले.

## दुचाकीवरील तरुणाचा कुऱ्ह्याजवळ अपघाती मृत्यू

### ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १९ ऑक्टोबर**

तालुक्यातील कुऱ्हा पानाचे शिवाराजवळ क्रेन स्वरुपातील ट्रकने भरधाव वेगात धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात २५ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी ट्रकचालकाविरुद्ध भुसावळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत तरुणाचे नाव राहुल राजाराम तंवर (वय २५, रा. महादेवमाळ, ता. भुसावळ) असे आहे. याबाबत त्याचे वडील राजाराम मयाराम तंवर (वय ५८) यांनी फिर्याद दिली आहे.

हा अपघात शनिवार (१८ ऑक्टोबर) रोजी सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास कु-हा पानाचे गावाजवळील महाराष्ट्र ढाब्याच्या मागील रोडवर घडला. राहुल हा आपल्या हिरो स्प्लेंडर प्रो या काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून जात असताना समोरून आलेल्या एका भरधाव ट्रकने त्याला जोरदार धडक दिली.

अपघातग्रस्त क्रेन मोन्टेड ट्रक हा नियामुद्दीन अन्सारी (वय ६८, रा. चिचाकी ब्लॉक सिरीया, ग्राम पिपराडीह, पोस्ट बंधखारो, गिरिडीह, झारखंड. सध्या मुक्काम- चौधरी ऑटोमोबाईल, साकेगाव शिवार, ता. भुसावळ) याच्या ताब्यात होता.

या प्रकरणी भुसावळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संजय कंखरे पुढील तपास करीत आहेत.

## चांगला शिक्षक होण्यासाठी उत्तम वाचक व्हावे लागेल -डॉ. प्रतिभा सूर्यवंशी

**खिरोदा (ता. रावेर)** : ग्रंथाइतका प्रांजळ व निष्कपटी गुरू दुसरा नाही. चांगला शिक्षक व्हायचे असेल तर तुम्हाला उत्तम वाचक व्हावे लागेल, असे विचार प्रा. डॉ. प्रतिभा सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.

जनता शिक्षण मंडळ संचलित साने गुरुजी विद्या प्रबोधिनी सर्व समावेशक शिक्षणशास्त्रात ग्रंथालय विभागामार्फत डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्याच्या उद्देशाने 'वाचन प्रेरणा दिन' कार्यक्रम घेण्यात आला. महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.डॉ.बी. जे.मुंढे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनी संगीता केवारी आणि संघ यांच्या स्वागत गीताने झाली. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून



त्यांना अभिवादन करण्यात आले.

प्रा. डॉ. प्रतिभा सूर्यवंशी यांनी मराठी भाषा विभागाचे मुख्य धोरण विचारात घेऊन सदर 'वाचन प्रेरणा दिन' या उपक्रमाची 'घेऊ या एकच वसा मराठीला बनवू या ज्ञानभाषा' या मध्यवर्ती संकल्पनेला अनुसरून मराठी भाषेचा इतिहास सांगून मराठी भाषेला 'अभिजात' दर्जा प्राप्त करण्यासाठी विहित निकष पूर्ण करावे लागले. मराठी भाषा ही किती समृद्ध, प्राचीन आहे यावर प्रकाशझोत टाकला. तसेच अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. बी. जे. मुंढे यांनी अध्यक्षीय भाषणात त्यांनी वाचलेल्या वेद, पुराण, उपनिषद यावर प्रकाशझोत टाकला. त्यांनी भाषणात सांगितले की वाचनाची सवय लावायची असेल तर सुरवातीला ललित साहित्यापासून सुरवात करून तात्विक व तार्किक ग्रंथांपर्यंतचा प्रवास सहज शक्य करता येतो. कार्यक्रम नियोजन व आयोजनासंबंधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. लता मोरे यांचे मार्गदर्शन लाभले. आभार प्रदर्शन नंदिनी माळी हिने केले सूत्रसंचालन शबाना तडवी हिने केले. कार्यक्रमाचे समन्वयक ग्रंथपाल ए.एस. सोनवणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, सर्व प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी, उपस्थित होते.

## वरणगावात वाहतूक कोंडी अतिक्रमण अन् पार्किंगची समस्या

**तभा वृत्तसेवा**
**भुसावळ, १९ ऑक्टोबर**

दिवाळीच्या सणासाठी बाजारपेठांमध्ये खरेदीला आलेल्या नागरिकांची गर्दी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. मात्र, वरणगाव शहरात वाहतुकीचा गोंधळ आणि बेशिस्त पार्किंग यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. भुसावळ शहर यावल रोड, जामनेर रोड, मुख्य बाजारपेठ, रेल्वेस्टेशन रोड ते तापी पूल या प्रमुख मार्गांवर वाहने रेंगाळत असून, अपघातांचा धोका सतत डोक्यावर आहे.

विशेषतः सायंकाळी तापी पुलावर फिरण्यासाठी येणारे नागरिक आपल्या दुचाकी-चारचाकी वाहनं पुलावरच उभी करतात.यामुळे पुलावरील वाहतूक संपूर्णपणे विस्कळीत होते.इतर वाहनचालकांना अरुंद जागेतून आपली वाहने चालवावी लागत असून, नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

शहरातील मुख्य बाजारपेठेतील अतिक्रमण हा वाहतूक कोंडीचा प्रमुख मुद्दा ठरत आहे. अनेक दुकानदारांनी दुकानदारासमोरील जागा व्यापली असून, ग्राहकही उपलब्ध जागेअभावी रस्त्यावरच वाहनं लावत आहेत.परिणामी बस, मालवाहू गाड्या, रिक्षा यांना मार्ग काढणं अत्यंत कठीण होत आहे.

**पोलिसांचा अनुपस्थित बंदोबस्त नागरिक संतप्त**

गर्दीच्या काळातही वाहतूक पोलीस किंवा शहर पोलीस प्रशासनाचा ठसा दिसून येत नाही, ही बाब गंभीर आहे. त्यामुळे बेशिस्त वाहनचालकांची मनमानी वाढली आहे. कुठेही पार्किंग, रस्त्यावर थेट गाडी थांबवणे यावर कोणताही अंकुश नसल्याने वाहतूक व्यवस्था पूर्णपणे ढासळली आहे.

**बंदोबस्त वाढवा**

भुसावळ आणि वरणगाव शहरातील सुजाण नागरिकांनी दिवाळीपूर्वी तातडीने वाहतूक नियंत्रणासाठी पोलीस बंदोबस्त वाढवावा, अशी मागणी केली आहे.अतिक्रमण करणाऱ्या दुकानदारांवर आणि रस्त्यावर अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशीही ठाम मागणी होत आहे.

'दिवाळीच्या काळात शहरात वाढणारी गर्दी पाहता पोलीस यंत्रणेने तत्काळ उपाययोजना केल्या नाहीत, तर अपघात आणि आणखी गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.